येणें वाग्यज्ञें तोषावें

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४

## प्रस्तावित घटना दुरुस्तीच्या मसुद्यासह






महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने पुष्पा पुसाळकर पुरस्कार वितरण समारंभ




महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने डॉ. सदानंद मोरे यांची साहित्य आणि संस्कृती मंडळावर अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करताना मान्यवर




९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मा. डॉ. तारा भवाळकर यांचा विशेष सत्कार करताना डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, संजय नहार, प्रा. डॉ. उषा तांबे, प्रा. मिलिंद जोशी, सुनिताराजे पवार, विनोद कुलकर्णी

येथें वाङ्मय तोषावें

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

## अंक क्र. ३८४

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४

संपादक

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

प्रकाशक

**सुनिताराजे पवार**

प्रमुख कार्यवाह


**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**

४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०

दूरभाष : ०२०-२४४७५९६३

संकेतस्थळ : www.sahityaparishad.org

ई-मेल : masaparishad@gmail.com


कार्यालयाची वेळ : सकाळी ९.०० ते दुपारी १२.००
दुपारी ४.३० ते रात्री ८.००

येणें वाग्यज्ञें तोषावें

**महाराष्ट्र**
**साहित्य**
**परिषद**


संपादक
**डॉ. पुरुषोत्तम काळे**

प्रकाशक
**सुनिताराजे पवार**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्प**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**



या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# घटनादुरुस्तीच्या निमित्ताने....

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ही महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था आहे. गेली ११८ वर्षे ही संस्था मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत आहे. ही परंपरा पुढे चालवत जुन्यातले नवे आणि नव्यातले अगदी नवे स्वीकारत परंपरा आणि नवतेची कास धरत साहित्य परिषदेच्या विद्यमान कार्यकारी मंडळाने तीन–चार पातळ्यांवर काम केले. एक म्हणजे कोरोनानंतरच्या कठीण काळात कोट्यवधी रुपयांच्या देणग्या मिळवून संस्थेच्या कार्यालयाचे, सभागृहाचे आणि ग्रंथालयाचे अंतर्गत नूतनीकरण करून लेखकांचे कित्येक दशकांचे स्वप्न पूर्ण केले. साहित्य परिषदेच्या जुन्या वास्तूला नवी झळाळी प्राप्त करून दिली. आता ग्रंथालयात जाण्यासाठी ज्येष्ठ वाचकांसाठी लिफ्टची सुविधा लवकरच उपलब्ध होत आहे. संस्थेचा भौतिक विकास करताना दुसरीकडे संशोधन विभागातर्फे 'अक्षरधन'सारखा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित करून संस्थेकडून अपेक्षित असणारी बौद्धिक आणि संशोधनाची कामे केली. तिसरीकडे अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून साहित्य परिषदेला साहित्याभिमुख आणि लोकाभिमुख केले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात परिषदेचे काम पोहोचवले. दुर्मीळ ग्रंथांचे आणि साहित्य पत्रिकेच्या अंकाच्या डिजिटायझेशनचे काम सुरू केले.

मराठीच्या हितासाठी ठाम भूमिका घेत परिषदेने मराठी भाषा शिक्षणाचा कायदा सक्तीचा करण्यात यावा यासाठी पुढाकार घेतला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी गेली ८ वर्षे लोकचळवळ उभी केली. त्या चळवळीला यश आले आणि मराठी भाषेला नुकताच केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. त्यात परिषदेचे योगदान खूप मोठे आहे. वाङ्मयीन घडामोडींत योग्य हस्तक्षेप करून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद निवडणुकीऐवजी सन्मानाने दिले जावे यासाठीच्या घटना बदलासाठी पुढाकार घेतला आणि साहित्य संमेलनाला वाचकांच्या मनातील अध्यक्ष मिळाले. परिषदेच्या कार्यकारी मंडळाने पार पाडलेली सर्वांत महत्त्वाची जबाबदारी म्हणजे गेल्या आठ वर्षांत संस्थेत कोणत्याही साहित्यबाह्य शक्तींचा शिरकाव होणार नाही याची काळजी घेतली. लेखकांचे महत्त्व अबाधित राहील हे पाहिले. भाषा भगिनींमधील स्नेह दृढ व्हावा यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वर्धापनदिन समारंभाला गेली आठ वर्षे अन्य भाषेतील थोर लेखकांना निमंत्रित करण्याची परंपरा सुरू केली, त्यामुळे प्रतिभा राय, वैदेही, सितांशु यशश्चंद्र, अशोक वाजपेयी, सूर्यबाला, रामचंद्र गुहा, माधव कौशिक असे मान्यवर परिषदेच्या व्यासपीठावर येऊन गेले.

साहित्य संस्थांनी कालानुरूप बदलले पाहिजे अशी भूमिका घेऊन विद्यमान कार्यकारी मंडळाने आजवर काम केले. संस्थेची कार्यपद्धती बदलण्यासाठी संस्थेच्या घटनेतही योग्य ते बदल होणे गरजेचे असते. यापूर्वीच्या कार्यकारी मंडळाने अनेक घटना दुरुस्ती समित्या नेमल्या; पण त्यांचे काम पूर्ण होऊ शकले नाही. ती उणीव या कार्यकारी मंडळाला भरून काढता आली, याचे समाधान आहे.

विद्यमान कार्यकारी मंडळाने घटना दुरुस्ती समिती गठीत केली. तिच्या नियमित बैठका झाल्या. भरपूर विचारमंथन झाले. त्यातून पुढील ५० वर्षांचा काळ आणि झपाट्याने बदलणारे जग समोर ठेवून घटनादुरुस्ती समितीने विद्यमान घटनेत काही बदल सुचविले आहेत. कार्यकारी मंडळाने त्यास मान्यता दिलेली आहेच. आता आजीव सभासदांसाठी विशेष सर्वसाधारण सभेसमोर ती २८ डिसेंबर २०२४ रोजी ठेवण्यात येणार आहे. त्यात सर्वांगाने विचारमंथन होऊन या घटनेला नवे रूप प्राप्त होईल, अशी खात्री आहे. घटना दुरुस्ती समितीचे निमंत्रक व कार्यकारी मंडळातील माझे ज्येष्ठ सहकारी रवींद्र बेडकिहाळ, सदस्य जे.जे. कुलकर्णी, राजन लाखे यांचा सततचा पाठपुरावा आणि त्यांनी घेतलेले अविश्रांत परिश्रम यामुळे ही घटना दुरुस्ती पूर्णत्वाला जात आहे. मी त्यांचा ऋणी आहे. या कामात प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी तसेच कार्यकारी मंडळातील सर्व सदस्य यांचे जे सहकार्य मला लाभले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

विद्यमान कार्यकारी मंडळाने २०१६ च्या निवडणूक जाहीरनाम्यात जी आश्वासने दिली होती, त्यातील घटना दुरुस्ती हे एकच आश्वासन बाकी राहिले होते. ते पूर्ण होत आहे याचा सर्वाधिक आनंद आहे.

**प्रा.मिलिंद जोशी**
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

जावक क्र. : ३८/२४-२५ दिनांक : २८ नोव्हेंबर २०२४

## ✻ विशेष सर्वसाधारण सभेची सूचना ✻

महाराष्ट्र साहित्य परिषदेची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी पुणे श्रमिक पत्रकार संघ, नवी पेठ, गांजवे चौक, पुणे - ४११०३० येथे दुपारी २.०० वाजता परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, अशी विनंती आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

### ✻ सभेत करावयाचे काम ✻

१) घटनादुरुस्तीबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

आपले,

| | | |
|---|---|---|
| **विनोद कुलकर्णी** | **सुनिताराजे पवार** | **प्रा. मिलिंद जोशी** |
| (कोषाध्यक्ष) | (प्रमुख कार्यवाह) | (कार्याध्यक्ष) |

### ✻ विशेष सूचना ✻

१. पुरेशी गणसंख्या नसल्यास सभा १५ मिनिटे स्थगित करण्यात येईल व नंतर ती रीतसर सुरू होईल. त्या वेळी गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२. प्रस्तावित घटनादुरुस्तीची प्रत आजीव सभासदांना परिषदेच्या www.sahityaparishad.org या संकेतस्थळावर पाहता येईल.

३. सभासदांच्या या संदर्भात काही सूचना असल्यास त्यांनी त्या २१ डिसेंबर २०२४ पर्यंत masaparishad@gmail.com या मेलवर अथवा परिषदेच्या महाराष्ट्र साहित्य परिषद ४९६, सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे - ४११०३० या पत्त्यावर लेखी पाठवाव्यात.

४. मसाप शाखा अध्यक्ष यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व सभासदांना सदर सभेची सूचना कळवावी, ही विनंती.

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम १ | **नाव :**<br>महाराष्ट्र साहित्य परिषद<br>(येथून पुढे महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उल्लेख 'परिषद' असा केला आहे.) | **कलम १ – नाव :**<br>परिषदेचे नाव महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | **स्थळाचा उल्लेख केल्यामुळे** |
| कलम २ | **कार्यालय :**<br>परिषदेचे कार्यालय पुणे येथे राहील. | **कलम २ – मुख्य कार्यालय :**<br>४९६, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ४११०३०. | **मुख्य या शब्दप्रयोगामुळे** |
| कलम ३ | **कार्यक्षेत्र :**<br>परिषदेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, जळगांव, धुळे, नंदूरबार, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चौदा जिल्ह्यांपुरते राहील. | **कलम ३ – कार्यक्षेत्र :**<br>परिषदेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, जळगांव, धुळे, नंदूरबार, ठाणे, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पंधरा जिल्ह्यांपुरते राहील. | **अहमदनगरचे नाव राज्यशासनाने बदलल्यामुळे, जिल्हा संख्या वाढल्यामुळे** |
| कलम ४ | **उद्देश :**<br>मराठी भाषा व साहित्य यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व विकासासाठी प्रयत्न करणे, मराठी भाषा व साहित्य यांच्या अभ्यासास उत्तेजन देणे, मराठी वाचकांची अभिरूची वृद्धिंगत करणे आणि मराठी साहित्यिकांच्या हितासाठी व कल्याणासाठी झटणे हे परिषदेचे उद्देश आहेत. | **कलम ४ – उद्देश :**<br>जगभर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, प्रसारासाठी व विकासासाठी प्रयत्न करणे, मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांच्या अभ्यासास उत्तेजन देणे, मराठी भाषिकांची, मराठी साहित्य वाचकांची अभिरूची वृद्धिंगत करणे आणि मराठी साहित्यिकांच्या हितासाठी व कल्याणासाठी प्रामुख्याने योजना आखून त्याची अंमलबजावणी करणे, तसेच मराठी साहित्यातील विविध उत्कृष्ट ग्रंथांना दरवर्षी पारितोषिके देणे, परिषदेच्या | **उद्देशात काही नवीन सुसंगत बदल केल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ४** | | शाखांना उत्तेजन म्हणून उत्कृष्ट शाखांना विशेष आर्थिक सहकार्य करणे व पारितोषिके देणे, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान मिळविणाऱ्या मराठी साहित्यिकांचा गौरव करणे.<br>(आ) परिषद कार्यक्षेत्रात दरवर्षी वार्षिक मराठी साहित्य संमेलन घेणे, विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिकांचे सत्कार करणे, मराठी भाषेच्या विविध परीक्षांचे आयोजन करणे.<br>मराठी भाषेसमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी कृतिशील राहणे. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सर्व कार्यक्रमांमध्ये नवीन पिढीला समाविष्ट करून घेण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने विशेष योजना राबविणे. इतर भाषांमधील साहित्य मराठी भाषेत अनुवादित करणे, तसेच परिषद कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट मराठी साहित्य अन्य भाषांमध्ये भाषांतरित करण्यासाठी आर्थिक तरतुदीला आधीन राहून स्वतंत्र अनुवाद विभाग सुरू करणे. | |
| **कलम ५** | **साधने :**<br>वरील कलम ४ मधील उद्देश साध्य करण्याकरिता खालील व इतर आवश्यक व योग्य वाटतील त्या साधनांचा उपयोग करण्यात यावा. | **कलम ५ – साधने :**<br>वरील कलम ४ मधील उद्देश साध्य करण्याकरिता खालील व कार्यकारी मंडळास आवश्यक व योग्य वाटतील त्या साधनांचा उपयोग करण्यात यावा. | **कार्यकारी मंडळ शब्द वाढविल्यामुळे.** |
| | (अ) परिषदेच्या कार्यक्षेत्रात विभागीय साहित्य संमेलन भरविणे, महामंडळाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविणाऱ्या संस्थेस मार्गदर्शन करणे | (१) परिषदेच्या कार्यक्षेत्रात वार्षिक मराठी साहित्य संमेलन भरविणे, महामंडळाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविणाऱ्या संस्थेस | **परिशिष्ट क हा शब्द नव्याने घेतल्यामुळे.** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ५** | वा अन्य रितीने साहाय्य करणे. | मार्गदर्शन करणे वा अन्य रितीने साहाय्य करणे. **(परिशिष्ट 'क' पहा)** | |
| ------ | (आ) परिषदेच्या कार्यक्षेत्रात परिषदेच्या शाखा स्थापन करणे आणि स्वतंत्ररित्या साहित्य विषयक कार्य करणाऱ्या संस्थांना परिषदेशी संलग्न करून घेणे. | (२) परिषदेच्या कार्यक्षेत्रात परिषदेच्या शाखा स्थापन करणे, अकार्यक्षम शाखांचे जवळच्या कार्यक्षम शाखेत जिल्हा प्रमुखांच्या शिफारशीने विलिनीकरण करणे आणि स्वतंत्ररित्या साहित्य विषयक कार्य करणाऱ्या संस्थांना कार्यकारी मंडळाच्या संमतीने परिषदेशी संलग्न करून घेता येईल. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | (इ) मराठी भाषा, साहित्य, व्याकरण, साहित्य संशोधन, कोश, वाङ्मय इतिहास, साहित्यशास्त्र, कला, संस्कृती, इ. विषयांवर ग्रंथ लिहून घेणे, संपादित करणे, प्रकाशित करणे / प्रकाशनास देणे वा अशा प्रकारच्या उपक्रमांना शक्य ते सर्व साहाय्य करणे. | (३) मराठी भाषा, साहित्य, व्याकरण, साहित्य संशोधन, विविध वाङ्मय कोश, इतिहास, समाजशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र साहित्यशास्त्र, कला, संस्कृती, प्रसारमाध्यम, इ. विषयांवर ग्रंथ लिहून घेणे, संपादित करणे, प्रकाशित करणे/प्रकाशनास देणे अशा प्रकारच्या उपक्रमांना शक्य ते सर्व साहाय्य करणे. | **प्रसारमाध्यम, समाजशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र शब्द वाढवल्यामुळे** |
| ------ | (ई) साहित्यविषयक व्याख्याने, चर्चा, परिसंवाद, प्रदर्शने आदी घडवून आणणे, वाङ्मयीन स्वरूपाची नियतकालिके चालविणे, मराठी भाषा व साहित्याच्या परीक्षा घेणे, ग्रंथालय चालविणे, परिषदेच्या कार्यक्षेत्रातील वाङ्मयीन उपक्रम करणाऱ्या इतर संस्थांना सहकार्य करणे, इत्यादि कार्य करणे. | (४) साहित्यविषयक व्याख्याने, मुलाखती, चर्चा, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने, ग्रंथप्रकाशन इत्यादी कार्यक्रम आयोजित करणे, वाङ्मयीन स्वरूपाची नियतकालिके चालविणे, मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांच्या प्रसारासाठी मराठी भाषेच्या विविध परीक्षा घेणे व त्यासाठी शासनाची किंवा विविध विद्यापीठांची समकक्षता घेणे, ग्रंथालय चालविणे, परिषदेच्या कार्यक्षेत्रातील वाङ्मयीन उपक्रम करणाऱ्या परिषद शाखा व इतर साहित्य विषयक संस्थांना कार्यकारी मंडळाच्या संमतीने अर्थसहाय्य व वाङ्मयीन सहकार्य करणे, | **काही शब्द जादा घेतल्यामुळे प्रशासकीय सोयीसाठी** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
| --- | --- | --- | --- |
| **कलम ५** | | इत्यादी कार्य करणे. | |
| | (उ) मराठी भाषा व साहित्य यांच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे. | (५) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांच्या संवर्धनासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राज्यशासन व केंद्रशासन, साहित्याशी संबंधित असलेल्या अन्य केंद्र व राज्य पातळीवरील स्वायत्त संस्थांशी संपर्क करून आवश्यक ती उपाययोजना करणे. | **काही शब्द जादा घेतल्यामुळे प्रशासकीय सोयीसाठी** |
| | (ऊ) परिषदेचे उद्देश आणि साधने यांच्याशी सुसंगत आणि अविरोधी कार्य करणाऱ्या पंजीकृत (रजिस्टर्ड) संस्थांना त्यांचे कार्य पुढे चालविण्याच्या दृष्टीने संलग्न करून घेणे किंवा परिषदेत त्यांचे सामिलीकरण करून घेणे. | (६) परिषदेचे उद्देश आणि साधने यांच्याशी सुसंगत आणि अविरोधी कार्य करणाऱ्या पंजीकृत (रजिस्टर्ड) साहित्य संस्थांना त्यांचे कार्य पुढे चालविण्यासाठी कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने संलग्न करून घेणे किंवा अशा संस्थांचे परिषदेत सामिलीकरण करून घेणे. | **शब्दरचना बदलामुळे** |
| | (ए) अन्य भाषांच्या साहित्य संस्थांशी व साहित्य विषयक चळवळींशी आवश्यकतेनुसार सहकार्य करणे. | (७) अन्य भाषांतील साहित्य संस्थांशी व साहित्य विषयक चळवळींशी, त्यांच्या विविध उपक्रमांशी संलग्न राहून साहित्य विषयक उपक्रमांची देवाण-घेवाण करणे. | **शब्दरचना बदलामुळे** |
| **कलम ६** | **वर्षगणना :** परिषदेचे कार्यवर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल. | **कलम ६ - वर्षगणना :** परिषदेचे कार्यवर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल. | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ७** | **सभासद वर्ग :**<br>परिषदेचे सभासद वर्ग पुढीलप्रमाणे असतील –<br>**(अ) उपकर्ते –**<br>रुपये दहा हजार किंवा त्यापेक्षा अधिक वर्गणी देणारे | **कलम ७ – सभासद वर्ग :**<br>परिषदेचे सभासद वर्ग खालील प्रमाणे असतील –<br>(पूर्वीचे कलम रद्द) | **कलम रद्द** |
| | **(आ) आश्रयदाते –**<br>रुपये पाच हजार ते दहा हजार पर्यंत वर्गणी देणारे | **(अ) आश्रयदाते –**<br>२१,००० (रुपये एकवीस हजार) किंवा त्यापेक्षा अधिक देणगी. | **देणगी रक्कमेत बदल झाल्याने** |
| | **(इ) साहाय्यक –**<br>रुपये तीन हजार ते पाच हजार पर्यंत वर्गणी देणारे | (पूर्वीचे कलम रद्द) | **कलम रद्द** |
| | **(ई) हितचिंतक –**<br>रुपये दोन हजार ते तीन हजार पर्यंत वर्गणी देणारे | (पूर्वीचे कलम रद्द) | **कलम रद्द** |
| | **(उ) आजीव –**<br>रुपये एक हजार ते दोन हजारपर्यंत वर्गणी देणारे<br>टिप : एका आर्थिक वर्षात ₹ ५००/– च्या एक याप्रमाणे दोन हप्त्यात वर्गणी देता येईल. मात्र पूर्ण रक्कम भरल्यावरच आजीव सभासदत्व प्राप्त होईल. | **(ब) आजीव सभासद –**<br>अर्ज सादर करताना फक्त एकदाच ₹ ५,०००/– (₹ पाच हजार) फक्त आजीवन वर्गणी भरणारे. | **वर्गणी रक्कमेत बदल झाल्याने** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ७** | **(ऊ) वार्षिक साधारण –**<br>दरवर्षी रुपये शंभर वर्गणी देणारे | (पूर्वीचे कलम रद्द) | **कलम रद्द** |
| ------ | **(ए) प्रतिनिधी सभासद –**<br>संलग्न संस्थांनी नेमलेले प्रतिनिधी | **(क) संलग्न संस्था सभासद –**<br>परिषदेच्या कार्यक्षेत्रातील संलग्न साहित्य संस्थांनी फक्त एकदाच ₹ ५,०००/– (₹ पाच हजार) फक्त भरल्यानंतर सदर संस्था त्यांच्यातर्फे जो एक सभासद ठराव करून कळवतील तो संलग्न प्रतिनिधी म्हणून परिषदेचा सभासद राहील. | **नावात व वर्गणी रक्कमेत बदल व काही शब्दरचना बदल** |
| ------ | **(ऐ) सन्माननीय सभासद –**<br>अलौकिक विद्‌वत्ता अथवा मराठी भाषेची महनीय सेवा या गुणांसाठी कोणाही साहित्यिकास किंवा जीवनाच्या विविध क्षेत्रात महनीय कर्तृत्व दाखविलेल्या कोणाही व्यक्तीस परिषदेचे सन्माननीय सभासद करता येईल. अशी लेखी सूचना परिषदेच्या दहा सभासदांनी केल्यास त्या सूचनेचा कार्यकारी मंडळाने विचार करून निर्णय घ्यावा. सदर निर्णय लगतच्या वार्षिक साधारण सभेपुढे माहितीसाठी ठेवावा. | **(ड) सन्माननीय मानद सभासद –**<br>मराठी भाषा, साहित्य व संस्कृती, शिक्षण, सामाजिक, प्रसारमाध्यमे, संशोधन विविध क्षेत्रातील उल्लेखनीय व असाधारण कर्तृत्ववान अशा मान्यवर व्यक्तींना सन्माननीय मानद सभासद म्हणून नियुक्त केले जाईल. ही नियुक्ती परिषदेच्या कार्यकारी मंडळात बहुमताने होईल. त्यासाठी परिषदेच्या कोणत्याही वर्गातील एकूण दहा सभासदांची लेखी शिफारस आवश्यक राहील. | **शब्दरचना बदल** |
| | (टीप : वरील अ ते उ आणि ऐ या वर्गातील सभासद हे परिषदेचे आजीव सभासद म्हणून गणले जातील.) | १) वरील सभासद वर्गातील क्र. अ व ब या वर्गातील सभासदांना परिषद निवडणुकीत व वार्षिक सभेत मतदानाचा अधिकार असेल. 'क' वर्गातील सभासदांना फक्त वार्षिक सभेस उपस्थित राहण्याचा व सभेतील विषयाबाबत मतदान झाल्यास त्यावरील मतदानाचा अधिकार असेल. या सभासदांना | **टीप रद्द केल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ७** | | परिषद निवडणुकांस उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही व त्यांना मतदानाचा अधिकारही असणार नाही. | |
| | | २) वरील अ, ब, क सभासद वर्गातील अर्ज ज्या जिल्ह्यातील असतील त्या जिल्हा प्रमुखांची लेखी शिफारस असेल तरच कार्यकारी मंडळ त्यांचे सभासदत्व मंजूर करेल. अशी 'शिफारस नसलेले' अर्ज परिषदेत स्वीकारले सुद्धा जाणार नाहीत. | **जादा पोटकलम घेतल्यामुळे** |
| | | ३) 'ड' सन्माननीय मानद सभासद वर्गातील सभासद परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील व एखाद्या विषयाबाबत मार्गदर्शन करू शकतील. पण त्यांना वार्षिक सभेतील एखाद्या विषयावर मतदान असेल तर आणि परिषदेच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही व मतदानाचा अधिकार असणार नाही. | **जादा पोटकलम घेतल्यामुळे** |
| **कलम ८** | **सभासदत्वास मान्यता/ सभासदत्व रद्द करणे, इत्यादी :** (अ) परिषदेचे उद्देश, घटना व नियम मान्य असलेल्या १८ वर्षावरील कोणाही व्यक्तीला संस्थेचे सभासद होता येईल. | **कलम ८– सभासदत्वास मान्यता/सभासदत्व रद्द करणे, इत्यादी :** (१) परिषदेचे उद्देश, घटना व नियम मान्य असलेल्या १८ वर्षावरील कोणाही व्यक्तीला संस्थेचे सभासद होता येईल. | **बदल नाही** |
| | (आ) परिषदेचे सभासद होऊ इच्छिणाऱ्या अशा कोणीही व्यक्तीने पूर्ण वर्गणीसह परिषदेच्या विहित छापील नमुन्यात अर्ज केला पाहिजे. | (२) परिषदेचे सभासद होऊ इच्छिणाऱ्या अशा कोणीही व्यक्तीने पूर्ण वर्गणीसह परिषदेच्या विहित छापील नमुन्यात अर्ज केला पाहिजे. | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम ८ | (इ) या अर्जावर सूचक आणि अनुमोदक म्हणून परिषदेच्या कोणत्याही २ (दोन) आजीव सभासदांची सही असणे आवश्यक आहे. | (३) या अर्जावर सूचक आणि अनुमोदक म्हणून परिषदेच्या कोणत्याही २ (दोन) आजीव सभासदांची व संबंधित जिल्हा प्रमुखांची शिफारस व सही असणे आवश्यक आहे. | **प्रतिनिधी ऐवजी जिल्हा प्रमुख शब्द घेतल्यामुळे** |
| | (ई) अशा तऱ्हेचा अर्ज परिषदेचे कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह यांच्यापैकी कोणाही दोघांनी एकमताने मंजूर केल्यानंतर आणि तसे त्या अर्जदारास लेखी स्वरूपात कळविल्यानंतरच त्या व्यक्तीस परिषदेचे सभासदत्व प्राप्त होईल. | (४) अशा तऱ्हेचा अर्ज कार्यकारी मंडळात मंजूर झाल्यावर परिषदेचे प्रमुख कार्यवाह यांच्या सहीने अर्जदारास लेखी स्वरूपात कळविल्यानंतरच त्या व्यक्तीस परिषदेचे सभासदत्व प्राप्त होईल. | **मंजुरीचे अधिकारात बदल केल्यामुळे** |
| | (उ) अशा मान्यताप्राप्त सभासदांची नावे प्रमुख कार्यवाह यांनी कार्यकारी मंडळाच्या सभेपुढे माहितीसाठी ठेवावीत. | (५) अशा मान्यताप्राप्त सभासदांची नावे प्रमुख कार्यवाह यांनी कार्यकारी मंडळाच्या सभेपुढे माहितीसाठी ठेवावीत व त्याची इतिवृत्तात नोंद करावी. | **इतिवृत्तात नोंद करावी हा नवीन शब्द** |
| | (ऊ) कोणाही व्यक्तीचा सभासदत्वासाठी केलेला अर्ज मंजूर करण्याचा वा नाकारण्याचा हक्क समितीला राहील. | (६) कोणाही व्यक्तीचा सभासदत्वासाठी केलेला अर्ज मंजूर करण्याचा वा नाकारण्याचा हक्क कार्यकारी मंडळाला राहील. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | (ए) अर्ज मिळाल्यापासून १५ दिवसात सभासदत्वाबद्दल केलेल्या अर्जाचा निर्णय अर्जदाराला कळविण्यात येईल. | (७) अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसात सभासदत्वाबाबत केलेल्या अर्जाचा निर्णय अर्जदाराला प्रमुख कार्यवाहाकडून कळविण्यात येईल. | **संख्या शब्दरचना बदल झाल्यामुळे** |
| | (ऐ) वार्षिक साधारण सभासदासाठी वर्गणीचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे | (पूर्वीचे कलम रद्द) | **पोटकलम रद्द** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ८** | राहील. वार्षिक साधारण सभासदाने ३१ जुलैपर्यंत वर्गणी भरली नाही, तर त्या सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द होईल. | (पूर्वीचे पोटकलम रद्द) | **पोटकलम रद्द** |
| | (ओ) परिषदेच्या उद्देशांशी विरोधी वर्तन करणाऱ्या वा परिषदेचे हितसंबंध व प्रतिष्ठा यांना बाधा आणणाऱ्या सभासदाचे सभासदत्व तात्पुरते स्थगित ठेवण्याचा किंवा कायमचे रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. मात्र अशा प्रसंगी त्या सभासदाची बाजू लेखी स्वरूपात, त्याला १५ दिवसाची मुदत देऊन मागवून घेऊन नंतरच कार्यकारी मंडळाने निर्णय करावा व याची माहिती वार्षिक सभेत द्यावी. | (८) परिषदेच्या उद्देशांशी विरोधी वर्तन करणाऱ्या वा परिषदेचे हितसंबंध व प्रतिष्ठा यांना बाधा आणणाऱ्या तसेच वृत्तपत्रातून लिखित स्वरुपात व समाज माध्यमातून परिषदेची बदनामी करणाऱ्या सभासदाचे सभासदत्व तात्पुरते स्थगित ठेवण्याचा किंवा कायमचे रद्द करण्याचा अधिकार वार्षिक सभेला राहील. मात्र त्या आधी त्या सभासदाची बाजू लेखी स्वरूपात, त्याला ३० दिवसाची मुदत देऊन मागवून घेऊन नंतरच कार्यकारी मंडळाने त्यावर निर्णय घेऊन शिफारस वार्षिक सभेला पाठवावी. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | (औ) मृत्यू, राजीनामा, फौजदारी व अनैतिक वर्तणुकीच्या गुन्ह्याबद्दल झालेली शिक्षा यामुळे सभासदत्व रद्द होईल. | (९) मृत्यू, राजीनामा, फौजदारी व अनैतिक वर्तणुकीच्या गुन्ह्याबद्दल झालेली शिक्षा, वार्षिक सभेने सभासदत्व रद्द केल्यामुळे सभासदत्व रद्द होईल. | **शब्दरचना बदल** |
| **कलम ९** | **सभासदाचे हक्क :**<br>१) सभासदाला परिषदेच्या सर्व प्रकट कार्यक्रमांना हजर राहता येईल आणि सर्वसाधारण सभांना हजर राहता येईल व आवश्यक तेथे मदत करता येईल. | **कलम ९ – सभासदाचे हक्क :**<br>१) सभासदाला परिषदेच्या सर्व प्रकट कार्यक्रमांना व परिषदेच्या वार्षिक सभेला हजर राहता येईल. | **बदल नाही** |
| | २) कार्यकारी मंडळाने गुप्त म्हणून ठेवलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे, हिशोब, दप्तर, इत्यादी १५ दिवसांची लेखी सूचना देऊन परिषदेच्या कार्यालयात | २) कार्यकारी मंडळाने गुप्त म्हणून ठेवलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे, हिशोब, इत्यादी १५ दिवसांची लेखी सूचना प्रमुख कार्यवाहांना देऊन त्यांच्या | **प्रशासकीय सोयीसाठी** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ९** | कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पहावयास मागता येईल. | परवानगीने परिषदेच्या कार्यालयात कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत फक्त पाहता येईल. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ३) परिषदेच्या ग्रंथालयाचा व अतिथीगृहाचा वेळोवेळी ठरविलेल्या नियमांनुसार लाभ घेता येईल. | ३) परिषदेच्या ग्रंथालयाचा व अतिथीगृहाचा कार्यकारी मंडळाने वेळोवेळी ठरविलेल्या नियमांनुसार लाभ घेता येईल. | **'कार्यकारी मंडळाने' अशी शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ४) प्रतिनिधीत्वाची वेगळी वर्गणी भरून अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे प्रतिनिधी होता येईल. | ४) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ वेळोवेळी ठरवेल त्यानुसारचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या प्रतिनिधीत्वाचे शुल्क भरून सदर साहित्य संमेलनाचे प्रतिनिधी होता येईल. | **काही शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ५) परिषदेचे त्रैमासिक 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' विनामूल्य मिळेल. | ५) परिषदेचे त्रैमासिक 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' फक्त आजीव सभासदांना कार्यकारी मंडळ ठरवेल त्या नियमानुसार व योग्य देणगीमूल्यासह मिळेल. तसेच जे सभासद आपला ई-मेल, व्हॉटस्अप नंबर देतील त्यांना इंटरनेटवरून, परिषदेच्या वेबसाईटवरून सदर पत्रिका वाचावयास मिळेल. | **काही शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ६) परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीत फक्त आजीव सदस्यांना उभे राहता येईल व मत देता येईल. (स्पष्टीकरण- निवडणुकीपूर्वी किमान एक वर्ष आजीव सदस्य असलेल्या परिषदेच्या कार्यक्षेत्रातील सभासदास हा हक्क राहील.) | ६) परिषदेच्या दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत फक्त आजीव सदस्यांना उभे राहता येईल व मत देता येईल. (स्पष्टीकरण- निवडणुकीपूर्वी किमान दोन वर्ष आजीव सदस्य असलेल्या परिषदेच्या कार्यक्षेत्रातील सभासदास हा हक्क राहील.) याबाबतचे सविस्तर नियम परिषद नियुक्त निवडणूक मंडळ ठरवेल. **(परिशिष्ठ अ पहावे)** | **वर्ष संख्येत शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम ९ | ७) निवडणुकीपूर्वी सलग किमान तीन वर्षे पूर्ण वर्गणी भरून वार्षिक साधारण सभासद असलेल्या परिषदेच्या कार्यक्षेत्रातील व्यक्तीस फक्त मतदान करता येईल. मात्र त्यांना निवडणुकीस उभे राहता येणार नाही. | (पूर्वीचे पोटकलम रद्द) | **पोटकलम रद्द** |
| कलम १० | **पदाधिकारी :**<br>**अ) परिषदेचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे असतील -**<br>अध्यक्ष- १, उपाध्यक्ष- ३, कार्याध्यक्ष- १, कोषाध्यक्ष- १, प्रमुख कार्यवाह- १, कार्यकारी मंडळावर निवडून आलेले स्थानिक कार्यवाह- ६, पुण्याबाहेरचे कार्यवाह- २, कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेला पत्रिका संपादक- १ | **कलम १० - पदाधिकारी रचना :**<br>**अ) परिषदेचे पदाधिकारी खालीलप्रमाणे असतील -**<br>अध्यक्ष- १, उपाध्यक्ष- ४, कोषाध्यक्ष- १,<br>प्रमुख कार्यवाह - १, कार्यवाह- ७, स्वीकृत - २<br>विभागीय कार्यवाह- २, कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेला मसाप साहित्य पत्रिकेचा संपादक- १ | **पदसंख्येत शब्दरचनेत बदल झाल्यामुळे** |
| | **आ) पदाधिकारी समिती :**<br>या समितीत कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कार्यकारी मंडळावर निवडून आलेले सहा स्थानिक कार्यवाह आणि पत्रिका संपादक यांचा समावेश असेल. | **आ) पदाधिकारी समिती रचना :**<br>१) पदाधिकारी समितीमध्ये अध्यक्ष, कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कार्यवाह- ७, विभागीय कार्यवाह- २, मसाप पत्रिका संपादक-१ अशा एकूण १३ सदस्यांची समिती असेल.<br>२) सदर समितीच्या सभेचे निमंत्रक प्रमुख कार्यवाह असतील. या समितीचे इतिवृत्त व कामकाज नोंद ठेवणे, ही त्यांची जबाबदारी असेल. समितीची सभा दर पंधरा दिवसांनी सोयीच्या वेळेत होईल. पदाधिकारी समिती मधील मंजूर निर्णयाची माहिती निमंत्रकांनी नजीकच्या कार्यकारी मंडळात सादर | **शब्दरचना बदल व संख्या बदलामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १०** | | करणे बंधनकारक राहिल. | |
| ------ | ----------------------------------------- | ----------------------------------------- | --------------- |
| **कलम ११** | **निवडणूक :**<br>अ) परिषदेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक दर पाच वर्षांनी होईल. ही निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने व लेखी स्वरूपात होईल. प्रचलित कार्यकारी मंडळाचा पंचवार्षिक कार्यकाल संपण्यापूर्वी १५ दिवस आधी नव्या कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचा निकाल जाहीर होईल. | **कलम ११ – कार्यकारी मंडळाची रचना :**<br>१) परिषदेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक दर पाच वर्षांनी होईल. ही निवडणूक कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या तीन सदस्यीय निवडणूक मंडळातर्फे गुप्त व पोस्टल बॅलेट पद्धतीने होईल. प्रचलित विद्यमान कार्यकारी मंडळाची मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस आधी नव्या कार्यकारी मंडळाची व पदाधिकाऱ्यांची निवड निवडणूक मंडळाने जाहीर करावयाची आहे. निवडणूक मंडळ पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने स्वतंत्र, पण परिषद घटनेशी सुसंगत अशी निवडणूक नियमावली तयार करेल. मात्र सदर नियमावली कार्यकारी मंडळाने मंजूर केली पाहिजे. त्यासाठी निवडणूक मंडळ **परिशिष्ट 'अ'** पाहावे. | **काही नवीन शब्द व शब्दरचना बदल केल्यामुळे** |
| ------ | ----------------------------------------- | ----------------------------------------- | --------------- |
| | आ) परिषदेच्या खालील पदाधिकाऱ्यांची निवड परिषदेच्या सर्व सभासदांनी करावयाची आहे.<br>(१) कार्याध्यक्ष (२) कोषाध्यक्ष (३) प्रमुख कार्यवाह<br>(टीप : पुणे महानगरपालिका क्षेत्रात पुणे लष्करसह राहणारे परिषदेचे आजीव सभासदच वरील पदांसाठी उभे राहण्यास पात्र आहेत.) | २) खालील पदाधिकाऱ्यांची व कार्यकारी मंडळाची निवडणूक, निवडणुकीपूर्वी दोन वर्ष सभासद असलेल्या आजीव व पात्र सभासदांमधून होईल.<br>**पदाधिकारी** – अध्यक्ष– १, प्रमुख कार्यवाह– १, कोषाध्यक्ष – १ या तिन्ही पदासाठी परिषदेच्या कार्यक्षेत्रातील मंजूर मतदार यादीतील कोणीही आजीव सदस्य निवडणूक लढवू शकतील. मात्र या तिन्ही पदासाठी कमाल वयोमर्यादा ७५ पूर्ण पर्यंतच असेल. त्यासाठी या पदासाठी इच्छुक आजीव सदस्याने अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा जोडला पाहिजे. त्याचे नियम परिषद निवडणूक मंडळ ठरवेल. **(परिशिष्ट अ नुसार)** | **प्रशासकीय सोयीसाठी** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| **कलम ११** | **इ) कार्यकारी मंडळाच्या सभासदांसाठी खाली दर्शविल्याप्रमाणे क्षेत्रवार आणि संख्या तत्त्वावर निवड करण्यात येईल. या संबंधीचे निकष पुढीलप्रमाणे –** | **कार्यकारी मंडळाच्या जिल्हा प्रमुखाची निवडणूक खालीलप्रमाणे होईल –** | |
| | (१) जिल्ह्यामध्ये किमान ५० (पन्नास) आजीव सदस्य असल्यास त्या जिल्ह्याचा कार्यकारी मंडळावर एक प्रतिनिधी असेल. | १) परिषदेच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यात किमान १०० आजीव सदस्य असल्यास त्यातून कार्यकारी मंडळावर एक जिल्हा प्रमुख या जिल्ह्यातील पात्र आजीव सभासद यामधून निवडणुकीने निवडला जाईल. याचे नियम परिषद नियुक्त निवडणूक मंडळ ठरवेल. | **शब्दरचना व संख्या बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | (२) ज्या जिल्ह्यातील आजीव सदस्य संख्या ५०० (पाचशे) पूर्ण असेल, त्या जिल्ह्याचे कार्यकारी मंडळावर २ (दोन) प्रतिनिधी निवडले जातील. | २) ज्या जिल्ह्यातील पात्र आजीव सदस्य संख्या ५०० पूर्ण असतील त्या जिल्ह्यातून पात्र आजीव सदस्यातून कार्यकारी मंडळावर दोन जिल्हा प्रमुख निवडून येतील. याचे नियम परिषद नियुक्त निवडणूक मंडळ ठरवेल. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | (३) ज्या जिल्ह्यातील आजीव सदस्य संख्या एक हजार किंवा अधिक असेल त्या जिल्ह्याचे कार्यकारी मंडळावर ३ (तीन) प्रतिनिधी निवडले जातील. | ३) ज्या जिल्ह्यातील आजीव सदस्य संख्या १००० पेक्षा जास्त असेल अशा जिल्ह्यातील पात्र आजीव सदस्यातून कार्यकारी मंडळावर तीन जिल्हा प्रमुख निवडले जातील. याचे नियम परिषद नियुक्त निवडणूक मंडळ ठरवेल. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | (४) कोणत्याही जिल्ह्याचे कार्यकारी मंडळावर जास्तीत जास्त तीन प्रतिनिधी असतील. | ४) कोणत्याही जिल्ह्याचे कार्यकारी मंडळावर तीनपेक्षा जास्त जिल्हा प्रमुख असणार नाहीत. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ११** | (५) पुणे महानगरपालिका क्षेत्र या विभागातून कार्यकारी मंडळावर तीन सर्वसाधारण प्रतिनिधी व ६ (सहा) विशेष प्रतिनिधी असे एकूण ९ (नऊ) प्रतिनिधी निवडण्यात येतील. | ५) पुणे महानगरपालिका विभागातून कार्यकारी मंडळावर ७ प्रतिनिधींची कार्यवाह म्हणून निवड निवडणूकीने होईल. मात्र त्यांची कमाल वयोमर्यादा ७५ वर्षे पूर्ण पर्यंतच असेल. याचे नियम परिषद नियुक्त निवडणूक मंडळ ठरवेल. | **संख्या बदल, वयोमर्यादा नवीन शब्द** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (६) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सभासदांनी एकूण जे ९ प्रतिनिधी निवडायचे आहेत त्यांची विभागणी खालीलप्रमाणे राहील –<br>१) इतर जिल्ह्याप्रमाणे ३ साधारण प्रतिनिधी<br>२) केंद्र कार्यालयातील खालीलप्रमाणे जबाबदारी पार पाडण्यासाठी ६ विशेष प्रतिनिधी हे सर्व प्रतिनिधी 'स्थानिक कार्यवाह' असतील व खालील विभागांचे निमंत्रक असतील –<br>स्थानिक कार्यवाह :<br>स्था.का.क्र. १) वर्षभरातील व्याख्याने, स्मृतीदिन, इ. कार्यक्रम<br>स्था.का.क्र. २) समारंभपूर्वक पारितोषिके द्यावयाचे कार्यक्रम व त्या त्या वर्षातील विशेष कार्यक्रम<br>स्था.का.क्र. ३) वार्षिक ग्रंथ निवड (वार्षिक ग्रंथ पारितोषिकांसाठी)<br>स्था.का.क्र. ४) परीक्षा विभाग<br>स्था.का.क्र. ५) ग्रंथालय विभाग<br>स्था.का.क्र. ६) अतिथी निवास व्यवस्थापक, वास्तू देखभाल<br>निवडणुकीत या ६ प्रतिनिधींसाठी वेगळे आवेदन पत्र असेल. आपण कोणती | ६) या कार्यवाहांचा कार्यकाळ कार्यकारी मंडळाच्या मुदतीइतकाच असेल. यापैकी एखाद्याने पदाचा राजीनामा दिला तर कार्यकारी मंडळ त्या जागी अन्य कार्यवाहाची नियुक्ती उर्वरित काळासाठी बहुमताने करेल.<br>या सात कार्यवाहांची जबाबदारी खालीलप्रमाणे असेल –<br>कार्यवाह क्र.१ – वर्षभरातील व्याख्याने, स्मृतीदिन इ. कार्यक्रम.<br>कार्यवाह क्र.२ – वार्षिक ग्रंथ निवड (वर्धापनदिनी दिली जाणारी ग्रंथ व ग्रंथकार पारितोषिके)<br>कार्यवाह क्र.३ – वर्षभर द्यावयाची ग्रंथ विशेष पारितोषिके<br>कार्यवाह क्र. ४ – ग्रंथालय विभाग<br>कार्यवाह क्र. ५ – परीक्षा विभाग<br>कार्यवाह क्र. ६ – वास्तू देखभाल<br>कार्यवाह क्र. ७ – वार्षिक पारितोषिके (मसाप जीवनगौरव, उत्कृष्ट कार्यकर्ता व शाखा पारितोषिके) | **काही जबाबदारी वाढविल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ११** | जबाबदारी स्वीकारीत आहोत ते संबंधित उमेदवाराने त्यात नमूद केले पाहिजे. | | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| ------ | (ई) पुण्यातील 'स्थानिक कार्यवाह' पदांवरील प्रतिनिधींसाठी विशेष नोंद- विशिष्ट कामाची जबाबदारी स्वीकारलेली संबंधित व्यक्ती ते काम पार पाडू शकत नसेल तर पदाधिकारी समिती त्याबाबत निर्णय घेईल व त्या व्यक्तीस जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल. असे झाल्यास त्या व्यक्तीचे कार्यकारी मंडळावरील प्रतिनिधीत्व संपुष्टात येईल. त्याच्या जागी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती कार्यकारी मंडळ करील. | ६) (३) कार्यकारी मंडळावर दोन सदस्य स्वीकृत म्हणून घेण्यात येतील. सदर नियुक्ती प्रत्येकी एक वर्षाकरिता असेल व त्यांच्या स्वीकृतीचा अधिकार मुख्य तीन पदाधिकाऱ्यांकडे असेल. मात्र त्यांची कमाल वयोमर्यादा ७५ वर्षे पूर्ण अशी राहील. या दोन स्वीकृत सभासदांपैकी एक महाविद्यालयीन, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांपैकी एक असेल. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | (उ) निर्वाचन मंडळावरील जागा रिकामी झाल्यास मंडळाच्या इतर दोन सदस्यांनी तिसऱ्या जागेवर योग्य व्यक्तीची निवड करावी. | (कलम रद्द) | **निर्वाचन मंडळ कामकाज स्वतंत्र तरतूद असल्याने** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | (ऊ) कार्यकारी मंडळाने निवडणुकीसाठी मतदानास पात्र असलेल्या मतदार सभासदांची यादी निवडणुकीच्या निकालाच्या दिवसापूर्वी तीन महिने आधी जाहीर करावी व तिची एक प्रत निर्वाचन मंडळाच्या स्वाधीन करावी. | (कलम रद्द) | **निर्वाचन मंडळ कामकाज स्वतंत्र तरतूद असल्याने** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | (ए) निवडणुकीच्या निकालाच्या दिवसाच्या निदान एक ते दिड महिना अगोदर सुचित उमेदवारांची नावे सूचक व अनुमोदक यांच्या व सुचित उमेदवाराच्या सहीसह निर्वाचन मंडळाकडे लेखी स्वरूपात अर्जाच्या विहित छापील नमुन्यात दाखल होणे आवश्यक आहे. सूचक, अनुमोदक आणि सूचित उमेदवार | कलम रद्द | **सदर मजकुर स्वतंत्रपणे निवडणूक कलमात समाविष्ट** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ११** | मतदार यादीतील परिषदेचे आजीव सभासद असले पाहिजेत. निवडणुकीच्या मतपत्रिका मतदारांकडे निवडणुकीच्या निकालाच्या दिवसाच्या निदान तीन आठवडे आधी टपालाने रवाना झाल्या पाहिजेत. | | |
| | (ऐ) निवडणुकीस पात्र असलेल्या सभासदांचे नाव एकापेक्षा अधिक पदांसाठी सुचविता येईल, परंतु प्रत्यक्ष निवडणुकीत फक्त एकाच पदासाठी निवडणुकीस उभे राहता येईल. | कलम रद्द | **सदर मजकूर स्वतंत्रपणे निवडणूक कलमात समाविष्ट** |
| **कलम १२** | **कार्यकारी मंडळाची रचना :** (अ) परिषदेचे कार्यकारी मंडळ जिल्हा प्रतिनिधींच्या संख्येनुसार असेल. १) कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह- (परिषदेच्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदार सभासदांनी निवडलेले) | **कलम १२ - कार्यकारी मंडळाची रचना :** १) परिषदेच्या निवडणूक मंडळाकडून निर्वाचित म्हणून जाहीर केलेले अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष, कार्यवाह यांचेसह जिल्हा प्रमुख मिळून कार्यकारी मंडळ होईल. | **शब्दरचना बदल प्रशासकीय सोयीसाठी** |
| | २) निर्वाचित सभासद - (जिल्हावार प्रतिनिधी) कार्यकारी मंडळाने आपल्या पहिल्या सभेत परिषदेचे १ (एक) अध्यक्ष, ३ (तीन) उपाध्यक्ष, पुण्याबाहेरील २ (दोन) कार्यवाह यांची निवड करावी. कार्यकारी मंडळाच्या नवनिर्वाचित सदस्यांनी आपल्या पहिल्या बैठकीत पत्रिका संपादकाची निवड करावी. हा संपादक कार्यकारी मंडळापैकी किंवा बाहेरील पण परिषदेच्या कार्यक्षेत्रातील आजीव सदस्यांतून नियुक्त करता येईल. संपादक कार्यकारी मंडळाच्या बाहेरचा असल्यास त्याला स्वीकृत सदस्य करून घ्यावे. | २) नवनिर्वाचित कार्यकारी मंडळ आपल्या पहिल्या सभेत परिषदेचे उपाध्यक्ष-४ आणि विभागीय कार्यवाह-२ यांची नियुक्ती करेल. | **संख्या बदल, शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १२** | कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटल्यास एक/दोन आजीव सदस्यांना स्वीकृत करून घेता येईल. मात्र स्वीकृत सदस्य घेतलेच पाहिजेत असे बंधन नाही. | | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | | ३) नवनिर्वाचित कार्यकारी मंडळ आपल्या पहिल्या सभेत महाराष्ट्र साहित्य पत्रिका संपादकाची नियुक्ती कार्यकारी मंडळातून किंवा बाहेरील योग्य आजीव सभासद असणाऱ्या व्यक्तीची बहुमताने निवड करेल. परंतु सदर सभासदास पदवी शिक्षणानंतर १० वर्षे शिक्षण, साहित्य व पत्रकारिता याचा अनुभव असला पाहिजे व त्याची किमान वयोमर्यादा ४० व कमाल ७५ वर्षे पूर्ण अशी असेल. मसाप पत्रिकेसाठी कार्यकारी मंडळ संपादन समिती नियुक्त करेल. त्यामध्ये कार्यकारी मंडळातील ३ सदस्य, आजीव सभासदातून १ यांचा समावेश असेल. तसेच परिषदेचे अध्यक्ष, कोषाध्यक्ष व प्रमुख कार्यवाह हे या समितीचे पदसिद्ध सदस्य असतील. या समितीचे व्यवस्थापन प्रमुख म्हणून प्रमुख कार्यवाह असतील व ते या पत्रिकेचे प्रकाशक असतील. अध्यक्ष, प्रमुख कार्यवाहच्या देखरेखीखाली संपादकाने काम करणे बंधनकारक आहे. संपादकाची निवड दोन वर्षासाठी असेल. मुदतवाढ देण्याचा वा नाकारण्याचा निर्णय अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष घेतील. | **प्रशासकीय सोयीसाठी व संपादकांची नियुक्ती नियम नवीन घेतल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम १३** | **कार्यकारी मंडळाची कामे :**<br>(अ) परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा वर्षातून एकदा व कार्यकारी मंडळाच्या सभा दर चार महिन्यांनी एकदा अशा वर्षातून तीन वेळा भरविणे. | **कलम १३ - कार्यकारी मंडळाची कामे :**<br>१) परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा आर्थिक वर्ष ३१ मार्चला संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत बोलावली पाहिजे. तसेच कार्यकारी मंडळाच्या सभा | **सभा संख्या शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १३** | | दर तीन महिन्यातून एकदा अशा वर्षातून चार सभा बोलावल्याच पाहिजेत. आवश्यकता वाटल्यास एखादी जादा सभा पदाधिकारी समितीच्या मंजूरीने बोलावण्यात येईल. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (आ) पंचवार्षिक निवडणुकांची व्यवस्था पाहणे. | २) परिषदेच्या निवडणुकीसाठी निवडणूक मंडळ नियुक्त करणे. या मंडळात तीन सदस्य असतील. त्यापैकी एक कायदा क्षेत्रातील १० वर्षे अनुभव असलेला, एक निवृत्त न्यायमूर्ती व एक सामाजिक, शिक्षण, साहित्य, सहकार क्षेत्रातील निवडणुकीचा अनुभव असलेली मान्यवर व्यक्ती अशा तिघांचा समावेश असेल. परिषद निवडणुकीच्या आधी चार महिने निवडणूक मंडळाची नियुक्ती कार्यकारी मंडळ करेल व त्यानंतर १५ दिवसात निवडणूक मंडळ कार्यरत झाले पाहिजे. **परिशिष्ट 'अ' पहा.** | **निवडणूक मंडळ स्वतंत्र केल्यामुळे शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (इ) अ.भा.मराठी साहित्य महामंडळावर पाठविण्यासाठी कार्याध्यक्ष व प्रमुख कार्यवाह या पदसिद्ध प्रतिनिधी खेरीज एका प्रतिनिधीची निवड कार्यकारी मंडळाच्या सभासदांतून करणे. | ३) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर परिषद प्रतिनिधी म्हणून अध्यक्ष व प्रमुख कार्यवाह हे पदसिद्ध असतील. त्याशिवाय कार्यकारी मंडळातून एका सदस्याची ३१ मार्चपूर्वीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत एका वर्षासाठी निवड करण्यात येईल. महामंडळावरील महाकोष निधी समितीवर कार्यकारी मंडळातून दोन सदस्यांची निवड करण्यात येईल व त्यांचा कार्यकाळ अखिल भारतीय साहित्य महामंडळ घटनेप्रमाणे पाच वर्षासाठीच असेल. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | | ४) महामंडळाचे कार्यालय परिषदेकडे आल्यानंतर परिषदेचे कोषाध्यक्ष | **नवीन कलम घातल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
| --- | --- | --- | --- |
| **कलम १३** | | महामंडळाचे तिसरे प्रतिनिधी व कोषाध्यक्ष राहतील. इतर वेळी तिसरा प्रतिनिधी म्हणून कार्यकारी मंडळातील सदस्य महामंडळ प्रतिनिधी म्हणून जाईल. मात्र वर्षभराच्या कामाचा अहवाल देणे त्या सदस्याला बंधनकारक राहील. | |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | -------------- |
| | (ई) परिषदेचा कारभार व्यवस्थितरित्या चालविण्यासाठी विविध उपसमित्या नेमणे. | ५) परिषदेचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे विविध उपसमित्या मा. अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात येतील. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | -------------- |
| | | ६) परिषदेच्या कोणत्याही कार्यात आवश्यकता असेल तेव्हा तसेच परिषद निवडणुकीमध्ये कायदेशीर सल्ला देणेसाठी विधीज्ञाची नियुक्ती कार्यकारी मंडळ करेल. त्याचे पद **'परिषद कायदा सल्लागार'** म्हणून असेल व त्याची मुदत नियुक्तीपासून २ वर्षे असेल. सदर पदासाठी किमान ५ वर्षाच्या धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अथवा न्यायालयीन कामकाजाचा अनुभव असला पाहिजे. आवश्यकता वाटेल तेव्हा अध्यक्ष या कायदा सल्लागारास कार्यकारी मंडळ, पदाधिकारी समिती व सर्व प्रकारच्या वार्षिक, विशेष साधारण, मागणीच्या साधारण सभा यामध्ये मार्गदर्शनासाठी निमंत्रित करू शकतील. या कायदा सल्लागाराचे मानधन पदाधिकारी ठरवतील. | **नवीन कलम घातल्यामुळे** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | -------------- |
| **कलम १४** | **पदाधिकाऱ्यांची कामे/अधिकार/इत्यादि :**<br>(१) अध्यक्ष –<br>(अ) परिषदेचे अध्यक्ष हेच परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण, विशेष सर्वसाधारण | **कलम १४ – पदाधिकाऱ्यांची कामे/अधिकार :**<br>**(१) अध्यक्ष :**<br>अ) परिषदेचे अध्यक्ष हेच परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष | <br><br>**शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
| --- | --- | --- | --- |
| **कलम १४** | आणि मागणी सभेचे अध्यक्ष राहतील. | साधारण सभा आणि मागणीच्या साधारण सभेचे अध्यक्ष राहतील. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (आ) परिषदेच्या अध्यक्षांना ८ दिवसांची लेखी पूर्वसूचना देऊन कार्याध्यक्षांच्या संमतीने प्रमुख कार्यवाहांमार्फत संस्थेचे कोणतेही कागदपत्र वा दप्तर पाहण्याचा अधिकार राहील. | कलम रद्द | **कलम रद्द** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (इ) उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह यांचे राजीनामे संमत करण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील. मात्र त्या त्या पदाधिकाऱ्याने आपले राजीनाम्याचे पत्र आधी प्रमुख कार्यवाहाकडे सुपूर्त करावे. प्रमुख कार्यवाहने त्याचे राजीनाम्याचे पत्र कार्याध्यक्षांकडे सुपूर्त करावे. | क) उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह यांचे राजीनामे संमत करण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील. मात्र त्या त्या पदाधिकाऱ्याने आपले राजीनाम्याचे पत्र आधी प्रमुख कार्यवाहकडे सुपूर्त करावे. प्रमुख कार्यवाहने त्याचे राजीनाम्याचे पत्र अध्यक्षांकडे सुपूर्त करावे. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (ई) अध्यक्षांना राजीनामा द्यावयाचा झाल्यास तो त्यांनी कार्याध्यक्षांकडे द्यावा. कार्याध्यक्षांनी तो पदाधिकारी समितीपुढे ठेवावा. पदाधिकारी समितीने तो राजीनामा मंजूर केल्यास, कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत, नवीन अध्यक्षांची निवड होईपर्यंतच्या काळात परिषदेच्या एका उपाध्यक्षांना कार्याध्यक्षांनी अध्यक्षपदाचा कार्यभार सांभाळण्यास सांगावे. | ड) अध्यक्षांना राजीनामा द्यावयाचा झाल्यास तो त्यांनी प्रमुख कार्यवाहकडे द्यावा व त्यांनी तो राजीनामा नजीकच्या कार्यकारी मंडळात ठेवावा. कार्यकारी मंडळाने सदर राजीनामा मंजूर केल्यास कार्यकारी मंडळाच्या त्याच सभेत नवीन अध्यक्षाची निवड करण्यात येईल. नवीन अध्यक्षाची निवड होईपर्यंत अध्यक्षांचा प्रभारी कार्यभार प्रमुख कार्यवाह यांनी सांभाळावा. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | | **(२) अध्यक्षांची इतर कामे :** | |
| ------ | | (१) कार्यकारी मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व सभेचे नियंत्रण करणे. | |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (२) पदाधिकारी समितीचा अध्यक्ष म्हणून काम पाहणे. | **कलम २ कार्याध्यक्ष पदनाम बदलल्यामुळे अध्यक्षांची कामाची जबाबदारी वाढली त्यामुळे नवीन शब्दरचना** |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (३) परिषदेचे उपाध्यक्ष व विश्वस्त यांच्याशी जरूर तेव्हा संपर्क साधून परिषदेच्या कामकाजाची माहिती त्यांना देणे/त्यांना इतर कोणत्याही मान्यवर व्यक्तीची आवश्यकता वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या सभेला सदर व्यक्तिस निमंत्रित म्हणून बोलविणे. | |
| ------ | | ---------------------------------------- | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | | (४) कोषाध्यक्ष व प्रमुख कार्यवाह यांच्या मदतीने परिषदेच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे. | |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (५) परिषदेची वास्तू, मालमत्ता, ठेवी, विविध निधी यांवर कोषाध्यक्षांच्या व संबंधित कार्यवाहच्या सहाय्याने नियंत्रण ठेवणे. | |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (६) अध्यक्ष कार्यकारी मंडळाच्या आणि परिषदेच्या प्रत्येक उपसमितीच्या बैठकींचा पदसिद्ध अध्यक्ष असेल. | |
| ------ | | ---------------------------------------- | |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | | (७) परिषदेच्या वतीने जाहीर निवेदन करणे, वार्ताहर परिषद घेणे, परिषदेच्या हितसंबंधाचे रक्षण करणे, राज्य व केंद्र शासन, संस्था, विद्यापीठे, विविध साहित्य संस्था, संमेलन, परिषदा यामध्ये परिषदेचे प्रतिनिधीत्व करणे. परिषदेच्या सर्वांगीण कार्यावर, परिषदेचे उद्दिष्ट साध्य करणे यावर नियंत्रण ठेवणे. | |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (८) कार्यकारी मंडळाच्या साहाय्याने परिषदेच्या विकासाच्या विविध योजना आखून त्या कार्यान्वित करणे. | **कलम २ कार्याध्यक्ष पदनाम बदलल्यामुळे अध्यक्षांची कामाची जबाबदारी वाढली त्यामुळे नवीन शब्दरचना** |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (९) परिषदेच्या शाखांना वेळोवेळी भेटी देणे, शाखांशी संपर्क साधणे, त्यांना मार्गदर्शन करणे. | |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (१०) अ.भा.मराठी साहित्य मंडळावरील परिषदेचा पदसिद्ध प्रतिनिधी म्हणून महामंडळाच्या सहाय्याने मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी विविध योजना कार्यान्वित करणे व त्याचा अहवाल कार्यकारी मंडळासमोर ठेवणे. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | | ---------------------------------------- | |
| | | (११) विश्वस्त, उपाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कार्यवाह आणि कार्यकारी मंडळ सदस्यांचे राजीनामे स्वीकारणे व त्या रिक्त पदावर तात्पुरती व्यवस्था करणे आणि ती अंतिम मंजुरीसाठी कार्यकारी मंडळासमोर ठेवणे. | |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| **कलम १४** | **(२) कार्याध्यक्ष :** | | |
| ------ | (अ) कार्यकारी मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व सभेचे नियंत्रण करणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | |
| | (आ) पदाधिकारी समितीचा अध्यक्ष म्हणून काम पाहणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | |
| | (इ) परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त यांच्याशी जरूर तेव्हा संपर्क साधून परिषदेच्या कामकाजाची माहिती त्यांना देणे आणि त्यांना किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला आवश्यक वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या सभेला निमंत्रित म्हणून बोलविणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | **कार्याध्यक्ष पद रद्द केल्यामुळे कार्यभार अध्यक्षांकडे दिलेला आहे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | |
| | (ई) कोषाध्यक्ष व प्रमुख कार्यवाह यांच्या मदतीने परिषदेच्या आर्थिक व्यवहाराचे नियंत्रण ठेवणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | |
| | (उ) परिषदेची वास्तू, मालमत्ता, ठेवी, विविध निधी यांवर कोषाध्यक्षांच्या व संबंधित कार्यवाहाच्या साहाय्याने नियंत्रण ठेवणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | |
| | (ऊ) कार्याध्यक्ष कार्यकारी मंडळाच्या आणि परिषदेच्या प्रत्येक उपसमितीचा पदसिद्ध सभासद असेल. या नात्याने परिषदेच्या सर्वांगिण कार्यावर, परिषदेच्या | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | उद्दिष्टांच्या संदर्भात नियंत्रण ठेवणे. | | |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | |
| | (ए) परिषदेच्या वतीने जाहीर निवेदन करणे, वार्ताहर परिषद घेणे, परिषदेच्या हितसंबंधाचे रक्षण करणे आणि शासन संस्था, विद्यापीठे, विविध साहित्य संस्था, संमेलन, परिषदा यामध्ये परिषदेचे प्रतिनिधीत्व करणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | |
| | (ऐ) कार्यकारी मंडळाच्या साहाय्याने परिषदेच्या विकासाच्या विविध योजना आखून त्या कार्यान्वित करणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | **कार्याध्यक्ष पद रद्द केल्यामुळे कार्यभार अध्यक्षांकडे दिलेला आहे** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | |
| | (ओ) परिषदेच्या शाखांना वेळोवेळी भेटी देणे, शाखांशी संपर्क साधणे, त्यांना मार्गदर्शन करणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | |
| | (औ) अ.भा.मराठी साहित्य महामंडळावर परिषदेचा पदसिद्ध प्रतिनिधी म्हणून परिषदेचे प्रतिनिधीत्व करणे व महामंडळाच्या साहाय्याने विविध योजना कार्यान्वित करणे. महामंडळाच्या सभेतील निर्णयाचा अहवाल पदाधिकारी समिती व कार्यकारी मंडळ यांना आवश्यकतेनुसार देणे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | |
| | (अं) अध्यक्ष, विश्वस्त, कार्यवाह आणि कार्यकारी मंडळाचे सभासद यांचे | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
| --- | --- | --- | --- |
| **कलम १४** | राजीनामे स्वीकारणे, तात्पुरती पर्यायी व्यवस्था करणे आणि ती अंतिम मंजुरीसाठी कार्यकारी मंडळापुढे देणे. आवश्यकतेनुसार परिषदेच्या धनादेशावर स्वाक्षरी करणे. | | |
| | ------------------------------------------ | ------------------------------------------ | |
| ------ | (अः) कार्याध्यक्षास राजीनामा द्यावयाचा असल्यास तो त्याने अध्यक्षांकडे द्यावा. अध्यक्षांनी तो मंजूर केल्यास अध्यक्षांनी, कार्यकारी मंडळाची पुढील सभा होऊन नवीन कार्याध्यक्षांची निवड होईपर्यंतच्या काळात पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने प्रमुख कार्यवाहास कार्याध्यक्षपदाचा भार सांभाळण्यास सांगावे. | कार्याध्यक्ष हे कलम रद्द | **कार्याध्यक्ष पद रद्द केल्यामुळे कार्यभार अध्यक्षांकडे दिलेला आहे** |
| | ------------------------------------------ | ------------------------------------------ | -------------- |
| ------ | **३) कोषाध्यक्ष :**<br>(अ) कार्याध्यक्षांच्या सहकार्याने परिषदेच्या सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहाराचे व्यवस्थापन करणे. | **कोषाध्यक्ष :**<br>(१) अध्यक्ष व प्रमुख कार्यवाह यांच्या सहकार्याने परिषदेच्या सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहाराचे व्यवस्थापन करणे. | **कार्याध्यक्ष ही शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | ------------------------------------------ | ------------------------------------------ | -------------- |
| ------ | (आ) परिषदेच्या स्थिर व राखीव निधींची आणि गुंतवणुकीची व्यवस्था विश्वस्तांकडून करून घेणे. पदाधिकारी समितीस त्यांची वेळोवेळी माहिती देणे. | (२) परिषदेच्या स्थिर व राखीव निधींची आणि गुंतवणुकीची व्यवस्था विश्वस्तांकडून करून घेणे. पदाधिकारी समितीस त्यांची वेळोवेळी माहिती देणे. | **बदल नाही** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | -------------- |
| | (इ) गुंतवणूक रजिस्टर व येणे व्याजाचे रजिस्टर ठेवणे. | (३) गुंतवणूक रजिस्टर व येणे व्याजाचे रजिस्टर ठेवणे. | **बदल नाही** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | -------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | (ई) वर्षातून दोन वेळा विश्वस्त व पदाधिकारी समिती यांची संयुक्त सभा भरविणे. | (४) वर्षातून दोन वेळा विश्वस्त व पदाधिकारी समिती यांची संयुक्त सभा भरविणे. | **बदल नाही.** |
| | (उ) परिषदेने नेमलेल्या लेखापरिक्षकांकडून वेळच्या वेळी आर्थिक व्यवहार तपासून घेणे, उत्पन्न-खर्च पत्रक, ताळेबंद व अर्थसंकल्प तयार करणे व ही पत्रके पदाधिकारी समिती, कार्यकारी मंडळ व वार्षिक सभेपुढे मंजूरीसाठी ठेवणे. | (५) परिषदेने नेमलेल्या लेखापरिक्षकांकडून वेळच्या वेळी आर्थिक व्यवहार तपासून घेणे, उत्पन्न-खर्च पत्रक, ताळेबंद व अर्थसंकल्प तयार करणे व ही पत्रके पदाधिकारी समिती, कार्यकारी मंडळ व वार्षिक सभेपुढे मंजूरीसाठी ठेवणे. | **बदल नाही** |
| | (ऊ) अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे जमा-खर्चावर नियंत्रण ठेवणे व त्यासंबंधीचा अहवाल पदाधिकारी समितीस दर तीन महिन्यांनी देणे. | (६) अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे जमा-खर्चावर नियंत्रण ठेवणे व त्यासंबंधीचा अहवाल पदाधिकारी समितीस दर तीन महिन्यांनी देणे. | **बदल नाही** |
| | (ए) परिषदेच्या वतीने परिषदेच्या प्रत्येक धनादेशावर स्वाक्षरी करणे. | (७) परिषदेच्या वतीने परिषदेच्या प्रत्येक धनादेशावर स्वाक्षरी करणे. | **बदल नाही** |
| | (ऐ) कोषाध्यक्षास राजीनामा द्यावयाचा असल्यास तो त्याने प्रमुख कार्यवाहा मार्फत अध्यक्षांकडे द्यावा. अध्यक्षांनी तो पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने स्वीकारावा. नवीन कोषाध्यक्षाची निवड होईपर्यंत पदाधिकारी समितीने एका स्थानिक कार्यवाहाला कोषाध्यक्ष पदाचा भार सांभाळण्यास सांगावे. | (८) कोषाध्यक्षास राजीनामा द्यावयाचा असल्यास तो त्याने प्रमुख कार्यवाहामार्फत अध्यक्षांकडे द्यावा. त्यांनी मंजूरीसाठी सदर राजीनामा नजीकच्या कार्याकारी मंडळापुढे मंजुरीसाठी ठेवावा व त्याच सभेत कार्यकारी मंडळ नवीन कोषाध्यक्षाची निवड करेल. मधल्या काळात कोषाध्यक्ष पदाची कामे प्रभारी म्हणून प्रमुख कार्यवाहने सांभाळावी. | **शब्द रचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
| --- | --- | --- | --- |
| कलम १४ | **(४) प्रमुख कार्यवाह :** (अ) कार्याध्यक्षांच्या मार्गदर्शनानुसार व अन्य कार्यवाहांच्या साहाय्याने दैनंदिन कामकाजाचे नियोजन व नियंत्रण करणे. | **(३) प्रमुख कार्यवाह :** (१) अध्यक्षांच्या मार्गदर्शनानुसार व अन्य कार्यालयीन, विभागीय कार्यवाहांच्या साहाय्याने दैनंदिन कामकाजाचे नियोजन व नियंत्रण करणे. | **कार्याध्यक्ष पद रद्द केल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (आ) वर्षभरातील परिषदेचे कार्यक्रम व उपक्रम यांचे नियोजन व नियंत्रण करणे. | (२) वर्षभरातील परिषदेचे कार्यक्रम व उपक्रम यांचे नियोजन व नियंत्रण करणे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (इ) परिषदेचे दस्ताऐवज, संचिका (फाईल्स), कागदपत्र यांचे जतन व व्यवस्थापन करणे. | (३) परिषदेचे दस्ताऐवज, संचिका (फाईल्स), कागदपत्र यांचे जतन व व्यवस्थापन करणे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (ई) अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे जमा-खर्चावर कोषाध्यक्षांच्या साहाय्याने नियंत्रण ठेवणे. परिषदेच्या धनादेशांवर 'प्रमुख कार्यवाह' या नात्याने स्वाक्षरी करणे. | (४) अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे जमा-खर्चावर कोषाध्यक्षांच्या साहाय्याने नियंत्रण ठेवणे. परिषदेच्या धनादेशांवर 'प्रमुख कार्यवाह' या नात्याने स्वाक्षरी करणे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (उ) शाखा, महामंडळ, राज्यशासन, केंद्रशासन, विविध संस्था यांच्याशी परिषदेच्या वतीने कार्याध्यक्षांच्या संमतीने पत्रव्यवहार करणे. | (५) शाखा, महामंडळ, राज्यशासन, केंद्रशासन, विविध संस्था यांच्याशी परिषदेच्या वतीने अध्यक्षांच्या संमतीने पत्रव्यवहार करणे. | **कार्याध्यक्ष पद रद्द केल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | (ऊ) परिषदेच्या वास्तुची देखभाल, दुरुस्ती, वीज व पाणी, टेलिफोन, सेवकांची पगार वाढ प्रकरणे, डेडस्टॉक इत्यादि व्यवहार पूर्ण करणे. | (६) परिषदेच्या वास्तुची देखभाल, दुरुस्ती, वीज व पाणी, टेलिफशेन, सेवकांची पगार वाढ प्रकरणे, डेडस्टॉक इत्यादि व्यवहार पूर्ण करणे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | (ए) परिषदेच्या प्रकाशन व्यवहाराचे व म.सा.पत्रिकेचे पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने नियोजन व नियंत्रण करणे. म.सा.पत्रिकेचे प्रकाशक म्हणून काम करणे. | (७) परिषदेच्या प्रकाशन व्यवहाराचे व म.सा.पत्रिकेचे पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने नियोजन व नियंत्रण करणे. म.सा.पत्रिकेचे प्रकाशक म्हणून काम करणे. | **बदल नाही** |
| | (ऐ) महामंडळावर परिषदेचे प्रतिनिधीत्व करणे. | (८) महामंडळावर परिषदेचे प्रतिनिधीत्व करणे. | **बदल नाही** |
| | (ओ) पदाधिकारी- समिती व कार्यकारी मंडळ यांचा निमंत्रक म्हणून पत्रव्यवहार करणे, सभा भरविणे, इ. कामे करणे. | ८) वार्षिक सभा, विशेष सर्वसाधारण सभा, मागणीची विशेष सभा, पदाधिकारी समिती, कार्यकारी मंडळ सभेचा निमंत्रक म्हणून अध्यक्षांच्या सल्ल्याने या सभा बोलावणे. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | (औ) परिषदेचे त्रैमासिक व वार्षिक कार्यवृत्त करणे, म.सा. पत्रिकेत त्याला प्रसिद्धी देणे. | (९) परिषदेचे त्रैमासिक व वार्षिक कार्यवृत्त तयार करणे, म.सा. पत्रिकेत त्याला प्रसिद्धी देणे. | **बदल नाही** |
| | (अं) वर्गण्या, अनुदाने, येणे रक्कम, इ. वसूल करणे. संस्थेच्या योगक्षेमार्थ लहान-मोठ्या देणग्या मिळविणे, पावत्या देणे, दैनंदिन हिशोब ठरविणे, पत्रव्यवहार, इमारत देखभाल, इ. कामे प्रमुख कार्यवाहाची आहेत. | (१०) वर्गण्या, अनुदाने, येणे रक्कम, इतर वसूल करणे. संस्थेच्या योगक्षेमार्थ लहान-मोठ्या देणग्या मिळविणे, पावत्या देणे, दैनंदिन हिशोब ठरविणे, पत्रव्यवहार, इमारत देखभाल इत्यादी कामावर देखरेख करण्याची जबाबदारी प्रमुख कार्यवाहची असेल. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | (अः) प्रमुख कार्यवाहाला राजीनामा द्यायचा असेल तर त्याने कार्याध्यक्षांच्या मार्फत अध्यक्षांकडे द्यावा. अध्यक्षांनी तो संमत केल्यावर, कार्यकारी मंडळात | ११) प्रमुख कार्यवाहला राजीनामा द्यायचा असेल तर त्याने तो अध्यक्षांकडे द्यावा. अध्यक्षांनी सदर राजीनामा नजीकच्या कार्यकारी मंडळापुढे मंजुरीसाठी | **कार्याध्यक्ष पद रद्द व शब्दरचना बदलल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
| --- | --- | --- | --- |
| **कलम १४** | नवीन कार्यवाहाची निवड होईपर्यंत अध्यक्षांनी पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने स्थानिक कार्यवाहापैकी एका स्थानिक कार्यवाहास या पदाचा भार सांभाळण्यास सांगावे. | ठेवावा व त्याच सभेत नवीन प्रमुख कार्यवाहची उर्वरित काळासाठी निवड करावी. दरम्यानच्या काळात कार्यकारी मंडळापैकी एकाची तात्पुरती प्रभारी कार्यवाह म्हणून अध्यक्षांनी नियुक्ती करावी. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | **४) कार्यवाहांची कामे :**<br>**स्थानिक कार्यवाह- १ (निमंत्रक कार्यक्रम समिती)**<br>अ) प्रमुख कार्यवाहाच्या सल्ल्याने वर्षभरातील स्मृतीदिन, व्याख्याने, कवि संमेलने, इ. कार्यक्रमांचे आयोजन करणे व ते घडवून आणणे व आवश्यक तो पत्रव्यवहार करणे व इतिवृत्त तयार करणे. | **४) कार्यवाहांची कामे :**<br>**कार्यवाह क्र. १ (वर्षभरातील व्याख्याने, स्मृतीदिन इ. कार्यक्रम)**<br>१) प्रमुख कार्यवाहच्या सल्ल्याने वर्षभरातील स्मृतीदिन, व्याख्याने, कवि संमेलने इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करणे व ते घडवून आणणे व आवश्यक तो पत्रव्यवहार करणे व इतिवृत्त तयार करणे. | **कंसातील शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | आ) या कार्यक्रमांपैकी जे शाखांना देण्यासारखे असतील त्यांची योजना करणे. | २) या कार्यक्रमांपैकी जे शाखांना देण्यासारखे असतील त्यांचे नियोजन करणे. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | | ३) साहित्यिकांची जन्मशताब्दी, पुण्यतिथी, जयंती, इत्यादी जे समारंभ असतात त्याचे प्रमुख कार्यवाह/अध्यक्ष यांच्या सल्ल्याने नियोजन, पत्रव्यवहार व कार्यवाही करणे. तसेच जादा विशेष कार्यक्रम आयोजित करणे. | **जबाबदारी वाढविल्याने** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम १४ | **स्थानिक कार्यवाह- २ (निमंत्रक, पारितोषिकांचे समारंभ)**<br><br>अ) विशिष्ट दिवशी पारितोषिके देण्याचे जे समारंभ असतात त्यांचे प्रमुख कार्यवाहांच्या सल्ल्याने नियोजन, पत्रव्यवहार व कार्यवाही करणे व इतिवृत्त तयार करणे. | **कार्यवाह क्र. २ वार्षिक ग्रंथ निवड (वर्धापनदिनी दिली जाणारी ग्रंथ व ग्रंथकार पारितोषिके)**<br>१) परिषदेच्या वर्धापन दिनादिवशी जी वार्षिक ग्रंथ पारितोषिके दिली जातात त्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी व नियोजन करणे. पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने ही कामे करणे. तसेच कार्यकारी मंडळ सदस्यांच्या सल्ल्याने ग्रंथ निवड परिक्षकांची नियुक्ती करणे व त्यानुसार ग्रंथ निवड करणे. त्यासाठी आवश्यक तो पत्रव्यवहार करणे. | **कंसातील शब्दरचना बदल प्रशासकीय सोयीसाठी** |
| | आ) त्या त्या वर्षी जन्मशताब्दी किंवा तत्सम कारणाने विशिष्ट दिवशी जे अधिकचे कार्यक्रम करावे लागतात त्यांचे नियोजन, पत्रव्यवहार व कार्यवाही करणे व इतिवृत्त तयार करणे. | २) ग्रंथ परिक्षकांना आवश्यक ते सहकार्य करणे, ग्रंथ पुरस्कारांचा निकाल तयार करून पदाधिकारी समितीस देणे, परिषदेचा वर्धापन दिन व वार्षिक पुरस्कार कार्यक्रमांचे नियोजन करणे. | **प्रशासकीय सोयीसाठी जबाबदारी वाढविल्याने** |
| | **स्थानिक कार्यवाह- ३ (निमंत्रक, ग्रंथनिवड समिती)**<br>अ) परिषदेच्या वर्धापनदिनावेळी जी वार्षिक ग्रंथ पारितोषिक दिली जातात त्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करणे, पदाधिकारी समितीच्या सहाय्याने परीक्षकांची नियुक्ती व पत्रव्यवहार करणे. | **कार्यवाह क्र. ३ (वर्षभर द्यावयाची ग्रंथ विशेष पारितोषिके)**<br>१) वार्षिक ग्रंथ विशेष पारितोषिकासाठी ग्रंथ परीक्षक नेमून, निवडलेल्या ग्रंथांना पारितोषिक देणे व कार्यक्रमाचे नियोजन करणे. | **कंसातील व अन्य शब्दरचना बदल** |
| | आ) ग्रंथ परीक्षकांना आवश्यक ते सहाय्य करणे, निकाल मिळविणे व जाहीर करणे, पारितोषिक विजेत्यांशी पत्रव्यवहार करणे, इत्यादी. | २) ग्रंथपरीक्षकांना आवश्यक ते सहाय्य करणे, निकाल मिळविणे व जाहीर करणे, पारितोषिक विजेत्यांशी पत्रव्यवहार करणे, इत्यादी. | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | इ) ग्रंथनिवडीचे काम पूर्ण होऊन निकाल जाहीर होताच परिषदेकडे आलेले ग्रंथ कार्यालया मार्फत ग्रंथालयाकडे पाठविणे. | ३) ग्रंथनिवडीचे काम पूर्ण होऊन निकाल जाहीर करणे, पारितोषिक विजेत्यांशी पत्रव्यवहार करणे, परिषदेकडे आलेले ग्रंथ कार्यालया मार्फत ग्रंथालयाकडे पाठविणे. | **शब्दरचना बदल** |
| | **स्थानिक कार्यवाह- ४ (निमंत्रक, ग्रंथालय समिती)**<br>अ) प्रमुख कार्यवाहाच्या सल्ल्याने ग्रंथालय व्यवस्थापन, देखरेख, इ. कामे करणे. | **कार्यवाह क्र. ४ ग्रंथालय विभाग**<br>१) अध्यक्ष व प्रमुख कार्यवाह यांच्या मार्गदर्शनाखाली परिषद ग्रंथालय व्यवस्थापन, देखरेख करणे. | **जबाबदारी वाढविल्यामुळे शब्दरचना बदल** |
| | आ) सभासदांसाठी दिवाळी अंक योजना राबविणे तसेच दिवाळी अंक स्पर्धेचे संपूर्ण नियोजन व कार्यवाही करणे. ग्रंथालय विभागाचे वार्षिक वृत्त तयार करणे. | २) ग्रंथालय सभासद वाढवून ग्रंथालय डिजिटल करणे, याबाबतच्या योजना तयार करून त्याची कार्यवाही करणे, ग्रंथालय स्वयंपूर्ण होण्यासाठी अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष यांच्या सहकार्याने ग्रंथालयासाठी देणग्या मिळवणे. | **जबाबदारी वाढविल्यामुळे** |
| | | ३) सभासदांसाठी दिवाळी अंक प्रचार योजना राबविणे, ग्रंथालय विभागाचे वार्षिक वृत्त तयार करून पदाधिकारी समितीकडे आर्थिक वर्ष संपल्यावर एक महिन्याच्या आत देणे. | **जबाबदारी वाढविल्यामुळे** |
| | **स्थानिक कार्यवाह- ५ (परीक्षा विभाग प्रमुख)**<br>अ) कार्याध्यक्ष/प्रमुख कार्यवाह यांच्या सल्ल्याने परीक्षेसंबंधी सर्व प्रकारचे नियोजन, पत्रव्यवहार व कार्यवाही करणे.<br>आ) परीक्षांसाठी वेळोवेळी अभ्यासक्रम तयार करणे, वर्ग चालविणे, अध्यापनाची | **कार्यवाह क्र. ५ परीक्षा विभाग**<br>१) परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे अभ्यासक्रम तयार करणे, त्यास पदाधिकारी समितीची मंजूरी घेणे, यासाठी वर्ग चालविणे, परीक्षेसाठी अध्यापक यांची नियुक्ती व त्यांचेकडून प्रश्नपत्रिका तयार करून परीक्षेची सर्व तयारी | **शब्दरचना बदल व जबाबदारी वाढविल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | योजना करणे, तसेच प्रश्नपत्रिका काढण्यापासून निकाल तयार करण्यापर्यंत आवश्यक ती सर्व कामे करणे व कार्यालयाकडून करवून घेणे. परीक्षा कार्याचे वार्षिक वृत्त तयार करणे. | करणे. सदर परीक्षा विभाग स्वयंपूर्ण होण्यासाठी विविध योजना आखून पदाधिकारी समितीच्या सहकार्याने देणग्या, मदत गोळा करणे, परिषदेच्या वर्धापनदिना दिवशीच्या कार्यक्रमात परीक्षेतील विशेष प्राविण्य मिळविलेल्या पदवीधारकांचा पदवी देऊन सन्मान करण्यासाठीचे नियोजन अध्यक्षांच्या सल्ल्याने करणे, तसेच सदर परीक्षांना विद्यापीठ अनुदान आयोग, विविध सर्व प्रकारची विद्यापीठे, राज्य शासन उच्च शिक्षण विभाग, मराठी भाषा विभाग यांची समकक्षता मिळण्यासाठी प्रयत्न करणे. | **शब्दरचना बदल व जबाबदारी वाढविल्यामुळे** |
| ------ | --------------------------------------- | --------------------------------------- | -------------- |
| | **स्थानिक कार्यवाह-६ (व्यवस्थापक अतिथी निवास)**<br>अ) परिषदेच्या अतिथी निवास संबंधाने पत्रव्यवहारासह आवश्यक ती सर्व कामे कोषाध्यक्ष/प्रमुख कार्यवाह यांच्या सल्ल्याने पार पाडणे. | **कार्यवाह क्र. ६ वास्तू देखभाल**<br>१) परिषदेच्या अतिथी निवास संबंधाने पत्रव्यवहारासह आवश्यक ती सर्व कामे कोषाध्यक्ष/प्रमुख कार्यवाह यांच्या सल्ल्याने पार पाडणे. | **कंसातील शब्द बदल** |
| ------ | --------------------------------------- | --------------------------------------- | -------------- |
| | आ) वास्तूची देखभाल, दुरुस्ती यासंबंधीची तातडीची कामे कोषाध्यक्षांच्या साहाय्याने करणे. | २) परिषद वास्तुची देखभाल, दुरूस्ती यासंबंधीची तातडीने कामे कोषाध्यक्षांच्या सहकार्याने करणे, वास्तूची आवश्यकतेनुसार सुशोभीकरण विकास योजना तयार करून कार्यकारी मंडळाकडून मंजूर करून घेऊन कार्यवाही करणे. परिषद अतिथीगृह स्वयंपूर्ण होण्यासाठी समाजातून निधी संकलन करण्याची योजना कार्यकारी मंडळाकडून मंजूर करून घेऊन कार्यवाही करणे. वास्तूच्या पुनर्विकासासाठी आवश्यक ते कायदेशीर प्रस्ताव तयार करणे व त्यासाठी प्रयत्न करणे. | **प्रशासकीय सोयीसाठी व जबाबदारी वाढविल्यामुळे शब्दरचना बदल** |
| ------ | --------------------------------------- | --------------------------------------- | -------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | | ३) परिषदेच्या स्थावर वास्तूची सर्व मूळ कागदपत्रे, बक्षिसपत्रे, बांधकाम परवाने, इत्यादी महत्त्वाच्या दस्तऐवजाचे सुरक्षित जतन करणे. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | | ४) परिषदेच्या अतिथी निवासगृहासाठी नियम व नियमावली करणे आणि ती कार्यकारी मंडळाकडून मंजूर करून घेणे व त्याची अंमलबजावणी करणे. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | | **कार्यवाह क्र. ७ वार्षिक पारितोषिके (मसाप जीवनगौरव, उत्कृष्ट कार्यकर्ता व शाखा पारितोषिके)**<br>१) महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारासाठी योग्य व्यक्तींची निवड करणे, कार्यक्रमाचे आयोजन करणे. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | | २) उत्कृष्ट कार्यकर्ता व शाखा पारितोषिकांसाठीची निवड करणे, पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करणे. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | **पुण्याबाहेरील दोन कार्यवाह :**<br>अ) परिषदेच्या शाखांचा मेळावा दरवर्षी भरविणे, केंद्र कार्यालय व सर्व शाखा यांमध्ये सुसंवाद, संपर्क साधणे. | **विभागीय कार्यवाह**<br>१) दरवर्षी शाखांच्या ठिकाणी परिषदेचे वार्षिक मराठी साहित्य संमेलन भरवण्याचा प्रयत्न करणे. | **पुण्याबाहेरील दोन कार्यवाह ही शब्दरचना बदलल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम १४ | ---------- आ) नवीन शाखा स्थापण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे. | ---------- २) विभागीय कार्यवाहांनी आपल्या विभागातील परिषद शाखांची सभासद यादी अद्ययावत करून घेणे, शाखांना भेटी देऊन त्यांचे कामकाजात मार्गदर्शन करणे, शाखांच्या सहकार्याने परिषदेसाठी निधी संकलन करण्याचा प्रयत्न करणे. | ---------- **पुण्याबाहेरील दोन कार्यवाह ही शब्दरचना बदलल्यामुळे** |
| ------ | ---------- इ) अन्य कार्यवाहांच्या सहकार्याने वेळोवेळी विविध कामे पार पाडणे. | ---------- पोटकलम इ रद्द | ---------- **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------- ई) दरवर्षी शाखांच्या ठिकाणी विभागीय साहित्य संमेलन भरवण्याचा प्रयत्न करणे. | ---------- पोटकलम ई रद्द | ---------- **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------- उ) ह्या कार्यवाहांस जर राजीनामा द्यावयाचा असेल तर तो त्यांनी कार्याध्यक्षांकडे द्यावा. | ---------- पोटकलम उ रद्द | ---------- **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------- **विशेष नोंद –** १) स्थानिक कार्यवाह क्र. १ ते ६ या सर्वांना कोणत्याही कारणाने राजीनामा द्यायचा असल्यास त्यांनी तो कार्याध्यक्षांनी प्रमुख कार्यवाहांमार्फत लेखी स्वरूपात द्यावा. पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने कार्याध्यक्षांनी तो स्वीकारल्यास त्याची लगेच कार्यवाही होईल. अशा स्थानिक कार्यवाहाचे कार्यकारी मंडळावरील प्रतिनिधीत्व राजीनामा स्वीकारला जाताच संपेल. त्याच्या जागी पदाधिकारी | ---------- **राजीनामा** विभागीय कार्यवाह व कार्यवाह क्र. १ ते ७ यापैकी कोणालाही राजीनामा द्यायचा असेल तर त्याने आपला स्व-हस्ताक्षरातील राजीनामा प्रमुख कार्यवाह यांचेकडे द्यावा. ते सदर राजीनामा नजीकच्या कार्यकारी मंडळात मंजुरीसाठी ठेवतील. दरम्यानच्या काळात आवश्यकतेनुसार प्रमुख कार्यवाह कार्यकारी मंडळातील एखाद्या सदस्याकडे अशा कार्यवाहाचा तात्पुरता कार्यभार देतील. | ---------- **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १४** | समिती आवश्यक ती व्यवस्था करील.<br>२) कोणत्याही कारणाने कार्यकारी मंडळावरील जागा रिक्त झाल्यास ती जागा स्वीकृत सभासदाच्या रूपाने भरण्यात येईल. | कार्यकारी मंडळात राजीनामा मंजूर झाल्यानंतर त्या जागी नवीन कार्यवाहाची उर्वरित काळासाठी कार्यकारी मंडळ नवीन कार्यवाहाची निवड करेल. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | ------------- |
| | **कार्यकारी मंडळाची सभा :**<br>वर्षातून कार्यकारी मंडळाच्या किमान तीन सभा घेण्यात याव्यात. प्रत्येक सभा साधारणपणे चार महिन्यांनी घ्यावी. | (पूर्वीचे पोटकलम रद्द) | **सदर रचना कलम १७ मध्ये समाविष्ट असल्याने** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | ------------- |
| **कलम १५** | **महाराष्ट्र साहित्य पत्रिका संपादक –**<br>अ) म.सा.पत्रिका या परिषदेच्या त्रैमासिकाचे संपादन करणे, संपादनाचे पंचवार्षिक नियोजन करणे आणि दर तीन महिन्यांनी म.सा.पत्रिकेचा अंक प्रकाशित करण्याची व्यवस्था करणे.<br>आ) म.सा.पत्रिका संपादन समितीचा निमंत्रक म्हणून काम करणे. या समितीच्या वेळोवेळी बैठका भरविणे.<br>इ) संपादन समितीचा विचार विनिमय करून संपादनाचे निर्णय घेणे व त्याची कार्यवाही करणे.<br>ई) पत्रिकेसंबंधीच्या मागण्या, अपेक्षा, इ. बाबी पदाधिकारी समितीपुढे मांडणे व आवश्यक ती मंजूरी घेणे.<br>उ) पत्रिकेसंबंधी आवश्यक तो पत्रव्यवहार करणे.<br>ऊ) परिषदेचे त्रैमासिक कार्यवृत्त, वार्षिक कार्यवृत्त, साधारण सभेची सूचना व | **कलम १५ – महाराष्ट्र साहित्य परिषद पत्रिका**<br>१) महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संपादकांनी आपले संपादन कौशल्य वापरून साहित्य पत्रिका त्रैमासिक दर तीन महिन्याने प्रकाशित करावयाची आहे.<br>२) ज्या परिषद भागात सभासदांना पत्रिका पोस्टाने हवी असेल त्यांना ही पत्रिका देणगी मूल्य आकारून देण्यात येईल. तथापि छपाई, वितरण, पोस्टेज, इ. वाढता खर्च लक्षात घेता सदर पत्रिका आजीव सभासदांसाठी परिषदेच्या संकेतस्थळावर टाकावी. सदर संपादकांनी निमंत्रक म्हणून मसाप पत्रिका संपादक मंडळाची सभा पत्रिका प्रकाशनापूर्वी ९० दिवस आधी विचार विनिमयासाठी बोलवावी व त्याचे इतिवृत्त ठेवण्यात यावे. सदर सभेमध्ये पत्रिकेचे लेख, जाहिराती, मुखपृष्ठ इत्यादीबाबत चर्चा व्हावी व त्याची अंमलबजावणी संपादकाने करावी.<br>काही कारणाने अशी सभा बोलवता आली नाही तर संपादकांनी परिषद | **प्रशासकीय सोयीसाठी सर्व कलमे नव्याने समाविष्ट केल्याने शब्दरचना बदल** |

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १५** | कार्यालयाकडून येणारा तत्सम इतर मजकूर पत्रिकेतून प्रसिद्ध करणे.<br>ए) म.सा. पत्रिकेसंबंधी कोणताही धोरणात्मक निर्णय घेऊन तो प्रसिद्ध करण्यापूर्वी पदाधिकारी समितीची संमती घेणे.<br>ऐ) अंदाजपत्रकानुसार खर्च करणे, म.सा.पत्रिकेच्या प्रत्येक अंकापूर्वी एक महिना अगोदर त्या अंकाच्या खर्चाची संपूर्ण माहिती पदाधिकारी समितीस देणे व आवश्यक ती मंजूरी घेणे.<br>ओ) पत्रिका संपादकास राजीनामा द्यावयाचा असेल, तर तो त्याने प्रमुख कार्यवाहांमार्फत कार्याध्यक्षांकडे द्यावा. कार्याध्यक्षांनी तो स्वीकृत केल्यानंतर नवीन म.सा. पत्रिका संपादकाची कार्यकारी मंडळातर्फे नियुक्ती होईतोपर्यंत पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने कार्याध्यक्षांनी तात्पुरती व्यवस्था करावी. | पदाधिकारी व संपादक मंडळ सदस्य यांचेशी दूरभाष, ई-मेल, व्हॉटस्‌अप वरून चर्चा करून निर्णय घ्यावा.<br>३) अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष यांनी कार्यकारी मंडळात सर्व संमतीने मसाप पत्रिका संपादकाची नियुक्ती करावयाची आहे.<br>४) परिषदेचे त्रैमासिक कार्यवृत्त, वार्षिक कार्यक्रम, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, परिषदेच्या विविध कार्यक्रमांचा वृत्तांत, शाखा उपक्रमांचे वृत्त तसेच परिषदेकडून येणाऱ्या अन्य सूचना याला संपादकांनी प्रथम प्राधान्याने मसाप पत्रिकेमध्ये प्रसिद्धी दिलीच पाहिजे.<br>५) मसाप पत्रिकेचा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विद्यावाचस्पती संशोधनासाठी व उच्च शिक्षणातील (महाविद्यालयीन) शोध निबंध यासाठी उपयुक्त असे संदर्भ प्रकाशन हा दर्जा संपादकांनी सातत्याने राखला पाहिजे. त्यासाठी राज्यातील सर्व कला, वाणिज्य, शास्त्र, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व अन्य महाविद्यालयांच्या ग्रंथालयात मसाप पत्रिका वार्षिक मूल्य ₹ ३०० घेऊन पोचविण्याचा प्रयत्न संपादकांनी केला पाहिजे. या मूल्यामध्ये बदल करण्याचा अधिकार पदाधिकारी समितीला राहील.<br>६) मसाप पत्रिका संपादकास संपादक पदाचा राजीनामा द्यायचा असेल तर तो त्याने प्रमुख कार्यवाहमार्फत अध्यक्षांकडे पाठवावा. अध्यक्षांनी सदर राजीनामा स्वीकृत करून माहितीसाठी नजीकच्या कार्यकारी मंडळापुढे ठेवावा व त्याच सभेत नवीन मसाप पत्रिका संपादकांची उर्वरित काळासाठी निवड करावी. दरम्यानच्या काळात संपादकाचा प्रभारी कार्यभार प्रमुख कार्यवाह | **प्रशासकीय सोयीसाठी सर्व कलमे नव्याने समाविष्ट केल्याने शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | | सांभाळतील. | |
| कलम १६ | **अविश्वास ठराव :**<br>अ) अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह, पत्रिका संपादक, आदी पदाधिकारी किंवा कार्यकारी मंडळाचा कोणीही सभासद यांच्याविरूद्ध अविश्वास अथवा निषेध व्यक्त करावयाचा झाल्यास अशा प्रकारचे लेखी मत कार्यकारी मंडळाने २/३ (दोन तृतीयांश) बहुमताने व्यक्त केले पाहिजे. | **कलम १६ - अविश्वास ठराव :**<br>१) अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, कार्यवाह, पत्रिका संपादक, आदी पदाधिकारी किंवा कार्यकारी मंडळाचा कोणीही सभासद यांच्याविरूद्ध योग्य कारणासाठी अविश्वास ठराव करावयाचा झाल्यास अशा प्रकारचे लेखी मत कार्यकारी मंडळाने २/३ (दोन तृतीयांश) बहुमताने व्यक्त केले पाहिजे. | **निषेध शब्द वगळल्याने** |
| | आ) अशा कार्यवाहीपूर्वी संबंधित सभासदाला किंवा पदाधिकाऱ्याला आपली बाजू १५ दिवसांची लेखी पूर्वसूचना देऊन कार्यकारी मंडळाच्या सभेत मांडण्याची संधी दिली पाहिजे. | २) अशा कार्यवाहीपूर्वी संबंधित सभासदाला किंवा पदाधिकाऱ्याला आपली बाजू १५ दिवसांची लेखी पूर्वसूचना देऊन कार्यकारी मंडळाच्या सभेत मांडण्याची संधी दिली पाहिजे. | **बदल नाही** |
| | इ) अविश्वास वा निषेधात्मक प्रस्ताव कार्यकारी मंडळात २/३ (दोन तृतीयांश) बहुमताने संमत झाल्यावर तसे संबंधित व्यक्तीस प्रमुख कार्यवाहाने कळवावे. त्यानंतरच तो सभासद वा पदाधिकारी आपल्या स्थानापासून मुक्त झाल्याचे समजण्यात येईल. | ३) अविश्वास प्रस्ताव कार्यकारी मंडळात २/३ (दोन तृतीयांश) बहुमताने संमत झाल्यावर तसे संबंधित व्यक्तीस प्रमुख कार्यवाहाने कळवावे. त्यानंतरच तो सभासद वा पदाधिकारी आपल्या स्थानापासून मुक्त झाल्याचे समजण्यात येईल. | **निषेधात्मक शब्द वगळल्यामुळे** |
| कलम १७ | **कार्यकारी मंडळ सभा :**<br>अ) वर्षातून कार्यकारी मंडळाच्या किमान तीन सभा घेण्यात याव्यात. प्रत्येक सभा साधारणपणे दर चार महिन्यांनी व्हावी. आवश्यक वाटल्यास विशेष सभा | **कलम १७ - कार्यकारी मंडळ सभा :**<br>१) कार्यकारी मंडळाच्या सभा वर्षातून चार वेळा घेण्यात येतील. म्हणजे साधारणपणे दर तीन महिन्यांनी एक सभा घेण्यात यावी. आवश्यकता वाटल्यास | **सभा संख्या व कालावधी वाढविल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १७** | बोलविण्याचा अधिकार कार्याध्यक्षांच्या सल्ल्याने प्रमुख कार्यवाह यांना राहील. | एखादी जादा सभा पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने प्रमुख कार्यवाह बोलावतील. | |
| | आ) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना सभेपूर्वी किमान १४ दिवस सभासदांना पाठविण्यात यावी. | २) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना सभेपूर्वी किमान चौदा दिवस आधी सदस्यांना साध्या टपालाने, ई-मेलद्वारे किंवा सोशल मिडीयाद्वारे पाठविण्यात यावी व अशी पाठवलेली सभा सूचना कायदेशीर ग्राह्य धरली जाईल. | **शब्दरचना बदल व प्रशासकीय सोयीसाठी** |
| | इ) कार्यकारी मंडळाच्या सभेचा वृत्तांत अध्यक्षांकडे माहितीसाठी पाठवावा. | पोटकलम इ रद्द. | **रद्द केल्यामुळे** |
| | ई) आवश्यक वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या सभेला अध्यक्षांना निमंत्रित करण्याचा अधिकार कार्याध्यक्षांचा राहील. | पोटकलम ई रद्द. | **रद्द केल्यामुळे** |
| | उ) कार्यकारी मंडळाच्या किमान १४ सभासदांनी विशेष कामासाठी लेखी मागणी केल्यास प्रमुख कार्यवाहांनी तशी सभा ७ दिवस पूर्वसूचना देऊन भरविली पाहिजे. | ३) कार्यकारी मंडळाच्या किमान पंधरा सदस्यांनी मागणीची विशेष सभा लेखी पत्रान्वये मागितली तर अशी सूचना मिळाल्यापासून दहा दिवसाच्या आत अशी सभा मा.अध्यक्षांच्या सल्ल्याने प्रमुख कार्यवाहाने बोलावली पाहिजे. सदर सभेत मागणी पत्रातीलच विषयावर फक्त चर्चा होऊन बहुमताने निर्णय होईल. कार्यकारी मंडळ सभेचे सर्व नियम या मागणीच्या विशेष कार्यकारी मंडळ सभेला लागू होतील. | **संख्या व शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | ऊ) कार्यकारी मंडळाच्या सभेला चौदा सभासदांची गणसंख्या राहील. गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली सभा त्याच ठिकाणी १५ मिनिटांनी घेता येईल. | ४) कार्यकारी मंडळाच्या सभेसाठी पंधरा सदस्यांची गणसंख्या आवश्यक राहील. अशा गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा लगेचच अर्ध्या | **गणसंख्येतील बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | | तासाने त्याच ठिकाणी होईल व त्यातील सर्व कामकाज सर्व उपस्थित, गैरहजर सदस्यांवर बंधनकारक राहील. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ए) महत्त्वाच्या कामासाठी परिपत्रकाद्वारे सभासदांची लेखी मते मागवून निर्णय घेण्याचा अधिकार कार्याध्यक्षांना राहील. मात्र असा निर्णय घेण्यासाठी किमान चौदा सभासदांची लेखी संमती असणे आवश्यक आहे. त्यानंतर होणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या रितसर सभेत त्या निर्णयाची माहिती देण्यात यावी व इतिवृत्तांत तशी नोंद करण्यात यावी. मात्र चौदा सभासदांनी अशा निर्णयास लेखी संमती दर्शविली नाही, तर या कामासाठी कार्यकारी मंडळाची विशेष सभा बोलविणे आवश्यक आहे. अशी सभा<br>१० दिवसांत, ४ दिवसांची पूर्वसूचना देऊन कार्याध्यक्षांच्या सल्ल्याने प्रमुख कार्यवाहांनी बोलाविली पाहिजे. | ५) जागतिक सार्वजनिक महामारी, आरोग्य व अन्य आपत्कालीन राष्ट्रीय परिस्थिती या बाबतीत महाराष्ट्र शासन, सभेच्या ठिकाणचे जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी जर लॉकडाऊन, संचारबंदी, भादवि कलम १४४ नुसार जमावबंदी, संचारबंदी लागू केल्यास अशा परिस्थितीत संबंधित ठिकाणच्या जिल्हा दंडाधिकारी यांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय कार्यकारी मंडळ सभा बोलावू नये. परंतु या कालावधीत परिषदेच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यकता असेल तर मा.अध्यक्षाच्या सल्ल्याने प्रमुख कार्यवाह दूरदृश्य प्रणालीद्वारे (ऑनलाईन, व्हिडीओ कॉन्फरन्स, झूम, गुगल मीट, इत्यादी) विशेष तातडीची सभा घेतील व त्यातील कामकाज सर्व कार्यकारी मंडळ सदस्यांवर बंधनकारक राहील. अशी सभा निर्णयासाठी पुरेसा वेळ असेल तर विषयपत्रिका सर्व कार्यकारी मंडळ सदस्यांना साध्या टपालाद्वारे, ई-मेल, सोशला मिडीयाद्वारे पाठवून सभासदांची लेखी मते त्यांच्या सहीनिशी फक्त टपाल/ई-मेलद्वारे मागवून त्यावर निर्णय अध्यक्ष व प्रमुख कार्यवाह यांचेकडून घेण्यात येईल व तो सर्व कार्यकारी मंडळ सदस्यांवर बंधनकारक राहील. | **सार्वजनिक हितार्थ प्रशासकीय सोयीसाठी नवीन कलम** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**<br>(अ) 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे त्रैमासिक परिषदेचे वाङ्.मयीन मुखपत्र राहील. | (पूर्वीचे पोटकलम 'अ' ते 'ओ' रद्द) | **कलम १५ मध्ये समाविष्ट असल्याने** |

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

### दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | (आ) हे मुखपत्र सर्व सभासदांना विनामूल्य पाठविले जाईल.<br>(इ) पत्रिकेसाठी संपादकांसह सहा कार्यकारी मंडळातील सभासदांची 'संपादन समिती' कार्यकारी मंडळाने आपल्या पहिल्या सभेत नेमावी. या समितीत प्रमुख कार्यवाहाखेरीज एक स्थानिक कार्यवाह असावा.<br>(ई) प्रमुख कार्यवाह हा पत्रिकेचा प्रकाशक राहील.<br>(उ) पत्रिकेचे संपादकीय धोरण व स्वरुप स्थूलमानाने संपादन समितीने ठरवावे. मात्र त्याची माहिती पदाधिकारी समितीस दिली पाहिजे.<br>(ऊ) प्रमुख कार्यवाहांकडून येणारा परिषदेशी संबंधित मजकूर संपादकांनी पत्रिकेत छापला पाहिजे.<br>(ए) पत्रिकेच्या संपादकांनी अर्थसंकल्पात संमत केलेल्या उत्पन्न खर्चावरून अंकाची योजना करावी.<br>(ओ) संपादकांनी प्रत्येक अंक प्रसिद्ध झाल्यावर एक महिन्याच्या आत, त्या अंकाच्या जमा - खर्चाची माहिती पदाधिकारी समितीस दिली पाहिजे व आवश्यक तेथे त्याची मंजुरी घेतली पाहिजे. | (पूर्वीचे पोटकलम 'अ' ते 'ओ' रद्द) | **कलम १५ मध्ये समाविष्ट असल्याने** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम १८** | **सर्वसाधारण सभा :**<br>अ) परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथे परिषदेचे कार्य वर्ष संपल्यापासून पाच महिन्यांच्या आत कार्यकारी मंडळाने भरविली पाहिजे. | **कलम १८ - वार्षिक सर्वसाधारण सभा, नियम व कामे :**<br>१) परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा फक्त सभासदांसाठी असा विषय पत्रिकेवर उल्लेख करून आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यात परिषद मुख्यालयाच्या कोणत्याही ठिकाणी अथवा परिषद कार्यक्षेत्रात कोठेही घेण्यात येईल. | **सभा आयोजन कालावधी व स्थळ बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १८** | आ) या सभेत गतवर्षीचे कार्यवृत्त, हिशोब तपासणीसाकडून तपासून घेतलेली उत्पन्न-खर्च व ताळेबंद पत्रके, अर्थसंकल्प, हिशोब तपासणीसांची निवड, सभासदांनी योग्य मुदतीत दिलेल्या सूचना व ठराव, सांप्रतच्या नियमात भर घालणे वा फेरफार करणे, इ. कामे होतील. | २) परिषदेचे कार्य वृत्तांत व वार्षिक आर्थिक पत्रके मंजूर करणे, पुढील वर्षाचे अंदाजपत्रकास मंजूरी, परिषदेसाठी हिशोब तपासनीस व सनदी लेखापालाची नियुक्ती व त्यांचे मानधन ठरविणे हे वार्षिक सभेचे प्रमुख काम राहील. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | इ) आवश्यक तेव्हा विशेष कामाकरिता कार्यकारी मंडळाला विशेष साधारण सभा भरविता येईल. मात्र या सभेत कार्यक्रमपत्रिके व्यतिरिक्त इतर कामकाज होणार नाही. | ३) परिषदेच्या हितासाठी आवश्यकता वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या मंजुरीने विशेष साधारण सभा प्रमुख कार्यवाह बोलावतील. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | ई) कोणत्याही साधारण सभेत जे प्रस्ताव संमत होतील, त्यास विरोधी प्रस्ताव तीन वर्षे मांडता येणार नाहीत. | ४) कोणत्याही साधारण सभेत जे विषय मंजूर होतील त्यास विरोधी प्रस्ताव पुढील तीन वर्षे कोणाही सभासदास मांडता येणार नाही. | **शब्दरचना बदल** |
| | उ) वार्षिक सर्वसाधारण वा विशेष सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना सभेपूर्वी १५ दिवस मिळेल, अशा बेताने पत्रिकेच्या अंकातून वा अन्य रितीने सभासदांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पोस्टात टाकली पाहिजे किंवा पाठविली पाहिजे.<br>(टीप : कोणतीही साधारण सभा कोणत्याही सभासदास सभेची सूचना न मिळाल्याच्या कारणावरून बेकायदेशीर ठरणार नाही.) | ५) वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा, मागणीची सर्वसाधारण सभेच्या सूचना सर्व सभासदांना १४ दिवस आधी परिषदेच्या संकेतस्थळावर अथवा मसाप पत्रिकेत टाकण्यात येईल. अशा सूचना कायदेशीररित्या ग्राह्य समजण्यात येईल. तसेच सर्व शाखांना पोस्टाने सूचना पाठविण्यात येईल व त्यांनी त्यांच्या सभासदांना सभेबाबत कळविण्याची व्यवस्था करावी.<br>(टीप : कोणतीही साधारण सभा कोणत्याही सभासदास सभेची सूचना न मिळाल्याच्या कारणावरून बेकायदेशीर ठरणार नाही.) | **प्रशासकीय सोयीसाठी कालावधी व शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १८** | ऊ) या सूचनेबरोबर कार्यक्रमपत्रिकेत निर्दिष्ट केलेली कार्यवृत्त, उत्पन्न-खर्च, ताळेबंद, अर्थसंकल्प, इ. पत्रके पाठविणे आवश्यक आहे. कार्यक्रम पत्रिकेतील विषयांबाबत सभासदांना सूचना वा प्रस्ताव पाठवावयाचे असतील तर त्यांनी ते सूचक, अनुमोदक यांच्या सहीने त्या सभेपूर्वी<br>५ दिवस प्रमुख कार्यवाहांना पोचतील अशा बेताने पाठवावेत. | ६) कोणाही अधिकृत परिषद सभासदास वार्षिक सर्वसाधारण सभेत एखादा विषय चर्चेसाठी द्यावयाचा असेल तर तो त्याने सभेपूर्वी सात दिवस आधी प्रमुख कार्यवाहांकडे पोचेल अशा पद्धतीने लेखी दिला पाहिजे. सभेच्या अध्यक्षांनी परवानगी दिलेले असे विषय आयत्या वेळच्या विषयांवरील चर्चेत घेतले जातील. अशा विषयांवर सभेस उपस्थित असलेल्या सभासदांच्या १/३ बहुमताने हात वर करून किंवा आवाजी पद्धतीच्या आधारे अध्यक्ष निर्णय जाहीर करतील. सदर सभेच्या सूचनेबरोबरच परिषदेचे कार्यवृत्त, सनदी लेखापाल यांचेकडून आलेली आर्थिक पत्रके सभासदांना अध्यक्ष व प्रमुख कार्यवाह यांनी सभासदांच्या मागणीनुसार उपलब्ध करून द्यावीत. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ए) मताधिकार असलेल्या ५० सभासदांनी योग्य कारण दर्शवून, रितसर सह्या करून मागणी सभेसाठी अर्ज केल्यास असा अर्ज मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या आत मागणीपत्रातील विषयांचा निर्णय करण्यासाठी मागणी सभा बोलविण्याची व्यवस्था अध्यक्षांनी करावी. | ७) परिषदेच्या अधिकृत सभासदांपैकी किमान एक हजार (१,०००) सभासद रितसर सह्या करून एखाद्या विषयावर सर्वसाधारण सभेची मागणी करू शकतील. असा मागणी अर्ज परिषदेच्या कार्यालयात आल्यापासून दोन महिन्याच्या आत प्रमुख कार्यवाह यांनी अध्यक्षांच्या सल्ल्याने अशी मागणीची सभा बोलावली पाहिजे. सदर सभेत फक्त मागणी केलेल्या विषयापुरतेच कामकाज होईल. | **सभासद संख्या बदल प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ऐ) वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा अथवा मागणी सभा यांना एकूण सभासदांच्या १/२५ किंवा ५० यापैकी जी कमी असेल ती गणसंख्या राहील. गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी | ८) वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा अथवा मागणी सभा यांना एकूण सभासदांच्या १/२५ किंवा १०० यापैकी जी कमी असेल ती गणसंख्या पूर्ती राहील. गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली सभा त्याच | **संख्या व शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १८** | व त्याच ठिकाणी १५ मिनिटांच्या अवधीनंतर भरेल. अशा सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही. | दिवशी व त्याच ठिकाणी १५ मिनिटांच्या अवधीनंतर भरेल. अशा सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ओ) परिषदेचे अध्यक्ष हेच वरील सर्व सभांचे अध्यक्ष राहतील. अध्यक्ष उपस्थित नसल्यास उपाध्यक्षापैकी कार्याध्यक्षांनी सुचवलेले एक उपाध्यक्ष सभेचे अध्यक्ष होतील.<br>औ) अध्यक्ष वा कोणीही उपाध्यक्ष वार्षिक सभेला उपस्थित नसल्यास कार्याध्यक्षांनी विश्वस्त, पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळाचे सभासद यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही अनुभवी सभासदाची त्या सभेपुरती अध्यक्ष म्हणून नियुक्ती करावी. | ९) कलम १७ (२) मधील सर्व सभांचे अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष राहतील. अध्यक्ष गैरहजर असतील तर हजर उपाध्यक्षांतून वयाने जेष्ठतम उपाध्यक्ष सभेचे अध्यक्ष असतील. तेही गैरहजर असल्यास प्रमुख कार्यवाह किंवा कोषाध्यक्ष अध्यक्षपद भूषवतील. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | | ११) राष्ट्रीय व जागतिक महामारी, साथीचे रोग, नैसर्गिक संकटे (महापूर, वादळ, अतिवृष्टी, भूकंप, भूस्खलन, इत्यादी सदृश) युद्ध यासारख्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये, तसेच प्रदीर्घ काळ राज्य शासनाने लॉकडाऊन, संचारबंदी लावली तर व त्या कालावधीमध्ये परिषद कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची निवडणूक येत असेल तर अशा परिस्थितीत ही निवडणूक न घेता विद्यमान कार्यकारी मंडळ व पदाधिकारी यांनाच कार्यकारी मंडळाच्या शिफारशीने एक वर्ष ते तीन वर्षे कालावधीसाठी वार्षिक सभेत मुदतवाढ दिली जाईल. पण अशा परिस्थितीत जर वार्षिक सभा सुद्धा घेणे अशक्यच असेल तर हा आपत्कालीन मुदत वाढीचा निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील व नंतर | **आपतकालीन परिस्थितीत प्रशासकीय सोयीसाठी नवीन कलम** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | | त्याची कार्योत्तर मंजुरी पुढील वार्षिक सभेत घेतली जाईल. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| **कलम १९** | **द्रव्यनिधी :**<br>परिषदेचे द्रव्यनिधी पुढील प्रकारचे असतील –<br>अ) विश्वस्तांकडील स्थिर निधी– सर्व प्रकारच्या आजीव सभासदांची वर्गणी. | **कलम १९ – द्रव्यनिधी :**<br>परिषदेचे द्रव्यनिधी पुढील प्रकारचे असतील –<br>१) विश्वस्तांकडील स्थिर निधीमध्ये सर्व प्रकारच्या आजीव व संलग्न संस्था सभासदांची ₹ ५,०००/– वर्गणी याचा समावेश असेल. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | आ) विश्वस्तांकडील राखीव निधी– विशिष्ट कार्याकरिता मिळालेल्या कायम स्वरूपाच्या देणग्या. | २) विश्वस्तांकडील राखीव निधी– विशिष्ट कार्याकरिता मिळालेल्या कायम स्वरूपाच्या देणग्या. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | इ) कार्यकारी मंडळाकडील साधारण निधी– साधारण सभासदांची वार्षिक वर्गणी, इतर वर्गणी, अतिथी निवास देणग्या, ग्रंथ विक्री, योगक्षेमार्थ जमा होणाऱ्या देणग्या, दैनंदिन इतर उत्पन्ने व वर (अ) व (आ) मध्ये उल्लेखिलेल्या निधीव्यतिरिक्त मिळालेले इतर सर्व प्रकारचे उत्पन्न. | ३) कार्यकारी मंडळाकडील साधारण निधी– सभागृह भाडे, अतिथी निवास देणग्या, ग्रंथ विक्री, योगक्षेमार्थ जमा होणाऱ्या देणग्या, दैनंदिन इतर उत्पन्ने व वर (१) व (२) मध्ये उल्लेखिलेल्या निधीव्यतिरिक्त मिळालेले इतर सर्व प्रकारचे उत्पन्न. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ई) वरील तीन प्रकारच्या निधीपैकी (अ) व (आ) मधील निधी विश्वस्तांच्या स्वाधीन असतील. यावरील व्याजाची रक्कम कार्यकारी मंडळाने आवश्यकतेनुसार दैनंदिन खर्चासाठी व राखीव निधीच्या देणगीदारांच्या इच्छेनुसार वापरावयाची आहे. | ४) वरील तीन प्रकारच्या निधीपैकी (१) व (२) मधील निधी विश्वस्तांच्या स्वाधीन असतील. यावरील व्याजाची रक्कम कार्यकारी मंडळाने आवश्यकतेनुसार दैनंदिन खर्चासाठी व राखीव निधीच्या देणगीदारांच्या इच्छेनुसार वापरावयाची आहे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम १९** | उ) वर (इ) मध्ये उल्लेखिलेला सर्व प्रकारचा निधी परिषदेच्या दैनंदिन कामासाठी कार्यकारी मंडळाच्या स्वाधीन राहील. त्याची गुंतवणूक करण्याचा अधिकार सर्वस्वी कार्यकारी मंडळाला राहील. | ५) वर (३) मध्ये उल्लेखिलेला सर्व प्रकारचा निधी परिषदेच्या दैनंदिन कामासाठी कार्यकारी मंडळाच्या स्वाधीन राहील. त्याची गुंतवणूक करण्याचा अधिकार सर्वस्वी कार्यकारी मंडळाला राहील. | **बदल नाही** |
| | ऊ) अपवादात्मक परिस्थितीत स्थिर निधीपैकी काही रक्कम खर्चासाठी मागण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. | ६) अपवादात्मक परिस्थितीत परिषदेच्या दैनंदिन खर्चासाठी व विविध कार्यक्रमांसाठी परिषदेची आर्थिक अडचण असेल तर अशावेळी स्थिर निधी पैकी काही रक्कम उसनवार म्हणून कार्यकारी मंडळाच्या संमतीने कोषाध्यक्ष विश्वस्त मंडळास मागू शकतील. परंतु परिषद आर्थिक स्थिती सुधारताच सदर रक्कम स्थिर निधीमध्ये पुन्हा जमा केली पाहिजे. | **आर्थिक शिस्तीसाठी बदल** |
| **कलम २०** | **द्रव्यनिधी व खर्च :** अ) वर १९ (ई) मध्ये उल्लेखिलेल्या वसूलीतून आवश्यक खर्चाकरता ₹ २,०००/- (रुपये दोन हजार) फक्त कार्यालयात ठेवून बाकी सर्व रक्कम कार्यवाहांनी बँकेत जमा करावी व खर्चाकरता आवश्यकतेप्रमाणे रक्कम कोषाध्यक्षांकडून मागवून घ्यावी. | **कलम २० - द्रव्यनिधी व खर्च :** १) वर १९ (४) मध्ये उल्लेख केलेल्या रकमेतून ₹ १०,०००/- (रुपये दहा हजार) फक्त एवढी रक्कम कार्यालयात ठेवून बाकी रक्कम प्रमुख कार्यवाह/कोषाध्यक्ष यांनी बँकेत जमा करावी. आवश्यकतेनुसार खर्चासाठीची रक्कम बँकेतून काढून घ्यावी. | **रकमेत बदल झाल्यामुळे प्रशासकीय सोयीसाठी** |
| | आ) कोषाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह यांनी शक्यतो अर्थसंकल्पानुसार खर्च करावा. जादा आणि विशेष खर्च उद्भवल्यास तो पदाधिकारी समितीची पूर्वसंमती घेऊन करावा. | २) कोषाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह यांनी मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीनुसारच खर्च करावेत. पण काही कारणाने जादा व विशेष खर्च करावा लागणार असेल तर तो पदाधिकारी समितीची पूर्व मंजूरी घेऊन करावा. | **शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
| --- | --- | --- | --- |
| **कलम २१** | **विश्वस्त मंडळ :**<br>अ) परिषदेची वास्तु, स्थिर व राखीव निधी सुरक्षित ठेवण्यासाठी व या निधीची योग्य प्रकारे गुंतवणूक करण्यासाठी कार्यकारी मंडळाने स्थानिक आजीव सभासदांमधून तीन सभासदांचे परिषदेचे विश्वस्त मंडळ म्हणून नियुक्त करावे. | **कलम २१ - विश्वस्त मंडळ : सदस्य संख्या ५**<br>१) परिषदेची वास्तू, स्थिर व राखीव निधी सुरक्षित ठेवण्यासाठी, त्याची योग्य प्रकारे गुंतवणूक करून देखभाल करण्यासाठी कार्यकारी मंडळ निवडून आल्यानंतरच्या पहिल्या सभेत आजीव सभासदांतून पाच सभासदांचे विश्वस्त मंडळ नियुक्त करेल. यातील तीन विश्वस्त पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आजीव सभासदांतून असतील व दोन विश्वस्त पुण्याबाहेरील उर्वरित परिषद कार्य क्षेत्रातील आजीव सभासदांतून निवडले जातील. परिषदेचे पदाधिकारी व कार्यकारी मंडळातील सभासद विश्वस्त होऊ शकणार नाहीत. | **सभासद संख्या बदलल्यामुळे प्रशासकीय सोयीसाठी** |
| | आ) नियुक्त विश्वस्तांना कायदा आणि हिशोब यांची स्थूलमानाने माहिती असावी. त्याचे वय किमान ५५ असावे. तसेच नियुक्तीच्या वेळी विश्वस्त हा परिषदेचा किमान तीन वर्षे आजीव सभासद असावा. | २) नियुक्त विश्वस्तांना कायदा आणि हिशोब यांची स्थूलमानाने माहिती असावी. त्याचे वय किमान ५५ असावे. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | इ) परिषदेचे पदाधिकारी/कार्यकारी मंडळ यांच्यातील आजीव सभासदां खेरीज इतर आजीव सभासदांतूनच विश्वस्तांची निवड करावी. | पोटकलम इ रद्द. | **कलम रद्द केल्यामुळे** |
| | ई) विश्वस्ताला आपल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाला, तर तो त्याने कार्याध्यक्षांकडे द्यावा. | ३) विश्वस्ताला आपल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाला, तर तो त्याने अध्यक्षांकडे द्यावा. | **कार्याध्यक्ष पद रद्द केल्याने शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम २१** | उ) मृत्यू, राजीनामा व इतर कारणांमुळे विश्वस्तांची जागा रिकामी झाल्यास कार्यकारी मंडळाने रिकाम्या जागी विद्यमान इतर दोघा विश्वस्तांच्या सल्ल्याने नवीन विश्वस्ताची नियुक्ती करावी. | ४) मृत्यू, राजीनामा व इतर कारणांमुळे विश्वस्ताची जागा रिक्त झाल्यास त्याजागी उर्वरित काळासाठी कार्यकारी मंडळ नवीन विश्वस्ताची निवड करेल. | **शब्दरचना बदल प्रशासकीय सोयीसाठी** |
| | ऊ) कुठलाही विश्वस्त आपले काम योग्य प्रकारे करीत नसल्याचे आढळून आल्यास त्याला विश्वस्त पदावरून विद्यमान इतर दोघां विश्वस्तांच्या सल्ल्याने ३/४ बहुमताने दूर करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. | ५) कुठलाही विश्वस्त आपले काम योग्य प्रकारे करीत नसल्याचे आढळून आल्यास त्याला विश्वस्त पदावरून विद्यमान इतर चार विश्वस्तांच्या सल्ल्याने व बहुमताने दूर करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| **कलम २२** | **विश्वस्तांची कामे :**<br>अ) विश्वस्त मंडळाने आपल्यातून एक अध्यक्ष आणि एक कार्यकारी विश्वस्त यांची निवड करावी. | **कलम २२ - विश्वस्तांची कामे :**<br>१) विश्वस्त मंडळाने आपल्या पहिल्या सभेत आपल्यातून एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि एक कार्यकारी विश्वस्त यांची निवड करावी. | **उपाध्यक्ष पद जादा घेतल्यामुळे** |
| | आ) बँक खाती- गुंतवणुका व इतर आर्थिक व्यवहार अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त यांच्या नावाने करण्यात यावा. | २) बँक खाती- गुंतवणुका व इतर आर्थिक व्यवहार अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त यांच्या संयुक्त सहीने करण्यात यावा. | **शब्दरचना बदल** |
| | इ) विश्वस्तांनी गुंतवणूक रजिस्टर ठेवावे. ते विश्वस्त मंडळ आणि पदाधिकारी यांच्या बैठकीत सादर करावे. | ३) विश्वस्तांनी गुंतवणूक रजिस्टर ठेवावे. ते विश्वस्त मंडळ आणि पदाधिकारी यांच्या बैठकीत सादर करावे. | **बदल नाही** |
| | ई) विश्वस्तांनी गुंतविलेल्या स्थिर व राखीव निधीच्या रकमेवरील व्याजाची रक्कम दर तीन महिन्यांनी कार्यकारी मंडळाला द्यावी. | ४) विश्वस्तांनी गुंतविलेल्या स्थिर व राखीव निधीच्या रकमेवरील व्याजाची रक्कम दर तीन महिन्यांनी कार्यकारी मंडळाला द्यावी. | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | उ) परिषदेचे ट्रस्ट डीड, विश्वस्त कायदा (पब्लिक ट्रस्ट ॲक्ट), सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट (सोसायटीज ॲक्ट) आणि परिषदेची घटना व साधारण सभेतील संमत झालेला प्रस्ताव आणि कार्यकारी मंडळाचे ठराव यांच्यातील तरतूदी विश्वस्तांवर बंधनकारक राहतील. | ५) परिषदेचे ट्रस्ट डीड, विश्वस्त कायदा (पब्लिक ट्रस्ट ॲक्ट), सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट (सोसायटीज ॲक्ट) आणि परिषदेची घटना व साधारण सभेतील संमत झालेला प्रस्ताव आणि कार्यकारी मंडळाचे ठराव यांच्यातील तरतूदी विश्वस्तांवर बंधनकारक राहतील. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ऊ) विश्वस्तांची आणि परिषदेचे पदाधिकारी यांची वर्षातून किमान २ वेळा संयुक्त सभा घेण्यात यावी. जरूर पडल्यास जादा सभा बोलविण्याचा कार्यकारी विश्वस्तांना अधिकार राहील. | ६) विश्वस्त मंडळ आणि परिषदेचे पदाधिकारी यांची वर्षातून तीन वेळा संयुक्त सभा परिषद प्रमुख कार्यवाहांनी बोलवावी. तसेच कार्यकारी मंडळा समवेत वर्षातून एकदा अशी बैठक प्रमुख कार्यवाहांनी विश्वस्त मंडळाच्या सल्ल्याने बोलवावी. | **बैठक संख्या वाढल्यामुळे प्रशासकीय सोयीसाठी** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | ए) विश्वस्तांना त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकरिता आवश्यकतेनुसार प्रमुख कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांनी आर्थिक बाबतीत आवश्यक तेव्हा सल्ला देत राहावा. | ७) विश्वस्तांना त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकरिता आवश्यकतेनुसार प्रमुख कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांनी आर्थिक बाबतीत आवश्यक तेव्हा योग्य वस्तुस्थिती कळविण्यात यावी. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| **कलम २३** | **बँक खाती/हिशोब :**<br>अ) विश्वस्तांकडून मिळवायचे स्थिर व राखीव निधीवरील व्याज, वार्षिक साधारण सभासदांच्या वर्गण्या, इतर वर्गण्या, अनामत रकमा, विनाअट देणग्या, ग्रंथ विक्रीची रक्कम, तसेच इतर उत्पन्न परिषदेच्या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेत वा सहकारी बँकेत जमा करावे. | **कलम २३ – बँक व्यवहार व हिशोब :**<br>१) विश्वस्तांकडून मिळणारे स्थिर व राखीव निधीवरील व्याज, इतर वर्गण्या, अनामत रकमा, विनाअट देणग्या, ग्रंथ विक्रीची रक्कम, तसेच इतर उत्पन्न परिषदेच्या नावाने धर्मादाय कायद्यातील तरतुदीनुसार राष्ट्रीयीकृत बँकेत वा मल्टीस्टेट शेड्यूल्ड सहकारी बँकेत जमा करावे. | **शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम २३** | आ) बँकेची सर्व खाती, सेव्हिंग्ज, करंट, कायम, इ. कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह या तिघांच्या नावे असावीत. या खात्याचा कारभार या तिघांपैकी दोघांना संयुक्तपणे करण्याचा अधिकार असावा. मात्र रकमा शक्यतो कोषाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह यांच्या सहीने काढाव्यात. विशेष निकडीच्या प्रसंगी या दोघांपैकी एकाची सही मिळणे अशक्य झाल्यास कार्याध्यक्षांच्या सहीने रकमा काढता येतील. | २) बँकेची सर्व खाती, सेव्हिंग्ज, करंट, कायम, इ. वर अध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह या तिघांच्या नावे अधिकार असेल. या खात्याचा कारभार या तिघांपैकी दोघांना संयुक्तपणे करण्याचा अधिकार असावा. मात्र रकमा शक्यतो कोषाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह यांच्या सहीने काढाव्यात. विशेष निकडीच्या प्रसंगी या दोघांपैकी एकाची सही मिळणे अशक्य झाल्यास त्याजागी अध्यक्षांच्या सहीने रकमा काढता येतील. | **शब्दरचना बदल**<br><br>**कार्याध्यक्ष पद रद्द केल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम २४** | **परिषदेचे विभागीय संमेलन :**<br>अ) परिषदेने शक्यतो प्रतिवर्षी आपल्या कार्यक्षेत्रात परिषदेचे विभागीय साहित्य संमेलन भरवावे | **कलम २४ - परिषदेचे वार्षिक मराठी साहित्य संमेलन :**<br>१) परिषदेने शक्यतो प्रतिवर्षी आपल्या कार्यक्षेत्रात परिषदेचे वार्षिक मराठी साहित्य संमेलन भरवावे. **परिशिष्ट 'क'** पहावे. | **' वार्षिक मराठी' शब्द घेतल्यामुळे** |
| ------ | ----------------------------------------. | ---------------------------------------- | -------------- |
| | आ) हे संमेलन परिषदेच्या शाखेमार्फत किंवा संलग्न संस्थेमार्फत भरविण्यात यावे. | २) हे संमेलन परिषदेच्या शाखेमार्फत किंवा संलग्न संस्थेमार्फत भरविण्यात यावे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | इ) संमेलनाचे निमंत्रण संबंधित शाखेने/संस्थेने वर्षाच्या पहिल्या तिमाहीत केंद्र कार्यालयाकडे पाठवावे. | ३) ज्या शाखेला/संलग्न संस्थेला संमेलन घ्यायचे असेल त्यांनी संमेलनाचा प्रस्ताव संबंधित शाखेने/संस्थेने वर्षाच्या पहिल्या तिमाहीत परिषद मुख्य कार्यालयाकडे पाठवावे. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ई) संमेलन- निमंत्रणास मान्यता मिळाल्यावर निमंत्रक संस्था/शाखा आणि | ४) संमेलन प्रस्तावास मान्यता मिळाल्यावर निमंत्रक संस्था/शाखा यांचे २ | |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम २४** | परिषदेचे कार्यकारी मंडळ यांचे प्रत्येकी ३ प्रतिनिधी मिळून संमेलनाचे सल्लागार मंडळ अस्तित्वात येईल. | प्रतिनिधी आणि परिषदेच्या कार्यकारी मंडळावरील संबंधित जिल्हा प्रमुख मिळून संमेलनाचे सल्लागार मंडळ अस्तित्वात येईल. जिल्हा प्रमुखांमधील १ निमंत्रक व उर्वरित सहाय्यक निमंत्रक यांचा समावेश असेल. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | उ) संमेलनाची पुढील सर्व कार्यवाही सल्लागार मंडळाच्या निर्णयानुसारच होईल. | ५) संमेलनाची पुढील सर्व कार्यवाही सल्लागार मंडळाच्या निर्णयानुसारच होईल. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ऊ) संमेलन संपल्यावर २ महिन्यांच्या आत निमंत्रक संस्थेने हिशोबाचे काम पूर्ण करावे. शिलकी रकमेचा विनियोग निमंत्रक संस्थेने साहित्य विषयक कार्याकरिता करावयाचा आहे. मात्र अशा शिल्लक रकमेपैकी २५ टक्के रक्कम निमंत्रक संस्थेने परिषदेच्या केंद्रीय कार्यालयाकडे देणगी म्हणून संमेलन संपल्यावर २ महिन्यांच्या आत सुपूर्त करावी. | ६) संमेलन संपल्यावर २ महिन्यांच्या आत निमंत्रक संस्थेने हिशोबाचे काम पूर्ण करावे. शिलकी रकमेचा विनियोग निमंत्रक संस्थेने साहित्य विषयक कार्याकरिता करावयाचा आहे. मात्र अशा शिल्लक रकमेपैकी २५ टक्के रक्कम निमंत्रक संस्थेने परिषदेच्या केंद्रीय कार्यालयाकडे देणगी म्हणून संमेलन संपल्यावर २ महिन्यांच्या आत सुपूर्त करावी. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ए) आवश्यकता वाटल्यास परिषदेला स्वतंत्रपणे विभागीय संमेलन भरविता येईल किंवा शाखेतर्फे होणाऱ्या विभागीय संमेलनास आर्थिक साहाय्य करता येईल. | ७) कोणत्याही शाखेने/संलग्न संस्थेने वार्षिक मराठी साहित्य संमेलन घेण्यास असमर्थता कळविल्यास परिषद स्वतःच पदाधिकारी समितीच्या सल्ल्याने असे वार्षिक मराठी साहित्य संमेलन मुख्यालयाच्या ठिकाणी आयोजित करू शकतील. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | | ८) वार्षिक मराठी साहित्य संमेलनासाठी परिषदेने किती निधी द्यावयाचा याचा निर्णय कार्यकारी मंडळात होईल. त्यानुसार कोषाध्यक्षांनी त्याची | **प्रशासकीय सोयीसाठी** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम २४** | | अर्थसंकल्पीय तरतूद करावी. | |
| **कलम २५** | **परिषदेच्या शाखा :**<br>अ) परिषदेच्या कार्यक्षेत्रात परिषदेच्या कार्याला उपयुक्त व पूरक ठरणाऱ्या शाखा परिषदेला स्थापन करता येतील. | **कलम २५ – परिषदेच्या शाखा :**<br>१) परिषदेच्या कार्यक्षेत्रात परिषदेच्या कार्याला उपयुक्त व पूरक ठरणाऱ्या शाखा परिषदेला स्थापन करता येतील. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | आ) हे शाखा– नियम या घटनेचे परिशिष्ट 'अ' म्हणून जोडले आहेत. | २) हे शाखा– नियम या घटनेचे **परिशिष्ट 'ब'** मध्ये जोडले आहेत. | **परिशिष्ट ब ही शब्दरचना घेतल्यामुळे** |
| | इ) शाखेचे कार्य असमाधानकारक वा परिषदेच्या हितसंबंधांना बाधक असे आढळल्यास किंवा परिशिष्ट 'अ' मधील नियमांचा शाखेकडून भंग झाल्यास शाखा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. मात्र शाखा रद्द करण्यापूर्वी शाखेस कारणे दाखवून नोटीस देणे व शाखेच्या संबंधितांचा खुलासा घेऊन नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार निर्णय व्हावा. कार्यकारी मंडळाच्या या निर्णयावर सर्वसाधारण सभेकडे दाद मागण्याचा अधिकार संबंधित शाखेला राहील. | ३) शाखेचे कार्य असमाधानकारक वा परिषदेच्या हितसंबंधांना बाधक असे आढळल्यास किंवा **परिशिष्ट 'ब'** मधील नियमांचा शाखेकडून भंग झाल्यास संबंधित जिल्हा प्रमुखांच्या शिफारशीनुसार शाखा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. मात्र शाखा रद्द करण्यापूर्वी शाखेस कारणे दाखवून नोटीस देणे व शाखेच्या संबंधितांचा खुलासा घेऊन नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार निर्णय घेण्यात येईल. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | | ४) परिषदेची शाखा नव्याने उघडण्यासाठी संबंधित जिल्हा प्रमुखांची लेखी शिफारस असल्याशिवाय कोणतीही नवी शाखा कार्यकारी मंडळाने मंजूर करू नये. तसेच शाखा सुरू करण्यासाठी जिल्हा प्रमुखांची लेखी शिफारस अर्जासोबत | **नवीन कलम समाविष्ट केल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम २५** | | नसेल तर असे अर्जसुद्धा परिषद कार्यालयाला स्वीकारता येणार नाहीत व त्या नियोजित शाखा सभासदांच्या वर्गणीचे पैसेही जमा करता येणार नाहीत. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | | ५) विद्यमान शाखेच्या ५० किलोमीटर मर्यादेत कोणतीही नवी शाखा कार्यकारी मंडळ मंजूर करणार नाही. | **नवीन कलम समाविष्ट केल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | | ६) ज्या शाखा सलग २ वर्षे कोणताही कार्यक्रम आयोजित करणार नाहीत व सलग दोन वर्षे लेखापरीक्षण अहवाल परिषदेस सादर करणार नाहीत अशा शाखांना नोटीस देऊन जिल्हा प्रमुखांच्या शिफारशीनुसार जवळच्या शाखेत विलिनीकरण करण्यात येईल. | **नवीन कलम समाविष्ट केल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम २६** | **संलग्न संस्था :**<br>अ) परिषदेच्या कार्यक्षेत्रातील साहित्य संस्थांना परिषदेचे उद्देश मान्य करून परिषदेशी सर्व माहितीसह ₹ १,०००/- (रुपये एक हजार) फक्त भरून संलग्न होता येईल.<br>आ) संलग्न होऊ इच्छिणाऱ्या अशा संस्थेने ₹ १,०००/- भरून लेखी अर्ज करावा.<br>इ) कार्यकारी मंडळाने हा अर्ज संमत केल्यावर ही संस्था परिषदेची संलग्न संस्था म्हणून मानली जाईल.<br>ई) संलग्न संस्थेची आजीव वर्गणी ₹ १,०००/- राहील. | **कलम २६ – संलग्न संस्था :**<br>१) परिषदेच्या कार्यक्षेत्रातील साहित्य संस्थांना परिषदेचे उद्देश मान्य असतील त्यांचे साहित्यिक उपक्रम सातत्याने चालू असतील तर अशा संस्थांना कार्यकारी मंडळ वरील बाबींचा विचार करून संबंधित जिल्हा प्रमुखाच्या शिफारशीनुसार निर्णय घेईल. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंद असेल तर अशा संस्थांना त्यांच्या मागणीनुसार परिषदेची संलग्न संस्था म्हणून कार्यकारी मंडळ मंजुरी देईल. अशा संस्थांनी त्यांचा अर्ज कार्यकारी मंडळात मंजूर झाल्यावर व प्रमुख कार्यवाहाचे तसे लेखी पत्र त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी संलग्नता वर्गणी म्हणून ₹ ५,०००/- (रुपये पाच हजार) फक्त परिषदेकडे | **प्रशासकीय सोयीसाठी** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २६ | | जमा करावेत. संलग्न संस्थेने रितसर त्यांच्या कार्यकारी मंडळात ठराव करून परिषदेवर पाठविलेल्या प्रतिनिधीस परिषदेचा आजीव सभासद होणे आवश्यक आहे. | प्रशासकीय सोयीसाठी |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | उ) या संस्थेचा एक प्रतिनिधी परिषदेचा मतदार सभासद म्हणून समजला जाईल. | २) संलग्न संस्थेने कळविलेला अधिकृत प्रतिनिधी सभासद परिषदेच्या निवडणुकीत मतदान करू शकेल. पण तो परिषद निवडणुकीत उमेदवार म्हणून निवडणूक लढवू शकणार नाही. | शब्दरचना बदलल्यामुळे |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ऊ) संलग्न संस्थेला 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे त्रैमासिक भेटीदाखल पाठवले जाईल. | ३) संलग्न संस्थेला 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे त्रैमासिक देणगी मूल्य आकारुन पाठवले जाईल. | बदल नाही |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ए) संलग्न संस्थेने आपल्या कार्याचे त्रोटक कार्यवृत्त वर्ष अखेर परिषदेकडे पाठवावे. | ४) संलग्न संस्थेने आपल्या कार्याचे त्रोटक कार्यवृत्त वर्ष अखेर परिषदेकडे पाठवावे. | बदल नाही |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ऐ) परिषद संलग्न संस्थेच्या कुठल्याही आर्थिक व्यवहारास जबाबदार राहणार नाही. | ५) परिषद संलग्न संस्थेच्या कुठल्याही आर्थिक व्यवहारास जबाबदार राहणार नाही. | बदल नाही |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| कलम २७ | **महामंडळ :**<br>अ) महामंडळावर परिषदेचे एकूण तीन प्रतिनिधी असतील. त्यापैकी कार्याध्यक्ष व प्रमुख कार्यवाह हे परिषदेचे महामंडळावरील पदसिद्ध प्रतिनिधी असतील. | **कलम २७ – अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ :**<br>१) महामंडळावर परिषदेचे एकूण तीन प्रतिनिधी असतील. त्यापैकी परिषदेचे अध्यक्ष व प्रमुख कार्यवाह हे दोघे परिषदेतर्फे महामंडळावर पदसिद्ध प्रतिनिधी | प्रशासकीय सोयीसाठी |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम २७** | | असतील. तिसऱ्या प्रतिनिधीची निवड कार्यकारी मंडळात बहुमताने होईल व ही निवड एक वर्षापुरतीच असेल. | **शब्दरचना बदल** |
| | | २) तसेच महामंडळाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या विश्वस्त मंडळावरील दोन सदस्यांची निवड कार्यकारी मंडळात होईल. या प्रतिनिधींची मुदत महामंडळ घटनेनुसार ५ वर्षांपर्यंत राहील. | **प्रशासकीय सोयीसाठी नवीन कलम** |
| **कलम २८** | **रिकाम्या जागा भरणे :** अ) अध्यक्षांसहित सर्व पदाधिकारी यांच्या जागा कोणत्याही कारणाने रिकाम्या झाल्यास उर्वरित मुदतीसाठी कार्यकारी मंडळाने बहुमताने नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. | **कलम २८ – रिकाम्या जागा भरणेबाबत :** १) अध्यक्षांसहित सर्व पदाधिकारी यांच्यापैंकी कोणतेही पद कोणत्याही कारणाने रिक्त झाल्यास उर्वरित मुदतीसाठी कार्यकारी मंडळ आपल्या सभेत नव्या पदाधिकाऱ्याची नियुक्ती करेल. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | आ) कार्यकारी मंडळाच्या सभासदाची जागा कोणत्याही कारणाने रिकामी झाल्यास उर्वरित मुदतीसाठी त्या त्या गटातील सभासदाची कार्यकारी मंडळाने बहुमताने नियुक्ती करावी. | २) कार्यकारी मंडळाच्या सभासदाची जागा कोणत्याही कारणाने रिक्त झाल्यास उर्वरित मुदतीसाठी संबंधित वर्गातील सभासदाची कार्यकारी मंडळा उर्वरित काळासाठी बहुमताने नियुक्ती करेल. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | इ) कार्यकारी मंडळाच्या लागोपाठ सलग तीन सभांना अनुपस्थित राहणाऱ्या सभासदाचे कार्यकारिणीमधील सभासदत्व आपोआप रद्द होईल. अशा रितीने सभासदत्व रद्द झालेल्या रिकाम्या जागेवर कार्यकारी मंडळाने बहुमताने त्या त्या गटातील सभासदांची उर्वरित काळासाठी नियुक्ती करावी. | ३) कार्यकारी मंडळाच्या लागोपाठ सलग तीन सभांना पूर्वसूचनेशिवाय अनुपस्थित राहणाऱ्या सभासदाचे कार्यकारी मंडळातील सभासदत्व आपोआप रद्द होईल. अशा रितीने सभासदत्व रद्द झालेल्या रिक्त झालेल्या जागेवर कार्यकारी मंडळाने बहुमताने संबंधित वर्गातील सभासदांची उर्वरित काळासाठी | **शब्दरचना बदलल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | | नियुक्ती करावी. | |
| **कलम २९** | **पोटनियम :**<br>अ) परिषदेचे उद्देश, साधने आणि कारभार यांना उपयुक्त, पूरक व सुसंगत ठरणारे पोटनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. मात्र हे नियम घटनेचा भाग असणार नाहीत. | **कलम २९ - पोटनियम :**<br>१) परिषदेचे उद्देश, साधने व प्रशासकीय कारभार यासाठी सुसंगत असे पोटनियम करण्याचा अपवादात्मक विशेष अधिकार कार्यकारी मंडळास असेल. त्याची अंमलबजावणी करणे ही प्रमुख कार्यवाहांची जबाबदारी राहील. परंतु असे नियम परिषद घटनेचा भाग असणार नाहीत व घटनेशी विसंगत असणार नाहीत. | **शब्दरचना प्रशासकीय सोयीसाठी बदलल्यामुळे** |
| **कलम ३०** | **घटना दुरूस्ती :**<br>अ) परिषदेच्या घटनेत कुठलीही दुरूस्ती/बदल करावयाचा असेल, तर तशी सूचना किमान ५० सभासदांच्या सहीने आधी कार्यकारी मंडळापुढे आली पाहिजे. अशी दुरूस्ती संमत होण्यासाठी कार्यकारी मंडळाचे ३/४ बहुमत आवश्यक आहे. | **कलम ३० - घटना दुरूस्ती :**<br>१) परिषदेच्या घटनेत कुठलीही दुरूस्ती/बदल करावयाचा असेल, तर तशी सूचना किमान १०० सभासदांच्या सहीने आधी कार्यकारी मंडळापुढे आली पाहिजे. अशी दुरूस्ती संमत होण्यासाठी कार्यकारी मंडळाचे ३/४ बहुमत आवश्यक आहे. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदलल्यामुळे** |
| | आ) आवश्यकता वाटल्यास कार्यकारी मंडळाला २/३ बहुमताने आपणहूनही घटनेत बदल सुचवता येतील. | पोटकलम आ रद्द. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | | २) परिषदेच्या घटनेमध्ये परिषदेच्या मूळ उद्देशाशी सुसंगत व प्रशासकीय सोयीसाठी परिषदेच्या हितासाठी उपयुक्त अशी कोणतीही दुरूस्ती व बदल | **शब्दरचना बदलल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ३०** | | सुचवण्यासाठी कार्यकारी मंडळ एक घटना दुरुस्ती उपसमिती नियुक्त करेल. या उपसमितीमध्ये परिषदेचे अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष हे पदसिद्ध सभासद असतील. तसेच या समितीवर कार्यकारी मंडळातील तीन सदस्यांची निवड कार्यकारी मंडळ करेल. या तीन सदस्यांपैकी एक सदस्य घटना समितीचा निमंत्रक असेल. ही समिती घटना दुरूस्तीचा अहवाल, कार्यकारी मंडळास अशी समिती नियुक्त केल्यापासून एक वर्षाचे आत देईल. | **नवीन कलम** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | इ) घटनेत बदल सुचवणाऱ्या दुरूस्त्या वरीलप्रमाणे कार्यकारी मंडळाने ३/४ बहुमताने संमत केल्यावर, १ महिन्याची पूर्वसूचना देऊन या दुरूस्त्या संमत करून घेण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलविली पाहिजे. या सभेत एकूण हजर असलेल्या सभासदापैकी ३/४ सभासदांनी संमती दिल्यावर या दुरूस्त्या अंतिम समजण्यात येतील व घटनेत तसा बदल करण्यात आल्याचे समजण्यात येईल. | ३) घटना दुरूस्ती समितीचा अहवाल नजीकच्या कार्यकारी मंडळात सादर केला जाईल व ही घटना दुरूस्ती कार्यकारी मंडळातील उपस्थित सभासदांपैकी २/३ बहुमताने मंजूर झाली पाहिजे. त्यानंतर अशी सुधारित घटना कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यानंतर ती सदर नवीन घटना मंजूरीसाठी परिषदेची विशेष साधारण सभा बोलवावी लागेल. व त्यामध्ये उपस्थित सभासदांच्या २/३ बहुमताने ही सुधारित घटना मंजूर व्हावी लागेल. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | | ४) विशेष सर्वसाधारण सभेत रितसर घटना मंजूर झाल्यानंतर ह्या सुधारित घटनेची अंमलबजावणी अंतिम मंजूरी दिलेल्या विशेष सर्वसाधारण सभेनंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून लागू होईल. पण, ही सुधारित घटना मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे कार्यालयात कार्योत्तर मंजुरीसाठी आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रासह पाठविण्याची जबाबदारी परिषदेचे प्रमुख कार्यवाह व परिषद कायदा सल्लागार यांची राहील. | **प्रशासकीय सोयीसाठी नवीन कलम** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम ३०** | ई) अशा प्रकारची घटना दुरूस्ती झाल्यावर तिच्याशी विसंगत वा विरोधी दुरूस्ती किमान तीन वर्षे करता येणार नाही. | ६) अशा प्रकारची घटना दुरूस्ती झाल्यानंतर त्या घटनेमध्ये अधिक दुरूस्ती किंवा तिच्याशी विसंगत वा विरोधी दुरुस्ती किमान तीन वर्षे कोणत्याही सभेत करता येणार नाही. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | उ) किरकोळ स्वरूपाची घटना दुरूस्ती परिषदेच्या वार्षिक साधारण सभेत कार्यक्रम पत्रिकेत नमूद करून सभेकडून ती संमत करून घेता येईल. | ७) किरकोळ स्वरुपाची पण आवश्यकता असेल अशी घटनादुरुस्ती आधी कार्यकारी मंडळात बहुमताने मंजूर करावी व या किरकोळ दुरुस्तीस नजिकच्या वार्षिक सभेत बहुमताने मान्यता घ्यावी लागेल. पण त्यासाठी या दोन्ही सभांच्या विषयपत्रिकेवर तसा आवश्यक बदल नमूद केलेला विषय असणे आवश्यक आहे. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'अ' कार्यकारी मंडळ निवडणूक कलम ११ नुसार कलम ३१)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ३१** | | **परिशिष्ट 'अ'** : (कार्यकारी मंडळ निवडणूक कलम ११ संदर्भानुसार)<br>**निवडणूक मंडळ :**<br>१) महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे या संस्थेच्या दर पाच वर्षांनी होणाऱ्या पदाधिकारी व कार्यकारी मंडळ निवडणुकीसाठी निवडणूक मंडळाची नियुक्ती निवडणुकीच्या आधी तीन महिने कार्यकारी मंडळात केली जाईल.<br>२/१) परिषदेच्या अध्यक्ष, कोषाध्यक्ष व प्रमुख कार्यवाह व अन्य ७ कार्यवाह या पदासाठी निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या आजीव सदस्य यांचे निवडणूक अर्ज भरतेवेळी वय ७५ वर्षे पूर्ण पर्यंतच असले पाहिजे. तसेच त्यांनी निवडणूक अर्जासोबत वयाचा विहित पुरावा जोडला पाहिजे. अन्यथा सदर निवडणूक अर्ज अवैध धरला जाईल.<br>२/२) परिषदेच्या जिल्हा प्रमुख म्हणून निवडणूक लढविणाऱ्या आजीव सदस्य यांचे सुद्धा वयोमर्यादा ७५ वर्षे पर्यंतच असली पाहिजे. अशा सदस्यांनी अर्ज भरतेवेळीच त्यांच्या वयाचा दाखला अर्जासोबत जोडला पाहिजे. अन्यथा सदर अर्ज अवैध धरला जाईल.<br>३) निवडणूक मंडळामध्ये एकूण तीन सदस्य असतील. त्यामध्ये (१) किमान दहा वर्षे वकिली व्यवसायातील किंवा निवृत्त न्यायमूर्ती विशेषतः धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील अनुभव असलेला असेल. (२) सामाजिक, सहकार, साहित्य, शिक्षण क्षेत्रातील पण किमान १० वर्षे अनुभव असलेला असावा. (३) साहित्य संस्था चालवण्याचा किमान १० वर्षे अनुभव असलेला असावा. अशी रचना असेल. | **कलम ३१ नुसार परिशिष्ट 'अ' नव्याने समाविष्ट केल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'अ' कार्यकारी मंडळ निवडणूक कलम ११ नुसार कलम ३१)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ३१** | | ४) हे निवडणूक मंडळ अस्तित्वात आल्यानंतर परिषद पदाधिकारी यांच्या सल्ल्यानुसार परिषद घटनेशी सुसंगत अशी निवडणुकीसाठी सर्व प्रथम पात्र मतदार यादी निश्चित करतील. यादी व त्यावरील विविध हरकतींची सुनावणी करून तयार झालेली अंतिम यादी, त्याचे प्रकाशन इत्यादी बाबतचे नियम निवडणूक मंडळ ठरवेल. जाहीर झालेल्या अंतिम यादीत कोणत्याही कारणास्तव कोणालाही बदल करता येणार नाही. कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या निवडणूक कार्यक्रमाची अंमलबजावणी निवडणूक मंडळ करेल.<br>५) निवडणुकीच्या काळात या निवडणूक मंडळासाठी परिषदेच्या मुख्य कार्यालयात स्वतंत्र कार्यालय असेल. तसेच या मंडळास मदतनीस म्हणून आवश्यक तो सेवक वर्ग देण्याची जबाबदारी परिषदेच्या प्रमुख कार्यवाहांची असेल. परिषदेच्या विद्यमान सेवकांपैकी असे सेवक निवडणूक कामासाठी कमी पडत असतील तर नवीन तात्पुरते कंत्राटी पद्धतीने सेवक दिले जातील. अशा सेवकांचे मानधन परिषद पदाधिकारी समिती ठरवेल.<br>६) निवडणुकीचा संपूर्ण तपशीलवार व कालबद्ध असा कार्यक्रम तयार करून तो परिषदेच्या संकेतस्थळावर, मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्याची जबाबदारी निवडणूक मंडळाची राहील. तसेच त्यांनी निवडणूक कार्यक्रमाची बातमी वृत्तपत्रांकडे पाठवावी. त्यासाठी व निवडणूक मंडळ दैनंदिन कामासाठी, निवडणूक पूर्ण होईपर्यंतच्या विविध खर्चासाठी स्वतंत्र निधीची तरतूद कार्यकारी मंडळाच्या सल्ल्याने कोषाध्यक्षांनी करावी.<br>७) निवडणूक मंडळातील तीन सदस्यांपैकी निवडणूक मंडळ अध्यक्ष म्हणून | **कलम ३१ नुसार परिशिष्ट 'अ' नव्याने समाविष्ट केल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'अ' कार्यकारी मंडळ निवडणूक कलम ११ नुसार कलम ३१)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ३१** | | आपल्या पहिल्याच सभेत त्यांची नियुक्ती करेल.<br>८) निवडणूक मंडळातील कोणत्याही कारणाने रिक्त झालेल्या जागी निवडणूक मंडळाचे अध्यक्ष व परिषद पदाधिकारी यांच्या सल्ल्याने उर्वरित काळासाठी नवीन सदस्याची नियुक्ती करण्यात येईल.<br>९) निवडणूक मंडळ गरजेनुसार परिषद कायदा सल्लागारास विचार विनिमय करण्यासाठी निवडणूक मंडळाच्या सभेत बोलावू शकेल.<br>१०) निवडणूक मंडळ सदस्य, कायदा सल्लागार यांचे मानधन निश्चित करण्याची जबाबदारी पदाधिकारी समितीची राहील. निवडणूक मंडळाचे दैनंदिन हिशोब, जमाखर्च इत्यादीसाठी परिषद कोषाध्यक्ष निवडणूक मंडळास सहकार्य करेल.<br>११) निवडणूक मंडळाचे सर्व कामकाज स्वायत्त असेल व त्यामध्ये निवडणुकीसाठी उभे असलेले उमेदवार, त्यांचे सूचक, अनुमोदक तसेच परिषद सदस्य, परिषद पदाधिकारी, कार्यकारी मंडळ सदस्य व आजीव सदस्य कोणताही हस्तक्षेप करू शकणार नाहीत. निवडणूकीचा कार्यक्रम ठरल्यानंतर १५ मार्चपर्यंत प्रक्रिया पूर्ण होऊन त्याच दिवशी निवडणूकीचा निकाल जाहीर होईल आणि १ एप्रिलपासून नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येईल. प्रमुख कार्यवाहांनी निवडणूक मंडळाच्या सल्ल्याने ३० दिवसात धर्मादाय आयुक्ताकडे बदल अर्ज सादर करावेत. (विहीत नमुन्यात)<br>१२) परिषद निवडणुकीतील उमेदवारी अर्ज नमुना, प्रतिज्ञापत्र, अर्जाची किंमत, उमेदवारांची डिपॉझिट रक्कम व त्याचा परतावा याबाबतचे नियम | **कलम ३१ नुसार परिशिष्ट 'अ' नव्याने समाविष्ट केल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'अ' कार्यकारी मंडळ निवडणूक कलम ११ नुसार कलम ३१)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम ३१** | | निवडणूक मंडळ ठरवेल व निवडणूक कार्यक्रम प्रसिद्धीमध्ये त्याचा समावेश असेल.<br>१३) परिषद निवडणुकीतील विजयी उमेदवारास निवडणूक मंडळ निवडणुकीच्या निकालानंतर तत्काळ अधिकृत प्रमाणपत्र देईल. तसेच संपूर्ण विजयी उमेदवारांची यादी निवडणूक मंडळ त्यांच्या सर्व सदस्यांच्या सहीने परिषदेकडे निवडणूक निकालानंतर त्याच दिवशी अधिकृतपणे देईल व त्यानंतरच अधिकृतपणे पदाधिकारी व कार्यकारी मंडळ अस्तित्वात येईल.<br>१४) परिषद निवडणूक निकालानंतर पुढे ३० दिवस निवडणूक मंडळ उर्वरित कामकाजासाठी अस्तित्वात राहील व त्यानंतर सदर निवडणूक मंडळ विसर्जित झाल्याचे नूतन परिषद प्रमुख कार्यवाह निवडणूक मंडळास लेखी कळवतील. | **कलम ३१ नुसार परिशिष्ट 'अ' नव्याने समाविष्ट केल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | |
| | | **विशेष कलम : परिषदेचे उपकेंद्र**<br>१) मसापचे आवश्यकतेनुसार एखाद्या जिल्ह्यात परिषदेचे उपकेंद्र सुरू करावयाचे झाल्यास त्या शाखेने तसा प्रस्ताव जिल्हा प्रमुखांमार्फत परिषदेकडे पाठवावा. त्या सुरुवापासूनचे कामकाज, शाखेची उपलब्ध जागा आणि कार्यक्षमता याचा विचार करून त्याचा निर्णय कार्यकारी मंडळ घेईल आणि अंतिम निर्णय जिल्हा प्रमुखांना कळविण्यात येईल. | |
| ------ | | ---------------------------------------- | |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | **परिशिष्ट 'अ'**<br>**महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम :**<br>**१) शाखेचे नाव :**<br>'महाराष्ट्र साहित्य परिषद- शाखा' असे राहील. | **कलम ३२ परिशिष्ट 'ब' :**<br>**महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम :**<br>**१) शाखेचे नाव :**<br>'महाराष्ट्र साहित्य परिषद- शाखा' .......... असे राहील.<br>नविन शाखा अस्तित्वात येण्याकरिता शाखेचे किमान ७५ आजीव सभासद असणे आवश्यक आहे. | **कलम ३२ परिशिष्टाच्या नावात बदल**<br>**शब्दरचना बदल** |
| | **२) उद्देश :**<br>महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेनुसार, घटनेतील उद्देशांप्रमाणे, केंद्र संस्थेच्या मार्गदर्शनानुसार शाखेच्या अधिकार क्षेत्रात कार्य करणे. | **२) उद्देश :**<br>महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेनुसार, घटनेतील उद्देशांप्रमाणे, केंद्र संस्थेच्या मार्गदर्शनानुसार शाखेच्या अधिकार क्षेत्रात कार्य करणे. | **बदल नाही** |
| | **३) साधने (कार्यपद्धती) :**<br>शाखांकडून साध्य करण्याच्या उद्देशांसाठी व त्यास अनुसरून अवश्य व योग्य वाटतील त्या साधनांचा शाखेच्या कार्यक्षेत्रात उपयोग केला जाईल.<br>(अ) शाखेच्या कार्यक्षेत्रात विभागीय साहित्य संमेलन, जिल्हा साहित्य मेळावे, उत्सव, चर्चासत्रे, सहली, कवि संमेलने, परिसंवाद, व्याख्याने आदी आयोजित करणे. | **३) साधने (कार्यपद्धती) :**<br>शाखांकडून साध्य करण्याच्या उद्देशांसाठी व त्यास अनुसरून अवश्य व योग्य वाटतील त्या साधनांचा शाखेच्या कार्यक्षेत्रात उपयोग केला जाईल.<br>(१) शाखेच्या कार्यक्षेत्रात वार्षिक मराठी साहित्य संमेलन, जिल्हा साहित्य मेळावे, उत्सव, चर्चासत्रे, सहली, कवि संमेलने, परिसंवाद, व्याख्याने, ग्रंथ/पुस्तक प्रदर्शने आदी आयोजित करणे. | **शब्दरचना बदल** |
| | (आ) मराठी भाषेच्या अभ्यासाला व प्रसाराला प्रोत्साहन देणे. | (२) मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या अभ्यासाला व प्रसाराला प्रोत्साहन देणे. | **शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | ------------- |
| **कलम २५** | (इ) अन्य भाषांच्या साहित्य-संस्थांशी व साहित्य-विषयक चळवळींशी आवश्यकतेनुसार सहकार्य करणे. | **कलम ३२**<br>(३) अन्य भाषांच्या साहित्य-संस्थांशी व साहित्य-विषयक चळवळींशी आवश्यकतेनुसार सहकार्य करणे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | ------------- |
| | (ई) मराठी भाषा व साहित्य यांच्या प्रगतीआड येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे. | (४) मराठी भाषा व साहित्य, संस्कृती यांच्या प्रगतीआड येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | ------------- |
| | (उ) समाजाच्या सर्व स्तरांत मराठी साहित्य- विषयक आवड, अभिरूची, आस्था व जागृती निर्माण करणे व त्याची वृद्धी करणे. | (५) समाजाच्या सर्व स्तरांत मराठी साहित्य- विषयक आवड, अभिरूची, आस्था व जागृती निर्माण करणे व त्याची वृद्धी करणे. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | ------------- |
| | | (६) क्र. १ ते ५ साठी शाखा समाजातून, सभासदांकडून स्थानिक देणग्या गोळा करू शकतील व त्यांना स्थानिक आश्रयदाते सभासद म्हणून मान्यता देण्यात यावी. यातील देणगीचा कोणताही हिस्सा केंद्रीय कार्यालयाला देण्याची आवश्यकता नाही. या देणगीची रक्कम शाखा पदाधिकारी ठरवतील. | **प्रशासकीय सोयीसाठी नव्याने समाविष्ट** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | ------------- |
| | **४) कार्यक्षेत्र :**<br>शाखेचे कार्यक्षेत्र ज्या गावात/शहरात शाखा असेल त्या ठिकाणा पुरते मर्यादित राहील. स्पष्टीकरण :<br>(अ) प्रस्तुत गाव जर जिल्ह्याचे ठिकाण असेल, तर त्या जिल्ह्यात इतरत्र | **४) कार्यक्षेत्र :**<br>शाखेचे कार्यक्षेत्र ज्या गावात/शहरात शाखा असेल त्या स्थानिक भौगोलिक ठिकाणा पुरते मर्यादित राहील. स्पष्टीकरण :<br>(अ) प्रस्तुत गाव जर जिल्ह्याचे ठिकाण असेल, तर त्या जिल्ह्यात इतरत्र | **नवीन शब्दरचना झाल्यामुळे** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | शाखा स्थापन होईपर्यंत त्या शाखेचे कार्यक्षेत्र जिल्हा हे राहील व त्या जिल्ह्यात इतरत्र शाखा स्थापन झाल्यास त्या प्रमाणात शाखेचे कार्यक्षेत्र कमी होईल. | शाखा स्थापन होईपर्यंत त्या शाखेचे कार्यक्षेत्र जिल्हा हे राहील व त्या जिल्ह्यात इतरत्र शाखा स्थापन झाल्यास त्या प्रमाणात जिल्हा शाखेचे कार्यक्षेत्र कमी होईल. | |
| **कलम २५** | (आ) नियमांप्रमाणे सध्या अस्तित्वात असलेल्या शाखा जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातून कमी करण्यात येतील. | **कलम ३२**<br>(आ) नियमांप्रमाणे सध्या अस्तित्वात असलेल्या शाखा जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातून कमी करण्यात येतील. | **बदल नाही** |
| | (इ) सभासद नोंदणी करण्यासाठी नव्या शाखेला केंद्राची परवानगी घ्यावी लागेल. | (इ) दोन शाखेतील अंतर ५० कि.मी. राहिल. नवीन शाखा स्थापन करायची झाल्यास त्यासाठी प्रथम जिल्हा प्रमुखाकडे तसा अर्ज करून नव्या शाखेबाबतची सर्व माहिती देणे बंधनकारक राहिल. तसेच शाखा स्थापनेसाठी सर्वप्रथम संबंधित जिल्हा प्रमुखांची संमती व नंतर केंद्राची परवानगी घ्यावी लागेल. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | (ई) महापालिका क्षेत्रात एकापेक्षा अधिक शाखा सुरू करण्यासाठी केंद्राची संमती आवश्यक राहील. | (ई) महापालिका क्षेत्रात एकापेक्षा अधिक शाखा ५० कि.मी.मर्यादेबाहेर सुरू करण्यासाठी जिल्हा प्रमुखाची व केंद्राची संमती आवश्यक राहील. | **प्रशासकीय सोयीसाठी** |
| | (उ) प्रत्येक शाखेला केंद्राकडून अधिकृत मान्यतापत्र मिळणे आवश्यक राहील. सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व शाखांना केंद्राकडून मान्यतापत्र देण्यात येईल. नव्या शाखांची स्थापना नियमानुसार झाल्यावर त्यांना केंद्राकडून मान्यतापत्र देण्यात येईल. अधिकृत मान्यतापत्राशिवाय नवी शाखा अस्तित्वात येणार नाही. | (उ) नव्या शाखेची स्थापना कार्यकारी मंडळाच्या नियमानुसार झाल्यावर त्यांना केंद्राकडून मान्यतापत्र देण्यात येईल. अधिकृत मान्यतापत्र जिल्हाप्रमुखाकडून शाखेला मिळाल्याशिवाय शाखेचे कामकाज सुरू होणार नाही. | **प्रशासकीय सोयीसाठी** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | | **कलम ३२**<br>(ऊ) शाखेच्या प्रत्येक कार्यक्रमास संबंधित शाखेने जिल्हा प्रमुखांना बोलवणे तसेच त्यांचे नाव कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत टाकणे बंधनकारक राहिल. | **प्रशासकीय सोयीसाठी नव्याने समाविष्ट** |
| | **५) वर्षगणना :**<br>केंद्र संस्थेप्रमाणे शाखेचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च राहील. | **५) वर्षगणना :**<br>केंद्र संस्थेप्रमाणे शाखेचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च राहील. | **बदल नाही** |
| | **६) सभासद वर्ग :**<br>म.सा.प.च्या घटनेस अनुसरून व त्यात नमूद केल्याप्रमाणे सभासद नोंदणी व वर्ग असतील. शाखेच्या कार्यक्षेत्रात स्थानिक सभासदांची नोंद शाखेकडेही असेल व त्यांच्या वर्गणीचा हिस्सा शाखेसही मिळेल. शाखेच्या सर्व कार्यक्रमात सभासद भाग घेऊ शकतील. स्थलांतरामुळे अन्यत्र गेलेल्या सभासदाला त्या ठिकाणी शाखा असल्यास त्या शाखेत समाविष्ट होणे आवश्यक आहे. सभासदाने स्थलांतर झाल्याचे केंद्र संस्थेस कळवावे. संबंधित शाखेला सभासद समाविष्ट करून घेण्याबद्दल कळवण्यात येईल व तो सभासद समाविष्ट करून घेणे त्या शाखेस बंधनकारक राहील. आजीव सभासद स्थलांतरित झाल्यास संबंधित शाखेला त्याच्या वर्गणीचा हिस्सा मिळणार नाही. कोणत्याही व्यक्तीस एकापेक्षा अधिक शाखांचे सभासद होता येणार नाही. | **६) सभासद वर्ग :**<br>म.सा.प.च्या घटनेस अनुसरून व त्यात नमूद केल्याप्रमाणे सभासद नोंदणी व वर्ग असतील. शाखेच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक सभासदांची नोंद शाखेकडेही असेल व आजीव सभासदाची संपूर्ण रक्कम मुख्य कार्यालयास पाठवावी. त्यातील शाखेचा ५०% हिस्सा केंद्रीय संस्थेने ३० दिवसाच्या आत शाखेस पाठवावा. शाखेच्या सर्व कार्यक्रमात सभासद भाग घेऊ शकतील. स्थलांतरामुळे अन्यत्र गेलेल्या सभासदाला त्या ठिकाणी शाखा असल्यास त्या शाखेत समाविष्ट होणे आवश्यक आहे. सभासदाने स्थलांतर झाल्याचे केंद्र संस्थेस कळवावे. संबंधित शाखेला सभासद समाविष्ट करून घेण्याबद्दल कळवण्यात येईल व तो सभासद समाविष्ट करून घेणे त्या शाखेस बंधनकारक राहील. आजीव सभासद स्थलांतरित झाल्यास संबंधित शाखेला त्याच्या वर्गणीचा हिस्सा मिळणार नाही. कोणत्याही व्यक्तीस एकापेक्षा अधिक | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | | शाखांचे सभासद होता येणार नाही. | |
| कलम २५ | **७) वर्गणी :**<br>नव्या सभासदाची नोंदणी झाल्यावर त्याच्या वर्गणीचा केंद्र संस्थेच्या नियमाप्रमाणे हिस्सा शाखेने ३० दिवसांच्या आत केंद्राकडे पाठवणे आवश्यक राहील. | **कलम ३२**<br>**७) वर्गणी :**<br>नव्या सभासदाची नोंदणी झाल्यावर त्याच्या वर्गणीचा हिस्सा केंद्र शाखेने ३० दिवसांच्या आत शाखेकडे पाठवणे आवश्यक राहील. | **बदल नाही** |
| | **८) सभासदत्व :**<br>म.सा.प.चे उद्देश, घटना व नियम मान्य असलेल्या १८ वर्षावरील कोणाही व्यक्तीस स्थानिक शाखेतर्फे संस्थेचे सभासद होता येईल. स्थानिक शाखा नसेल तर केंद्र संस्थेचा सभासद होता येईल. त्यासाठी केंद्र संस्थेच्या विहित नमुन्यात अर्ज, पूर्ण वर्गणीसह व एका सभासदाच्या शिफारशीसह कार्यकारिणीच्या मंजुरीसह केंद्राकडे पाठवावा लागेल. कोणाचेही सभासदत्व स्वीकारणे किंवा नाकारणे हा केंद्राच्या कार्यकारी मंडळाचा अधिकार राहील. मार्च अखेरपर्यंत ज्या सर्वसाधारण सभासदाची वार्षिक वर्गणी येणार नाही त्याचे सभासदत्व आपोआप रद्द होईल. | **८) सभासदत्व :**<br>म.सा.प.चे उद्देश, घटना व नियम मान्य असलेल्या १८ वर्षावरील कोणाही व्यक्तीस स्थानिक शाखेतर्फे संस्थेचे सभासद होता येईल. स्थानिक शाखा नसेल तर केंद्र संस्थेचा सभासद होता येईल. त्यासाठी केंद्र संस्थेच्या विहित नमुन्यात अर्ज, पूर्ण वर्गणीसह व एका सभासदाच्या शिफारशीसह कार्यकारिणीच्या मंजुरीसह केंद्राकडे पाठवावा लागेल. कोणाचेही सभासदत्व स्वीकारणे किंवा नाकारणे हा केंद्राच्या कार्यकारी मंडळाचा अधिकार राहील. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |
| | **९) सभासदांचे हक्क :**<br>म.सा.प.च्या घटनेप्रमाणे दिलेले सर्व अधिकार सभासदांना प्राप्त होतील. | **९) सभासदांचे हक्क :**<br>म.सा.प.च्या घटनेप्रमाणे दिलेले सर्व अधिकार सभासदांना प्राप्त होतील. | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | **१०) सभासदत्व रद्द करणे :**<br>(अ) मृत्यू, राजीनामा, फौजदारी, नैतिक अधःपतनाच्या गुन्ह्याबद्दल झालेली शिक्षा अगर | **कलम ३२**<br>**१०) सभासदत्व रद्द करणे :**<br>(अ) मृत्यू, राजीनामा, फौजदारी, नैतिक अधःपतनाच्या गुन्ह्याबद्दल झालेली शिक्षा किंवा संबंधित शाखेच्या कार्यकारी मंडळाकडून आलेल्या प्रस्तावानुसार परिषदेने कायदेशीररित्या सभासदत्व रद्द केल्यास. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |
| | (आ) परिषदेचे नियम व हित यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विघातक कृत्य करणाऱ्या वा बेशिस्त वर्तन करणाऱ्या कोणत्याही सभासदाचे सभासदत्व, शाखेच्या कार्यकारी मंडळाच्या शिफारशीवरून, शाखेच्या सर्वसाधारण सभेत हजर सभासदांच्या २/३ मताधिक्याने, कायमचे अगर काही मुदतीसाठी रद्द करता येईल. त्यापूर्वी अशा सभासदाला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. शाखेच्या निर्णयाला केंद्राची अंतिम संमती आवश्यक राहील. | (आ) परिषदेचे नियम व हित यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विघातक कृत्य करणाऱ्या वा बेशिस्त वर्तन करणाऱ्या कोणत्याही सभासदाचे सभासदत्व, शाखेच्या कार्यकारी मंडळाच्या शिफारशीवरून, शाखेच्या सर्वसाधारण सभेत हजर सभासदांच्या २/३ मताधिक्याने, कायमचे अगर काही मुदतीसाठी रद्द करता येईल. त्यापूर्वी अशा सभासदाला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. शाखेच्या निर्णयाला केंद्राची अंतिम संमती आवश्यक राहील. | **बदल नाही** |
| | **११) कार्यकारी मंडळ :**<br>(अ) कार्यकारी मंडळ एकूण १५ सभासदांचे राहील. त्यात १ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, १ कार्याध्यक्ष, २ कार्यवाह व १ कोषाध्यक्ष असे ६ पदाधिकारी राहतील व इतर ६ सभासद राहतील. | **११) शाखा कार्यकारी मंडळ :**<br>(अ) कार्यकारी मंडळ एकूण १५ सभासदांचे राहील. त्यात १ अध्यक्ष, २ उपाध्यक्ष, २ कार्यवाह व १ कोषाध्यक्ष असे ६ पदाधिकारी राहतील व इतर ९ सभासद राहतील. | **बदल नाही** |
| | (आ) केंद्र संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या सुमारास शाखेच्या कार्यकारी | (आ) केंद्र संस्थेच्या पाच वर्षीय निवडणुकी प्रमाणे शाखेच्या कार्यकारी मंडळ सभासदांची निवड दर पाच वर्षांनी निवडणूक किंवा सर्वसाधारण सभेत | **शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | मंडळ सभासदांची निवड दर पाच वर्षांनी सर्वसाधारण सभेत बहुमताने केली जाईल. त्यात शाखेच्या सर्व सभासदांनी गुप्त मतदान पद्धतीने बहुमताने निवड करावी. | बहुमताने केली जाईल. त्यात (अ) मध्ये नमूद केलेले पदाधिकारी व ९ सभासदांची शाखेच्या सर्व सभासदांकडून गुप्त मतदान पद्धतीने बहुमताने निवड होईल. सदर सभेची नोटीस १५ दिवस आधी वृत्तपत्राद्वारे किंवा ई-मेलद्वारे देण्यात येईल. | |
| कलम २५ | (इ) कार्यकारी मंडळाच्या पहिल्या सभेत कार्यकारी मंडळाने एक सभासद स्वीकृत करावा. त्याशिवाय एक सभासद केंद्राने नियुक्त करावा. त्यानंतर याच सभेत २ कार्यवाहांची निवड करावी. एक अध्यक्ष व दोन उपाध्यक्ष यांचीही निवड करावी. याप्रमाणे सर्व शाखांची निवडणूक मार्च/एप्रिल मध्ये होईल. मध्यंतरीच्या काळात सध्या अस्तित्वात असलेले कार्यकारी मंडळ कार्य करील व अस्तित्वात राहील. | (इ) सर्व शाखांची निवडणूक साधारणपणे मार्च एप्रिलमध्ये होईल. शाखेच्या कार्यकारी मंडळाला आवश्यकतेनुसार दोन स्वीकृत सभासद घेता येतील त्यापैकी पहिल्या सभेत कार्यकारी मंडळाने एक सभासद स्वीकृत करावा व दुसरा सभासद आवश्यकतेनुसार पुढील सभेत स्वीकृत करावा. शाखेची निवडणूक काही कारणाने संबधित वेळेत झाली नाही तर निवडणूक होईपर्यंत सध्याचे कार्यकारी मंडळ कार्यरत राहिल. | **शब्दरचना बदल** |
| | (ई) कार्यकारी मंडळाच्या सभेला आवश्यकतेनुसार कोणालाही कार्याध्यक्ष निमंत्रित करू शकतील. मात्र निमंत्रितांना मतदानात भाग घेता येणार नाही. | (ई) कार्यकारी मंडळाच्या सभेला आवश्यकतेनुसार अध्यक्ष कोणालाही निमंत्रित करू शकतील. मात्र सदर निमंत्रितांना मतदानात भाग घेता येणार नाही. | **शब्दरचना बदल** |
| | (उ) कार्यकारी मंडळाच्या कोणाही सभासदाला परिषदेच्या कामकाजा साठीच्या खर्चाव्यतिरिक्त इतर काही पगार प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने मिळणार नाही. | (उ) कार्यकारी मंडळाच्या कोणत्याही सभासदाला परिषदेच्या कामकाजा साठीच्या खर्चाव्यतिरिक्त इतर काही पगार प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने मिळणार नाही. | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | **१२) कार्यकारी मंडळाचे कार्य व अधिकार :** (अ) दैनंदिन कामकाज पाहणे, नोकरवर्गाची नेमणूक करणे अगर सेवानिवृत्ती करणे, देण्याघेण्याचे व्यवहार करणे, नवीन उपसमित्या नेमणे व परिषदेच्या ध्येय-धोरणांनुसार व उद्देशांनुसार इतर कामे बघणे. | **१२) कार्यकारी मंडळाचे कार्य व अधिकार :** (अ) दैनंदिन कामकाज पाहणे, नोकरवर्गाची नेमणूक करणे अगर सेवानिवृत्ती करणे, देण्याघेण्याचे व्यवहार करणे, नवीन उपसमित्या नेमणे व परिषदेच्या ध्येय-धोरणांनुसार व उद्देशांनुसार इतर कामे बघणे. | **बदल नाही** |
| ------ | (आ) जमाखर्च व ताळेबंद पत्रक करून व अहवाल तयार करून वार्षिक सभा घेणे. त्यानंतर एक महिन्याच्या आत त्याची एक प्रत केंद्रसंस्थेकडे पाठवणे. शाखेचे हिशोब सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियम व सन १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवून त्याचे वार्षिक परिक्षण चार्टर्ड अकौंटंटस कडून करून घेणे किंवा संबंधित कागदपत्रे केंद्राकडे तपासणीसाठी पाठवणे. | (आ) जमाखर्च व ताळेबंद पत्रक तयार करून वार्षिक सभा घेणे. वार्षिक सभेच्या अहवालाची प्रत तीन महिन्याच्या आत केंद्रसंस्थेकडे पाठवणे. शाखेचे हिशोब सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियम व सन १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवून त्याचे वार्षिक परिक्षण चार्टर्ड अकौंटंटस कडून करून घेणे व संबंधित कागदपत्राची प्रत केंद्राकडे पाठवणे. | **शब्दरचना बदल** |
| ------ | (इ) पुढील कार्याची दिशा व अंदाजपत्रक तयार करून वार्षिक सभेपुढे ठेवणे. | (इ) पुढील कार्याची दिशा व अंदाजपत्रक तयार करून वार्षिक सभेपुढे ठेवणे. | **बदल नाही** |
| ------ | (ई) कार्यकारी मंडळातील सभासदाने राजीनामा दिला अगर अन्य कारणाने जागा रिकामी झाल्यास त्या जागी उरलेल्या मुदतीसाठी कार्यकारी मंडळाच्या सभेत बहुमताने सभासद निवडणे. | (ई) कार्यकारी मंडळातील सभासदाने राजीनामा दिला अगर अन्य कारणाने जागा रिकामी झाल्यास त्या जागी उरलेल्या मुदतीसाठी कार्यकारी मंडळाच्या सभेत बहुमताने सभासद निवडणे. | **बदल नाही** |
| ------ | (उ) म.सा.प.च्या घटनेत व शाखांच्या नियमात दुरूस्ती, नवीन कार्य अगर बदल अथवा इतर शिफारशी शाखेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करून | (उ) शाखांच्या नियमात दुरूस्ती, नवीन कार्य अगर बदल अथवा इतर | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | घेऊन केंद्राकडे पाठवणे. | शिफारशी शाखेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करून शाखेला केंद्राकडे पाठवता येईल. | |
| **कलम २५** | (ऊ) शाखेच्या वार्षिक स.सा.सभेने केलेले ठराव आदेश व धोरणविषयक गोष्टी अंमलात आणणे. | (ऊ) शाखेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने केलेले ठराव, आदेश व धोरणविषयक गोष्टी अंमलात आणणे. | **बदल नाही** |
| | (ए) केंद्राकडून आलेले ठराव, आदेश, सूचना आदींची अंमलबजावणी करणे व दर तीन महिन्यांनी शाखेचे कार्यवृत्त केंद्राकडे पाठवणे. | (ए) केंद्राकडून आलेले ठराव, आदेश, सूचना आदींची अंमलबजावणी करणे व दर तीन महिन्यांनी शाखेचे कार्यवृत्त परिषद साहित्य पत्रिकेत प्रसिद्धीसाठी केंद्राकडे पाठवणे. | **शब्दरचना बदल** |
| | (ऐ) परिषदेच्या मूलभूत योग्य अशा कार्यक्रमांच्या दृष्टीने कार्यकारी मंडळ आवश्यक तितक्या सभासदांची सल्लागार समिती नेमू शकेल. त्याचप्रमाणे साहित्य संमेलन, कवि संमेलन, महोत्सव, मेळावे, शिबीरे अशा विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाला प्रासंगिक उपसमिती नेमण्याचा अधिकार राहील. | (ऐ) परिषदेच्या मूलभूत योग्य अशा कार्यक्रमांच्या दृष्टीने कार्यकारी मंडळ आवश्यक तितक्या सभासदांची सल्लागार समिती नेमू शकेल. त्याचप्रमाणे साहित्य संमेलन, कविसंमेलन, महोत्सव, मेळावे, शिबीरे, ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ प्रकाशन अशा विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाला प्रासंगिक उपसमिती नेमण्याचा अधिकार राहील. | **शब्दरचना बदल** |
| | (ओ) कार्यकारी मंडळाचा कोणताही सभासद अथवा पदाधिकारी याच्याविरूद्ध अविश्वास अथवा निषेध व्यक्त करावयाचा असल्यास, असे मत कार्यकारी मंडळाने २/३ बहुमताने व्यक्त केले पाहिजे. तथापि असा ठराव मंजूर करण्यापूर्वी | (ओ) कार्यकारी मंडळाचा कोणताही सभासद अथवा पदाधिकारी याच्याविरूद्ध अविश्वास व्यक्त करावयाचा असल्यास, तसे मत कार्यकारी मंडळाने २/३ बहुमताने व्यक्त केले पाहिजे. तथापि असा ठराव मंजूर करण्यापूर्वी ज्याच्याविरूद्ध | **शब्दरचना बदल** |

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | ज्याच्याविरूद्ध असा ठराव असेल त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिली पाहिजे. अविश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्यानंतर तो सभासद/पदाधिकारी आपल्या स्थानापासून मुक्त झाला, असे मानण्यात येईल. | असा ठराव असेल त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिली पाहिजे. अविश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्यानंतर तो सभासद/पदाधिकारी आपल्या स्थानापासून मुक्त झाला, असे मानण्यात येईल. | |
| कलम २५ | **१३) कार्यकारी मंडळाच्या सभा :**<br>**(अ) अध्यक्ष–** वार्षिक सर्वसाधारण, विशेष सर्वसाधारण सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारून निष्पक्षपातीपणाने सभा पार पाडणे, शाखेच्या कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, समान मत विभागणी झाल्यास निर्णायक मत देणे. | **१३) कार्यकारी मंडळाच्या सभा :**<br>**(अ) अध्यक्ष–** कार्यकारी मंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, शाखेच्या कामाचे नियोजन करणे. कार्यकारी मंडळाच्या मदतीने वार्षिक कार्यक्रम ठरवून ते पार पाडणे, दैनंदिन जमाखर्चावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, कार्यवाहांकडून पत्रव्यवहार करून घेणे. उपाध्यक्ष यांच्या गैरहजेरीत त्यांची सर्व जबाबदारी घेणे. परिषदेच्या शाखा मेळाव्यास शाखेच्या वतीने उपस्थित राहणे किंवा अन्य पदाधिकारी पाठवणे. वार्षिक सर्वसाधारण, विशेष सर्वसाधारण सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारून निष्पक्षपातीपणाने सभा पार पाडणे, शाखेच्या कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, समान मत विभागणी झाल्यास निर्णायक मत देणे. | **शब्दरचना बदल** |
| | **(आ) उपाध्यक्ष–** अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांचे स्थान स्वीकारून सर्व कामे पाहणे. एखाद्या खास समितीवर विशिष्ट कार्यासाठी नेमणूक झाल्यास त्या विशेष कार्याची जबाबदारी स्वीकारणे. | **(आ) उपाध्यक्ष–** अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांचे स्थान स्वीकारून सर्व कामे पाहणे. एखाद्या खास समितीवर विशिष्ट कार्यासाठी नेमणूक झाल्यास त्या विशेष कार्याची जबाबदारी स्वीकारणे. | **शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | **(इ) कार्याध्यक्ष–** कार्यकारी मंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, शाखेच्या कामाचे नियोजन करणे. कार्यकारी मंडळाच्या मदतीने वार्षिक कार्यक्रम ठरवून ते पार पाडणे, दैनंदिन जमाखर्चावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, कार्यवाहांकडून पत्रव्यवहार करून घेणे. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या गैरहजेरीत त्यांची सर्व जबाबदारी घेणे. परिषदेच्या शाखा मेळाव्यास शाखेच्या वतीने उपस्थित राहणे. | अध्यक्षांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे, अध्यक्षांच्या सल्ल्याने शाखेचे उपक्रम यशस्वीरित्या पार पाडणे. | **कार्यक्षेत्रात बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | **(ई) कार्यवाह–** कार्यकारिणीच्या सूचनेप्रमाणे दैनंदिन कामकाज पाहणे, शाखेचा पत्रव्यवहार करणे, दप्तर सांभाळणे, कार्याध्यक्षांच्या पूर्व परवानगीने सर्व प्रकारच्या सभा बोलावणे व त्यांचा वृत्तांत ठेवणे. कोषाध्यक्षांकडून मासिक जमाखर्च वगैरे वर्गणीच्या तपशिलासह कार्यकारिणीपुढे ठेवणे. शाखेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पाहणे, शाखेचा अहवाल दर तीन महिन्यातून एकदा नियमितपणे केंद्राकडे पाठवणे. कार्याध्यक्षांच्या संमतीने वरील सर्व कामांची विभागणी कार्यवाहांनी करून द्यावी. | **(ई) कार्यवाह–** कार्यकारिणीच्या सूचनेप्रमाणे दैनंदिन कामकाज पाहणे, शाखेचा पत्रव्यवहार करणे, दप्तर सांभाळणे, अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने सर्व प्रकारच्या सभा बोलावणे व त्यांचा वृत्तांत ठेवणे. कोषाध्यक्षांकडून मासिक जमाखर्च वगैरे वर्गणीच्या तपशिलासह कार्यकारिणीपुढे ठेवणे. शाखेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणूने काम पाहणे, शाखेचा अहवाल दर तीन महिन्यातून एकदा नियमितपणे केंद्राकडे पाठवणे. अध्यक्षांच्या संमतीने वरील सर्व कामांची विभागणी कार्यवाहांनी करून द्यावी. | **शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | --------------- |
| | **(उ) कोषाध्यक्ष–** शाखेचे दैनंदिन, वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र ठेवणे, सभासदांच्या वर्गण्या, देणग्या, व्याज आदींच्या नोंदी ठेवणे, खर्चाच्या बिलांची रक्कम कार्याध्यक्षांच्या वा कार्यकारी मंडळाच्या मान्यतेनुसार चुकती करणे, हिशोबाच्या नोंदवह्या, पावतीपुस्तके, चेकबुक्स, पासबुक्स आदींची जबाबदारी घेणे व सभासदांना जरूर तेव्हा माहिती देणे. वार्षिक व त्रैमासिक जमाखर्च | **(उ) कोषाध्यक्ष–** शाखेचे दैनंदिन, वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र ठेवणे, सभासदांच्या वर्गण्या, देणग्या, व्याज आदींच्या नोंदी ठेवणे, खर्चाच्या बिलांची रक्कम अध्यक्षांच्या किंवा कार्यकारी मंडळाच्या मान्यतेनुसार चुकती करणे, हिशोबाच्या नोंदवह्या, पावतीपुस्तके, चेकबुक्स, पासबुक्स आदींची जबाबदारी घेणे व सभासदांना जरूर तेव्हा माहिती देणे. वार्षिक व त्रैमासिक जमाखर्च | **शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | अंदाजपत्रके तयार करणे व कार्यवाहांमार्फत कार्यकारिणीला सादर करणे. | अंदाजपत्रके तयार करणे व कार्यवाहामार्फत कार्यकारी मंडळाला सादर करणे. | |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम २५** | **१४) निधी व त्याचा विनियोग :** शाखेच्या कामकाजासाठी परिषदेच्या सभासदांकडून वर्गणी रूपाने निधी जमा केला जाईल. निधी संकलनासाठी देणग्या मिळवण्याचा प्रयत्न केला जाईल. निधी संकलनासाठी स्वतंत्र कार्यक्रम आखूनही निधी उभा केला जाईल. सरकारी/निमसरकारी अथवा खाजगी अनुदान अगर मदत स्वीकारण्यात येईल. शाखेकडील निधी राष्ट्रीयकृत शेड्यूल्ड अथवा सहकारी बँकेत ठेवावा. अन्य खास व्यक्तीकडे किंवा संस्थेकडे ठेव म्हणून ही रक्कम ठेवू नये. कोषाध्यक्षांकडे रु. १००० पेक्षा अधिक रक्कम रोख स्वरूपात नसावी. बँकेचे व्यवहार कार्याध्यक्ष किंवा कार्यवाह आणि कोषाध्यक्ष अशा दोघांच्या स्वाक्षरीने करावेत. शाखेचा निधी व त्यावरील व्याज याचा विनियोग शाखेच्या कार्यासाठी व्हावा. आजीव सभासदांच्या वर्गणीचा हिस्सा, विशिष्ट कार्यासाठी जमलेला निधी व अन्य देणग्या व रु. दोन हजारांपेक्षा जास्त अन्य निधी मुदत ठेवीच्या स्वरूपात असाव्यात. व्याजाची रक्कम दैनंदिन खर्चासाठी व कार्यक्रमांसाठी खर्च व्हावी. मूळ ठेवीतील रक्कम खर्च करण्यापूर्वी केंद्राची संमती घ्यावी. शाखेला स्थावर मालमत्ता निर्माण करणे झाल्यास केंद्र संस्थेच्या परवानगीने करता येईल. मात्र अशा मालमत्तेची मालकी केंद्र संस्थेकडे राहील. याबद्दलचा पुढील निर्णय केंद्र संस्थेने शाखेच्या संमतीने घ्यावा. | **१४) निधी व त्याचा विनियोग :** शाखेच्या कामकाजासाठी परिषदेच्या सभासदांकडून वर्गणी रूपाने निधी जमा केला जाईल. निधी संकलनासाठी देणग्या मिळवण्याचा प्रयत्न केला जाईल. निधी संकलनासाठी स्वतंत्र कार्यक्रम आखूनही निधी उभा केला जाईल. सरकारी/निमसरकारी अथवा खाजगी अनुदान अगर मदत स्वीकारण्यात येईल. शाखेकडील निधी राष्ट्रीयकृत, शेड्यूल्ड अथवा सहकारी बँकेत ठेवावा. अन्य खास व्यक्तीकडे किंवा संस्थेकडे ठेव म्हणून ही रक्कम ठेवू नये. कोषाध्यक्षांकडे रु. ५००० पेक्षा अधिक रक्कम रोख स्वरूपात नसावी. बँकेचे व्यवहार अध्यक्ष किंवा कार्यवाह आणि कोषाध्यक्ष अशा दोघांच्या स्वाक्षरीने करावेत. शाखेचा निधी व त्यावरील व्याज याचा विनियोग शाखेच्या कार्यासाठी व्हावा. आजीव सभासदांच्या वर्गणीचा हिस्सा, विशिष्ट कार्यासाठी जमलेला निधी व अन्य देणग्या व रु. दहा हजारांपेक्षा जास्त अन्य निधी मुदत ठेवीच्या स्वरूपात असाव्यात. व्याजाची रक्कम दैनंदिन खर्चासाठी व कार्यक्रमांसाठी खर्च व्हावी. मूळ ठेवीतील रक्कम खर्च करण्यापूर्वी केंद्राची संमती घ्यावी. शाखेला स्थावर मालमत्ता निर्माण करणे झाल्यास केंद्र संस्थेच्या परवानगीने करता येईल. मात्र अशा मालमत्तेची मालकी केंद्र संस्थेकडे राहील. याबद्दलचा पुढील निर्णय केंद्र संस्थेने शाखेच्या संमतीने घ्यावा. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट ‘ब’ महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| **कलम २५** | **१५) वार्षिक सर्वसाधारण सभा :** शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा परिषदेचे अधिकृत वर्ष संपल्यापासून तीन महिन्याच्या आत घेतली पाहिजे. त्यासाठी आवश्यक हिशोबाचा अहवाल पूर्ण करून तपासणीही पूर्ण करण्याची तत्परता कार्यकारिणीने दाखवली पाहिजे. काही कारणाने हे न झाल्यास अध्यक्षांनी आपल्या अधिकारात सभा बोलावली पाहिजे. **वार्षिक सभेची सूचना** (दिवस, वेळ, ठिकाण व सभेपुढील कामे असा सर्व तपशील असलेली) सभेपूर्वी किमान १५ दिवस दिली पाहिजे. केंद्र संस्थेच्या एका प्रतिनिधीला या सभेसाठी विशेष आमंत्रित केले पाहिजे. सभेची सूचना पोस्टाने न मिळाल्यास त्यामुळे सभेत मंजूर झालेल्या कामकाजास बाधा येणार नाही. वार्षिक सभेच्या कामकाजात सर्व अधिकृत सभासदांना भाग घेता येईल. अन्य आमंत्रितांना उपस्थित राहता येईल, परंतु आमंत्रितांना मताधिकार असणार नाही. सभेस गणसंख्या तीन पंचमांश किंवा २५ सभासद यापैकी कमी असेल ती एवढी राहील. कोरम (गणसंख्ये) अभावी स्थगित सभा पंधरा मिनिटांनी त्याच ठिकाणी भरेल व त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही व कामकाज कायदेशीर ठरेल. मात्र सूचनापत्रात तशी नोंद करणे आवश्यक आहे. | **१५) वार्षिक सर्वसाधारण सभा :** शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा परिषदेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्याच्या आत घेतली पाहिजे. त्यासाठी आवश्यक हिशोबाचा अहवाल पूर्ण करून तपासणीही पूर्ण करण्याची तत्परता कार्यकारी मंडळाने दाखवली पाहिजे. काही कारणाने हे न झाल्यास अध्यक्षांनी आपल्या अधिकारात सभा बोलावली पाहिजे. **वार्षिक सभेची सूचना** (दिवस, वेळ, ठिकाण व सभेपुढील कामे असा सर्व तपशील असलेली) सभेपूर्वी साध्या पोस्टाने किंवा स्थानिक वृत्तपत्रातून किंवा ई-मेल किंवा व्हॉटस्‌अप वरून किमान १५ दिवस आधी दिली पाहिजे. केंद्र संस्थेला या वार्षिक सभेसाठी एका प्रतिनिधीला पाठविण्याची विनंती शाखेच्या अध्यक्षांनी करावी. सभेची सूचना वरीलप्रमाणे पाठवूनसुद्धा न मिळाल्यास किंवा न कळल्यास सभेत मंजूर झालेल्या कामकाजास बाधा येणार नाही. वार्षिक सभेच्या कामकाजात सर्व अधिकृत सभासदांना भाग घेता येईल. या सभेत कुणाला विशेष आमंत्रित केल्यास उपस्थित राहता येईल, परंतु आमंत्रितांना मताधिकार असणार नाही. सभेस अधिकृत सभासद संख्येच्या तीन पंचमांश किंवा १५ सभासद यापैकी कमी असेल ती एवढी राहील. कोरम (गणसंख्ये) अभावी स्थगित सभा पंधरा मिनिटांनी त्याच ठिकाणी भरेल व त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही व त्यातील कामकाज कायदेशीर ठरेल. मात्र वार्षिक सभा सूचनापत्रात तशी नोंद आवश्यक आहे | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | **१६) वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील कामे :** | **कलम ३२**<br>**१६) वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील कामे :** | |
| | (अ) सूचनापत्राचे वाचन | (अ) सूचनापत्राचे वाचन | **बदल नाही** |
| | (आ) मागील सभेचा वृत्तांत वाचन | (आ) मागील सभेचा वृत्तांत वाचन | **बदल नाही** |
| | (इ) कार्यकारिणीने मंजूर केलेले अहवाल वाचन | (इ) कार्यकारिणीने मंजूर केलेले अहवाल वाचन | **बदल नाही** |
| | (ई) मागील वर्षाचे जमाखर्च, ताळेबंद पत्रक व नवीन वर्षासाठी अंदाजपत्रक यास मंजूरी | (ई) मागील वर्षाचे जमाखर्च, ताळेबंद पत्रक व नवीन वर्षासाठी अंदाजपत्रक यास मंजूरी. | **बदल नाही** |
| | (उ) पुढील वर्षासाठी अंतर्गत हिशोब तपासनिसांची नियुक्ती | (उ) पुढील वर्षासाठी अंतर्गत हिशोब तपासनिसांची व सनदी लेखापालाची नियुक्ती | **शब्दरचना बदल** |
| | (ऊ) ध्येय धोरण व कार्यावर चर्चा | (ऊ) ध्येय धोरण व कार्यावर चर्चा | **बदल नाही** |
| | (ए) अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व अन्य सभासदांनी पूर्वसूचना देऊन सभेपुढे आणलेली कामे | (ए) अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व अन्य सभासदांनी पूर्वसूचना देऊन सभेपुढे आणलेली कामे | **बदल नाही** |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | **१७) विशेष सर्वसाधारण सभा :** एखादी खास महत्त्वाची गोष्ट सर्व सभासदांपुढे ठेवण्याची कार्यकारिणीची इच्छा असल्यास अगर विशेष प्रसंगी विशेष सर्वसाधारण सभा घेता येईल. पटावरील १/४ सभासदांनी लेखी अर्ज केल्यासही अशी विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलावली पाहिजे. | **१७) विशेष सर्वसाधारण सभा :** एखादी खास महत्त्वाची गोष्ट सर्व सभासदांपुढे ठेवण्याची कार्यकारी मंडळाची इच्छा असल्यास त्यासाठी या विषयापुरती विशेष सर्वसाधारण सभा घेता येईल. अधिकृत सभासद संख्येच्या १/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यासही अशी विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलावली पाहिजे. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | **१८) विशेष सूचना :** शाखेच्या कार्यासंबंधीचे केंद्राकडून आलेले आदेश किंवा सूचना यांचे पालन न केल्यास, दर तीन महिन्यातून एकदा कार्यवृत्त न पाठवल्यास, हिशोब व ताळेबंद योग्य कालावधीत पूर्ण न करण्यात आल्यास, शाखेच्या कामकाजाबद्दल असमाधानकारक स्थिती निर्माण झाल्यास, शाखेच्या कामाची पाहणी करण्याचा, कार्य सुरळीत चालावे यासाठी योग्य ती कारवाई करण्याचा, पदाधिकारी बदलण्याचा किंवा नवे नियुक्त करण्याचा इतकेच नव्हे, तर शाखेची मान्यता काढून घेण्याचा पूर्ण अधिकार केंद्राकडे राहील. अंतिम निर्णय घेण्यापूर्वी कार्याध्यक्षांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल. | **१८) विशेष सूचना :** १) शाखेच्या कार्यासंबंधीचे केंद्राकडून आलेले आदेश किंवा सूचना यांचे पालन न केल्यास, दर तीन महिन्यातून एकदा कार्यवृत्त न पाठवल्यास, हिशोब व ताळेबंद योग्य कालावधीत पूर्ण न करण्यात आल्यास, शाखेच्या कामकाजाबद्दल असमाधानकारक स्थिती निर्माण झाल्यास, शाखेच्या कामाची पाहणी करण्याचा, कार्य सुरळीत चालावे यासाठी योग्य ती कारवाई करण्याचा, पदाधिकारी बदलण्याचा किंवा नवे पदाधिकारी नियुक्त करण्याचा इतकेच नव्हे, तर शाखेची मान्यता काढून घेण्याचा पूर्ण अधिकार जिल्हा प्रमुखांच्या शिफारशीनुसार केंद्राकडे राहील. केंद्राने अंतिम निर्णय घेण्यापूर्वी संबधित शाखेच्या अध्यक्षांना म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल. | **प्रशासकीय सोयीसाठी शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'ब' महाराष्ट्र साहित्य परिषद शाखांसाठी नियम कलम ३२)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम २५** | | २) शाखांनी आपल्या पुरस्कारासाठी 'राज्यस्तरीय' असा शब्दप्रयोग करु नये. पुरस्कार द्यायचे झाल्यास आपल्या कार्यक्षेत्रातील लेखकांना द्यावेत. | **प्रशासकीय सोयीसाठी नव्याने समाविष्ट** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | ---------------- |
| | | ३) शाखेने पुरस्कार देताना पुरस्कार समितीमध्ये जिल्हा प्रमुखाचा समावेश बंधनकारक राहील. | **प्रशासकीय सोयीसाठी नव्याने समाविष्ट** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | ---------------- |
| | | ४) परिषदेच्या हिताविरुद्ध कार्य करणाऱ्या किंवा परिषदेच्या विरुद्ध बदनामीकारक वृत्त सोशल मिडिया अथवा अन्य माध्यमातून प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीस पुरस्कार दिला जाऊ नये. | **प्रशासकीय सोयीसाठी नव्याने समाविष्ट** |
| ------ | ------------------------------------------ | ------------------------------------------ | ---------------- |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'क' वार्षिक मराठी साहित्य संमेलनासंबंधीचे नियम कलम ३३)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| कलम २५ | **परिशिष्ट 'ब'**<br>**महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विभागीय साहित्य संमेलनासंबंधीचे नियम :**<br>अ) परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या अथवा कार्यकारी मंडळाने नेमलेल्या समितीच्या मार्गदर्शनाने संमेलनाचे कामकाज चालावे. | **परिशिष्ट 'क' : ( कलम २४ नुसार)**<br>**महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वार्षिक मराठी साहित्य संमेलनासंबंधीचे नियम :**<br>अ) परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या अथवा कार्यकारी मंडळाने नेमलेल्या समितीच्या मार्गदर्शनाने व जिल्हा प्रमुखांच्या सहकार्याने संमेलनाचे कामकाज करण्यात यावे. | **कलम ३३ मुळे परिशिष्ट नावात बदल संमेलनाचे नाव बदलल्यामुळे**<br><br>**शब्दरचना बदल** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ब) संमेलनातील कार्यक्रम, चर्चा-परिसंवादाचे विषय, वक्ते, प्रतिनिधी व्यवस्था, शुल्क, संमेलन स्थळ, निधी जमवणे, जमाखर्च, इत्यादी कामे मुख्यतः निमंत्रक संस्थेने करावयाची. | ब) संमेलनातील कार्यक्रम, चर्चा-परिसंवादाचे विषय, वक्ते, प्रतिनिधी व्यवस्था, शुल्क, संमेलन स्थळ, निधी जमवणे, जमाखर्च, इत्यादी कामे मुख्यतः निमंत्रक संस्थेने करावयाची आहेत. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | क) स्थानिक, स्वागत समिती आणि पदाधिकारी यांची निवड करून या समितीमार्फत कार्य करावे आणि संमेलन आटोपल्यावर एक महिन्याच्या आत वृत्तांत व हिशोब म.सा.प.च्या केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावा. | क) स्थानिक स्वागत समिती आणि पदाधिकारी यांची निवड करून या समितीमार्फत संमेलनाचे कार्य करावे आणि संमेलन झाल्यावर एक महिन्याच्या आत संमेलनाचा वृत्तांत व हिशोब म.सा.प.च्या केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावा. | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |
| | ड) संमेलनाच्या अध्यक्षांची अंतिम निवड म.सा.प.चे कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष, कार्यवाह आणि स्वागत समितीचे पदाधिकारी (५) यांच्या संयुक्त सभेने करावी. ती शक्यतो एकमताने वा बहुमताने करावी. | ड) संमेलनाच्या अध्यक्षांची अंतिम निवड म.सा.प.चे अध्यक्ष, कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह तसेच संबंधित जिल्हा प्रमुख आणि स्वागत समितीचे पदाधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत करण्यात येईल. | **शब्दरचना बदलल्यामुळे** |
| ------ | ---------------------------------------- | ---------------------------------------- | -------------- |

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| | | **कलम ३३**<br>इ) संमेलनातून खर्च वजा जाता जी शिल्लक राहिल त्यापैकी किमान दहा टक्के रक्कम म.सा.प.च्या केंद्रीय कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात यावी. | |

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## दिनांक १ जानेवारी २००१ पासून मंजूर असलेल्या घटनेमध्ये प्रस्तावित घटना बदल (परिशिष्ट 'क' वार्षिक मराठी साहित्य संमेलनासंबंधीचे नियम कलम ३३)

| कलम | सध्याची रचना | प्रस्तावित बदल करूनची रचना | कारण |
|---|---|---|---|
| **कलम २५** | इ) संमेलनातून जी शिल्लक उरेल तिच्यापैकी किमान दहा टक्के रक्कम म.सा.प.च्या केंद्रीय कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात यावी. | | **बदल नाही** |
| ------ | ---------------------------------------- | | -------------- |

(विनोद कुलकर्णी )
कोषाध्यक्ष

(सौ. सुनिताराजे पवार)
प्रमुख कार्यवाह

(प्रा. मिलिंद जोशी)
कार्याध्यक्ष

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## कार्यकारी मंडळ (२०२१-२०२६)


### विश्वस्त मंडळ

**प्रा. डॉ. शिवाजीराव कदम** | **डॉ. पी. डी. पाटील** | **यशवंतराव गडाख**

### पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

अध्यक्ष । **डॉ. रावसाहेब कसबे**

उपाध्यक्ष । **विद्याधर अनास्कर** | उपाध्यक्ष । **डॉ. तानाजीराव चोरगे** | उपाध्यक्ष । **राजीव बर्वे**

कार्याध्यक्ष । **प्रा. मिलिंद जोशी** | प्रमुख कार्यवाह । **सुनिताराजे पवार**

कोषाध्यक्ष । **विनोद कुलकर्णी** | पत्रिका संपादक । **डॉ. पुरुषोत्तम काळे**

### स्थानिक कार्यवाह


व्याख्याने व स्मृतिदिन । **शिरीष चिटणीस** | विशेष पारितोषिके । **मृणालिनी कानिटकर-जोशी**


वार्षिक ग्रंथ पारितोषिके । **अंजली कुलकर्णी** | परीक्षा विभाग । **माधव राजगुरू**


ग्रंथालय विभाग । **वि. दा. पिंगळे** | अतिथीनिवास-वास्तू देखभाल । **ॲड. प्रमोद आडकर**

### सदस्य

| | | |
|---|---|---|
| **डॉ. सतीश देसाई** (पुणे शहर) | **डॉ. आशुतोष जावडेकर** (पुणे शहर) | **ज्योत्स्ना चांदगुडे** (पुणे शहर) |
| **रावसाहेब पवार** (पुणे जिल्हा) | **राजन लाखे** (पुणे जिल्हा) | **डॉ. पुरुषोत्तम काळे** (पुणे जिल्हा) |
| **नंदकुमार सावंत** (सातारा जिल्हा) | **रवींद्र बेडकिहाळ** (सातारा जिल्हा) | **सोपानराव चव्हाण** (सातारा जिल्हा) |
| **पद्माकर कुलकर्णी** (सोलापूर जिल्हा) | **ॲड.जे.जे.कुलकर्णी** (सोलापूर जि.) | **कल्याण शिंदे** (सोलापूर जिल्हा) |
| **राजन मुठाणे** (कोल्हापूर जिल्हा) | **प्रकाश देशपांडे** (कोकण) | **राजीव जोशी** (ठाणे जिल्हा) |
| **पद्माकर शिरवाडकर** (ठाणे जिल्हा) | **सुरेश देशपांडे** (ठाणे जिल्हा) | **प्रकाश होळकर** (नाशिक जिल्हा) |
| **ॲड. नितीन ठाकरे** (नाशिक जिल्हा) | **चंद्रकांत पालवे** (अहमदनगर जिल्हा) | **जयंत येलूलकर** (अहमदनगर जिल्हा) |
| **प्राचार्य तानसेन जगताप** (जळगाव जिल्हा) | **डॉ. शशिकला पवार** (धुळे जिल्हा) | **प्रा. दशरथ पाटील** (सांगली जिल्हा) |




## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस. टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.

---

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०
दूरभाष : ०२०– २४४७ ५९ ६३

# पुस्तक सूची

| | |
|---|---|
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : | रु. ५००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : | रु. ४००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : | रु. ३५०/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : | रु. ३००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : | रु. ८००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : | रु. ७००/– |
| मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : | रु. ७००/– |
| भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : | रु. ८००/– |
| भाषा व साहित्य संशोधन खंड १ : | रु. ५००/– |
| भाषा व साहित्य संशोधन खंड २ : | रु. ३००/– |
| भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : | रु. २००/– |
| म. सा. पत्रिका लेख – सूची : | रु. ४००/– |

**सर्व खंड २५ टक्के सवलतीत !**